# १५ वा वित्त आयोग
# महत्वाचे
# शासन निर्णय
# आणि परिपत्रके

# अनुक्रमणिका


| अ.क्र | तपशील | शासन निर्णय/परिपत्रक विभाग व दिनांक | पान क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | १५ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्या संस्थांसाठी प्राप्त होणा-या निधी वितरणाचे प्रमाण निश्चित करण्या बाबत | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.पंविआ-२०२०/प्रक्र-३१/वित्त-४ दि. ९ मार्च २०२० | १ |
| २ | १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२१-२१ या वर्षाचा ग्रामपंचायत विकास आराखडा सुधारित करुन प्लॅन प्लस वर अपलोड करणे बाबत | ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.जीपीडीपी-२०२०/प्रक्र-३१/परा-६ दि. २८ एप्रिल २०२० | २ ते ४ |
| ३ | राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्रामार्फत पुरविणेत येणा-या सेवांसाठी ग्रामपंयायती मार्फत निधीची तरतुद करणे बाबत मार्गदर्शक सुचना | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.पेमेंट ४७१९/प्रक्र-७/आसक दि. १९ मे २०२० | ५ ते ७ |
| ४ | १ ला हप्ता अबंधित निधी वितरीत करणे बाबत पत्र | भारत सरकार,अर्थ मंत्रालय दि.१७ जुन २०२० | ८ ते १२ |
| ५ | केंद्र शासनाने विकासित केलेल्या PRIASoft- PFMS कार्यप्रणाली च्या वापराबाबत | ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.पिईएस २३२०/प्रक्र-२२/आसक दि. १६ जुन २०२० | १३ ते १८ |
| ६ | १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व सनियंत्रण याबाबत मार्गदर्शक सुचना | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.पंविआ-२०२०/प्रक्र-५९/वित्त-४ दि. २६ जुन २०२० | १९ ते २६ |
| ७ | १५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या बेसिक ग्रॅटच्या (अनटाईड) पहिल्या हप्त्याचे वितरण | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.पंविआ-२०२०/प्रक्र-५८/वित्त-४ दि. २९ जुन २०२० | २७ ते ३३ |
| ८ | १५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या बंधित अनुदानच्या (टाईड ग्रँट) पहिल्या हप्त्याचे वितरण | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.पंविआ-२०२०/प्रक्र-६२/वित्त-४ दि. २७ जुलै २०२० | ३४ ते ४० |
| ९ | पंधराव्या वित्त आयोगांतर्गत पाणी पुरवठा योजनांसाठी निधी वापराबाबत | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्र.जजीमि/०६०२०/प्रक्र-२०/पापु-०७ दि.०३ ऑगष्ट २०२० | ४१ ते ४३ |
| १० | १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार पंचायत राजच्या तिन्ही स्तरांसाठी प्राप्त होणा-या निधीमधुन हाती घ्यावयाच्या कामांच्या संदर्भात कामकाजाचे सर्वसाधारण समन्वय व नियंत्रण करणे बाबत | ग्रामविकास विभाग, शासन परिपत्रक क्र.पंविआ-२०२०/प्रक्र-६२/वित्त-४ दि. १० ऑगष्ट २०२० | ४४ ते ४६ |
| ११ | आमच गाव आमचा विकास उपक्रमांतर्गत सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करणे बाबत | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जीपीडीपी-२०२०/प्रक्र-३९/परा-६ दि. २५ सप्टेंबर २०२० | ४७ ते ७२ |
| १२ | स्वच्छ भारत अभियान (ग्रामिण) टप्पा क्र २ ग्रामपंचायतीमध्ये वैयक्तीक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत मार्गर्शक सुचना | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्र.स्वभामि२०२०/प्रक्र-११६/पापु-१६ दि.२८ ऑक्टोंबर २०२० | ७३ ते ९३ |
| १३ | स्वच्छ भारत अभियान (ग्रामिण) टप्पा क्र २ सार्वजनिक/सामुदायिक शौचालय (CSC) बांधकामाबाबत मार्गर्शक सुचना | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग परिपत्रक क्र.स्वभामि२०२०/प्रक्र-११६/पापु-१६ दि.२८ ऑक्टोंबर २०२० | ९४ ते १०६ |
| १४ | केंद्र शासनाने बंधित केलेल्या १५ वा केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीमधुन पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक योजना राबविण्या बाबत तांत्रिक मार्गदर्शक सुचना | पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र.जजमी/०६२०/प्रक्र-२०/भाग-२/पापु-० दि.१९ नोव्हेंबर २०२० | १०७ ते ११८ |
| १५ | १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामिण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या मुलभुत अनुदान (बेसिक ग्रॅट) वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व सनियंत्रण याबाबत अतिरीक्त मार्गदर्शक सुचना | ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.पंविआ-२०२०/प्रक्र-५९/वित्त-४ दि. ४ डिसेंबर २०२० | ११९ ते १२२ |

**१५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्राप्त होणा-या निधी वितरणाचे प्रमाण निश्चित करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.३१ / वित्त-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

तारीखः ९ मार्च,२०२०.

संदर्भ-. पंचायतराज मंत्रालयाचे पत्र क्र.डीओ क्र.जी-३९०११/२/२०१७- एफडी दि.२०.२०.२०२० चे पत्र

**प्रस्तावना -**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना दि.१ एप्रिल, २०२० ते दि.३१ मार्च, २०२५ या पाच वर्षाच्या कालखंडात प्राप्त होणा-या अनुदानाबाबत निधी वितरणाचे प्रमाण ठरविण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबावत शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केंद्र शासनाकडुन राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना दि.१ एप्रिल, २०२० ते दि.३१ मार्च, २०२५ या पाच वर्षाच्या कालखंडात प्राप्त होणा-या बेसिक ग्रँट (अनटाईड) व टाईड ग्रँट या दोन्ही ग्रँटसच्या वितरणाचे पंचायतराजच्या प्रत्येक स्तरावरील निश्चित प्रमाण (exact proportion ) राज्य शासनाव्दारे खालील प्रमाणे ठरविण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | निधी वितरण प्रमाण |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ८०% |
| २ | पंचायत समिती | १०% |
| ३ | जिल्हा परिषद | १०% |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Pravin Jain

(प्रविण जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन-

C:\Users\Mava.Vasudeo\Desktop\वितरण आदेश २४.६.२०२० - Copy.docx १



Scanned with CamScanner

(२)

# महाराष्ट्र शासन

Email ID: neela.ranade@nic.in
Phone No.: (०२२) २२०१४४१९

क्र.जीपीडीपी २०२०/ प्र.क्र.३१/ पं.रा.६
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन इमारत,
२५, मर्झबान पथ,मुंबई-४००००१.
दिनांक : २८ एप्रिल, २०२०.

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद ( सर्व )

विषय - १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ या वर्षाचा ग्राम पंचायत विकास आराखडा सुधारित करुन प्लॅन प्लस वर अपलोड करणेबाबत.....

संदर्भ - १ ग्राम विकास विभाग, शासन निर्णय क्रमांक:जीपीडीपी २०१९/प्र.क्र.३८/पं.रा.६, दिनांक २८ मे, २०१९.
२. संयुक्त सचिव, पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अ.शा.पत्र क्र.G- ३९०११/२/२०१७-FD, दि. २० फेब्रुवारी, २०२०.
३. संयुक्त सचिव, पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अ.शा.पत्र क्र. M-११०१५/१९२/२०१९-CB, दि. ०६ मार्च, २०२०.
४. संयुक्त सचिव, पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अ.शा.पत्र क्र M-११०१५/१९२/२०१९-CB, दि. १५ एप्रिल, २०२०.
५. संयुक्त सचिव, पंचायतीराज मंत्रालय, भारत सरकार यांचेकडील अ.शा.पत्र क्र. M-११०१५/१९२/२०१९-CB, दि. २७ एप्रिल, २०२०.

महोदय/ महोदया,

राज्यातील सर्व ग्राम पंचायतींनी सन २०२० ते २०२५ या कालावधीचा पंचवार्षिक आणि सन २०२०-२१ चा वार्षिक ग्राम पंचायत विकास आराखडा संदर्भ क्र. १ मधील सूचनांनुसार तयार करुन त्यास ग्राम सभांची मंजुरी घेतलेली आहे. सदरचे आराखडे तयार करताना केंद्रीय वित्त आयोगाचा गतवर्षा इतकाच निधी प्राप्त होईल असे गृहीत धरुन काही ठिकाणी त्याच्या १.२० पट तर काही ठिकाणी दिडपट निधी विचारात घेण्यात आलेला आहे.

तथापि, केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. २ व ३ मधील अ.शा.पत्रान्वये १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीच्या ५०% निधी हा बंधीत स्वरूपाचा राहणार असल्याचे आणि या बंधीत स्वरूपाच्या ५०% निधीचा विनियोग अ) स्वच्छता व हागणदारी मुक्त गावांचा दर्जा राखण्यासाठी आणि ब) पिण्याचे पाणी पुरवठा, पावसाचे पाणी संकलन आणि पाण्याचा पुनर्वापर यावर खर्च करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. उर्वरीत ५० % निधी ग्राम पंचायत विकास आराखड्यातील इतर उपक्रमांसाठी प्राधान्य क्रमानुसार ग्रामपंचायतींनी वापरावयाचा आहे.

केंद्र शासनाकडून संदर्भिय अ.शा.पत्रांन्वये प्राप्त सूचनांनुसार १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचे नियोजन करणे आवश्यक असल्यामुळे सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे सुधारित करावे लागणार

आहेत. राज्यातील सर्व ग्रामपंचायतीकडे सन २०२०-२१ या वर्षाचे वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करताना विचारात घेतलेल्या सन २०२०-२१ मध्ये प्राप्त होणा-या वित्त आयोगाच्या संभाव्य निधीची माहिती उपलब्ध आहे. त्यानुसार ग्रामपंचायत विकास आराखडे सुधारित करून प्लॅन प्लस प्रणालीमध्ये अपलोड करण्यासाठी खालील प्रमाणे कार्यवाही तात्काळ करावी.

१) सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना विचारात घेतलेला वित्त आयोगाचा निधी किती आहे याचे अवलोकन करावे. या निधीच्या ५०% निधी हा बंधीत स्वरूपाचा असुन त्याचा विनियोग वर उल्लेख केलेल्या ठराविक उपक्रमासाठीच करावयाचा आहे.

२) वरील प्रमाणे वित्त आयोगाच्या निधीपैकी ५०% बंधीत निधी निश्चित करावा.

३) सन २०२०-२१ च्या वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये अ) स्वच्छता व हागणदारी मुक्त गावांचा दर्जा राखण्यासाठी आणि ब) पिण्याचे पाणी पुरवठा, पावसाचे पाणी संकलन आणि पाण्याचा पुनर्वापर या घटकासाठी करण्यात आलेली तरतूद विचारात घ्यावी.

४) सन २०२०-२१ च्या वार्षिक ग्रामपचायत विकास आराखड्यामध्ये वरील मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद घटकासाठी केलेली तरतुद वित्त आयोगाच्या ५०% बंधीत निधी पेक्षा कमी असल्यास तेवढ्या प्रमाणात या घटकावरील तरतुद वाढवावी. सदरची तरतूद आराखड्यामध्ये प्रस्तावित केलेल्या या घटकावरील कामांवर वाढवावी किंवा ग्रामसभेमध्ये ठरलेल्या प्राधान्यक्रमामधून या घटकावरील कामांचा समावेश आराखड्यामध्ये करावा. मुद्दा क्र. ३ मध्ये नमुद उपक्रमांसाठी तरतूद केलीच नसल्यास या उपक्रमांतर्गत कामांचा समावेश करून ती किमान ५० % करणेत यावी.

५) वरीलप्रमाणे तरतूद वाढविल्यामुळे किंवा नवीन कामांचा समावेश केल्यामुळे आराखड्यातील इतर कामावरील तरतूद तेवढ्या प्रमाणात कमी करणे किंवा आराखड्यातील सर्वात कमी प्राधान्य असलेले काम /कामे आराखड्यातून वगळणे आवश्यक राहील, जेणेकरुन ग्रामसभेने मंजूर केलेल्या आराखड्यातील एकूण रकमेमध्ये फरक पडणार नाही. यापूर्वी आराखडा तयार करताना जे गुणोत्तर (१.२०/१.५० पट) असेल तेच कायम ठेवण्यात यावे.

६) अशाप्रकारे सुधारित केलेला आराखडा ग्रामपंचायतीच्या नजीकच्या मासिक सभेत मान्यतेसाठी सादर करून ग्रामपंचायतीची मान्यता घ्यावी. ग्रामपंचायतींच्या अशा सभा यथाशीघ्र आयोजित कराव्यात, मात्र सभेदरम्यान सामाजिक अंतर (Social Distancing), मास्कचा वापर व सुरक्षे संदर्भातील आवश्यक सर्व सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. जेथे शक्य असेल तेथे व्हिडिओ कॉन्फरन्स पद्धतीचा अवलंब करावा.

७) ग्रामपंचायत बैठकांचे आयोजन हे ग्रामपंचायत क्षेत्रातील लॉकडाऊन शिथिल झाल्यानंतर करणेत यावे. एखाद्या ठिकाणी कोरोनाच्या प्रादुर्भावामुळे ग्रामपंचायतीच्या बैठकांचे आयोजन करणे शक्यच नसलल्यास सद्यःस्थितीत करू नये. अशा ग्रामपंचायतींची यादी शासनास व राज्य प्रकल्प संचालक यांचे कार्यालयास साप्ताहिक अहवालासोबत दर सोमवारी पाठवावी. त्याचप्रमाणे परिस्थिती निवळल्यावर लगेचच ग्रामपंचायतींची मान्यता घ्यावी.

८) संदर्भ क्र. ४ मधील अ.शा. पत्रामध्ये दिलेल्या सूचनांनुसार ग्रामसभेची मान्यता यथावकाश घ्यावी. ग्रामसभांचे आयोजन परिस्थिती पूर्णपणे सर्वसाधारण झाल्यानंतर करण्यात यावे.

९) ज्या ग्रामपंचायतींच्या सन २०२०-२१ च्या वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये वरील मुद्दा क्र. ३ मध्ये नमूद घटकासाठी केलेली तरतूद वित्त आयोगाच्या ५०% बंधीत निधी इतकी किंवा त्यापेक्षा जास्त असेल,

अशा ग्रामपंचायतींनी त्यांच्या आराखड्यामध्ये कोणताही बदल करण्याची आवश्यकता नाही. मात्र तशा आशयाचा ग्रामपंचायतीचा ठराव घ्यावा.

१०) वरीलप्रमाणे आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतीचा आढावा घेऊन आराखड्यामध्ये आवश्यक ते बदल करून सुधारित ग्रामपंचायत विकास आराखडे संदर्भ क्र. ५ मधील अ.शा. पत्रानुसार उशीरात उशीरा दिनांक ३१ मे, २०२० पर्यंत प्लॅन प्लस प्रणालीमध्ये अपलोड करावयाचे आहेत. अपवादात्मक परिस्थितीत ग्रामपंचायत विकास आराखडे तालुकास्तरीय तांत्रिक छाननी समितीकडे पाठवावयाची गरज असल्यास सदर कार्यवाही तात्काळ करावी. याबाबत आपण केलेल्या व करत असलेल्या कामाचे अहवाल दर सोमवारी शासनास व राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पुणे यांचे कार्यालयास पाठवावेत.

११) आपल्या जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचे वरीलप्रमाणे सुधारित केलेले आराखडे दिनांक ३१ मे, २०२० पर्यंत प्लॅन प्लस प्रणालीमध्ये अपलोड करणेसाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( प ), गट विकास अधिकारी, संबंधित विस्तार अधिकारी, ग्रामसेवक व केंद्रचालक यांना सक्त सूचना देऊन मुदतीत कार्यवाही पूर्ण करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शासनास व राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पुणे यांचे कार्यालयास सादर करावा.

१२) दि.०१ एप्रिल, २०२० पासून केंद्रीय वित्त आयोगाअंतर्गत GPDP मध्ये घेण्यात आलेल्या आणि Plan Plus वर अपलोड केलेल्या कामाची भौतिक स्थिती इ. माहिती ActonSoft Portal वर घेण्यात येऊन सनियंत्रण सुनिश्चित करावे. तसेच, या कामांवर १००% निधी चा खर्च PRIASoft पोर्टलमधून करण्यात यावा. तसेच, काही तांत्रिक कारणांमुळे ज्या ग्राम पंचायती PRIASoft पोर्टलचा उपयोग करु शकत नसतील त्यांच्याबाबत तांत्रिक कारणे दूर करण्यात यावीत. ग्राम पंचायत तसेच ग्रामपंचायतीमध्ये समाविष्ट गावांचे मॅपिंग LGD पोर्टलमध्ये करावे.

संदर्भाधीन पत्रे सोबत जोडली आहेत.उपरोक्त सूचनांची अंमलबजावणी त्वरित व योग्य प्रकारे करावी,ही विनंती.

सहपत्र – वरीलप्रमाणे

आपली,

( नीला रानडे)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी.

१) राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान, ए-९, शिवसागर अपार्टमेंट, मोदीबाग, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६

२) संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था (यशदा), पुणे

३) उपायुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय (सर्व) यांनी सदर बाबींचे व कार्यवाहीचे सनियंत्रण करून अहवाल नियमितपणे सादर होतील याची दक्षता घ्यावी.

राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये "आपले सरकार सेवा केंद्रामार्फत (ASSK)" पुरविण्यात येणाऱ्या सेवांसाठी ग्रामपंचायतींमार्फत निधीची तरतूद करणेबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः पेमेंट ४७१९/प्र.क्र.७ आसक

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: १९ मे, २०२०.

**संदर्भ :**

**१) शासन निर्णय क्रमांक : संग्राम-२०१५/प्र.क्र.९३/संग्राम कक्ष दि.११ ऑगष्ट, २०१६**

**प्रस्तावना :**

शासन निर्णय दि.११ ऑगष्ट, २०१६ द्वारे राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्राची उभारणी व अंमलबजावणी करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. या केंद्रामार्फत विविध सेवा उपलब्ध करुन देण्यात येत आहेत. त्यासाठी या केंद्रांवर सद्यस्थितीत सीएससी-एसपीव्ही कंपनीमार्फत केंद्रचालकांची नियुक्ती करण्यात आली आहे

या सेवांसाठी सेवा पुरवठादार कंपनीस देय असणारी रक्कम ग्रामपंचायतींना मिळणाऱ्या १४ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या १० टक्के प्रशासकीय निधीमधुन खर्च करु शकतील अशी तरतूद संदर्भिय शासन निर्णयाच्या मुद्दा क्र.५.६ मध्ये करण्यात आलेली आहे. या १० टक्के प्रशासकीय निधीमधुन इतर प्रशासकीय कामेही घेणे आवश्यक असल्यामुळे सदर खर्च ५ टक्के (१० टक्के प्रशासकीय निधीच्या ५० टक्के) च्या मर्यादेत असणे योग्य राहिल असेही नमूद करुन पुढे तथापि सदर निधी अपुरा पडल्यास उर्वरित खर्च १४ व्या वित्त आयोगाच्या ९० टक्के अनुदानातुन किंवा ग्रामपंचायत स्वनिधीतुन / मुक्तनिधीतुन उपलब्ध करणे शक्य असल्याचाही उल्लेख करण्यात आला आहे.

१५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायतींना उपलब्ध होणाऱ्या एकूण निधीपैकी ५० टक्के निधी बंधित स्वरुपाचा असुन ५० टक्के निधी अबंधित आहे. या पार्श्वभूमीवर आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत मिळणाऱ्या सेवांसाठी सेवा पुरवठादार कंपनीस अदा करावयाच्या रकमेबाबत शासनाने पुढील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :**

आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत मिळणाऱ्या सेवांसाठी सेवा पुरवठादार कंपनीस अदा करावयाची रक्कम ही १५ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना उपलब्ध होणाऱ्या ५० टक्के अबंधित निधीतुन अदा करणे शक्य आहे. मात्र ही रक्कम अबंधित निधीच्या १० टक्केच्या मर्यादेत असणे योग्य राहिल. तथापि सदर निधी अपुरा पडत असल्यास उर्वरित खर्च ग्रामपंचायत स्वनिधीतुन उपलब्ध करणे शक्य आहे. सदर केंद्रामुळे ग्रामस्थांच्या राहणीमानाच्या दर्जा उंचावणार असल्याने सदर बाब ही मानव विकास निर्देशकांशी निगडीत आहे.

२. या संदर्भातील पुढील सूचना निर्गमित होईपर्यंत संदर्भिय शासन निर्णयातील अन्य सूचना कायम राहतील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०२००५२११२०११९४५२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.05.22 13:55:31 +05'30'

**( प्रविण जैन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत.

१) मा.राज्यपालाचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री, यांचे प्रधान सचिव
३) सर्व मा.विधानमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई.
४) मा.प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय
५) शासनाचे मुख्य सचिव
६) शासनाचे सर्व अतिरिक्त मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव (सर्व प्रशासकीय विभाग)
७) सर्व विभागीय आयुक्त
८) सर्व सह सचिव / उप सचिव (ग्राम विकास विभाग)
९) सर्व जिल्हाधिकारी
१०) मा.मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
११) मा.राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव
१२) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी

१३) सर्व जिल्हा परिषदांचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१५) सर्व जिल्हा परिषदांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (पंचायत / सा.प्र.वि)
१६) सर्व पंचायत समित्यांचे गट विकास अधिकारी
१७) CSC-SPV e-Governance India Ltd. इलेक्ट्रॉनिक निकेतन, तिसरा मजला, DeITY, ६ सीजीओ कॉम्प्लेक्स, लोधी रोड, नवी दिल्ली-११०००३.
१८) निवड नस्ती, संग्राम कक्ष, ग्राम विकास व पंचायत राज विभाग

**Most Immediate**

**RLB Release No. 4/2020 – 21**

**AMOUNT TO BE CREDITED IN THE ACCOUNTS OF THE STATE GOVERNMENTS**

F.15(4)FC-XV/FCD/2020-25
Government of India
Ministry of Finance
Department of Expenditure
Finance Commission Division

Block No. XI,5th Floor,CGO Complex,
New Delhi-110003.
Dated:-**17-06-2020**

To,

The Accounts Officer (State- Loan),
O/o the Chief Controller of Accounts,
Department of Expenditure,
Ministry of Finance, North Block,
**New Delhi**-110001.

Subject: Release of 1st instalment of Rural Local Bodies Basic grant (untied) to the State Government(s) as recommended by the Fifteenth Finance Commission (FC-XV).

Sir,

The undersigned is directed to convey the approval of Competent Authority in the Government of India for release of **Rs.10.50 Crore** (Rupees Ten crore and Fifty Lakh Only) to the State Government(s) during 2020-21 as per the recommendations of the FC-XV, as per details given below;

**(Rs. in crore)**

| Sl. No. | State | Amount of Rural Local Body Grant(untied) being released |
|---|---|---|
| 1. | **Sikkim** | **10.50** |
| | **Total** | **10.50** |

2. The State Government(s) is/are advised to ensure that the aforementioned amount of **Rs. 10.50 crore** is allocated to General Areas and Excluded Areas, if any (where Part IX & IXA of the constitution does not apply) within the State using population of 2011 Census with a weight of 90% and Area with a weight of 10%.

3. Grants apportioned for **Excluded Areas** (if any) as per para 2 above shall be directly transferred by the State Finance Department to the concerned Autonomous District Councils(ADC)/Village Councils Boards(VCB)/Gram Sabhas(as the case may be) through the concerned Administrative departments/nodal departments looking after Panchayati Raj/ADC/VCB matters .

4. Grants apportioned for **General Areas** shall be distributed as per the inter se share finalized for all tiers of Panchayats and distributed within each tier across the State on the basis of accepted recommendations of the latest State Finance Commission (SFC). However, in case of non-availability of SFC recommendation for distribution, the allocations should be on the basis of population and area in the ratio of 90:10.

Contd…..2/-

6. The above basic grants are untied and can be used by the local bodies for location-specific felt needs, except for salary or other establishment expenditure.

7. The above local body grant will be governed as per the provisions in the Operational Guidelines issued on the subject vide OM No. F.15(2)FC-XV/FCD/2020-25, dated **01-06-2020.**

8. PAO-State Loan, O/o the Chief Controller of Accounts, Department of Expenditure, Ministry of Finance, North Block, New Delhi is requested to advise the Reserve Bank of India, Nagpur to credit the above amount to the accounts of the respective State Government(s).

9. The payments are adjustable in the accounts of the Ministry of Finance in Demand Grant No. 038 - Transfers to State and Union Territory Government(s) for the year 2020-2021 under **Function Head 3601071020100, Object Head 31,** Scheme **code 2084** as **Grants for Local Bodies(3.01 Rural Bodies).**

10. The action taken on this letter may be intimated to this Division.

(Bhartendu Kumar Singh)
Director (FCD)
Tel. No. 24360647(O)

Copy to:

| Sl. No. | Name |
|---|---|
| 1 | The Secretary, RBI, Central office, Mumbai. |
| 2. | The Manager, RBI, CAS, Nagpur. |
| 3 | The Secretary, Ministry of Panchayti Raj, Krishi Bhawan, New Delhi. |
| 4 | The Manager, RBI, Central Accounts Section, Nagpur. |
| 5 | The Budget Division (States Section), DEA, North Block, New Delhi. |
| 6 | The PAO, Department of Expenditure (DOE), North Block, New Delhi. |
| 7 | The Accountant General (A&E), concerned State Government(s). |
| 8 | The Accountant General (Audit), concerned State Government(s). |
| 9 | The Secretary (Finance), concerned State Government(s). |
| 10 | The Secretary (Panchayati Raj), concerned State Government(s). |

(Bhartendu Kumar Singh)
Director (FCD)
Tel. No. 24360647(O)

**Most Immediate**

**RLB Release No. 3/2020 – 21**

**AMOUNT TO BE CREDITED IN THE ACCOUNTS OF THE STATE GOVERNMENTS**

F.15(4)FC-XV/FCD/2020-25
Government of India
Ministry of Finance
Department of Expenditure
Finance Commission Division

Block No. XI,5th Floor,CGO Complex,
New Delhi-110003.
Dated:-**17-06-2020**

To,

The Accounts Officer (State- Loan),
O/o the Chief Controller of Accounts,
Department of Expenditure,
Ministry of Finance, North Block,
**New Delhi**-110001.

Subject: Release of 1st instalment of Rural Local Bodies Basic grant **(untied)** to the State Government(s) as recommended by the Fifteenth Finance Commission (FC-XV).

Sir,

The undersigned is directed to convey the approval of Competent Authority in the Government of India for release of **Rs.15177.00 Crore** (Rupees Fifteen Thousand One Hundred Seventy Seven crore Only) to the State Government(s) as per details given in **Annexure-I (page-3),** during 2020-21 as per the recommendations of the FC-XV;

2. The State Government(s) is/are advised to ensure that the aforementioned amount of Rs. **15177.00 crore** is allocated to General Areas and Excluded Areas, if any (where Part IX & IXA of the constitution does not apply) within the State using population of 2011 Census with a weight of 90% and Area with a weight of 10%.

3. Grants apportioned for **Excluded Areas** (if any) as per para 2 above shall be directly transferred by the State Finance Department to the concerned Autonomous District Councils(ADC)/Village Councils Boards(VCB)/Gram Sabhas(as the case may be) through the concerned Administrative departments/nodal departments looking after Panchayati Raj/ADC/VCB matters .

4. Grants apportioned for **General Areas** shall be distributed as per the inter se share finalized for all tiers of Panchayats and distributed within each tier across the State on the basis of accepted recommendations of the latest State Finance Commission (SFC). However, in case of non-availability of SFC recommendation for distribution, the allocations should be on the basis of population and area in the ratio of 90:10.

5. The States (State Finance Department) shall transfer grants-in-aid within ten working days of receipt from the Union Government without any deduction. Any delay beyond ten working days will require the State Governments to release the same with interest as per the effective rate of interest on market borrowings/State Development Loans (SDLs) for the previous year.

Contd…..2/-

5. The States (State Finance Department) shall transfer grants-in-aid within ten working days of receipt from the Union Government without any deduction. Any delay beyond ten working days will require the State Governments to release the same with interest as per the effective rate of interest on market borrowings/State Development Loans (SDLs) for the previous year.

6. The above basic grants are untied and can be used by the local bodies for location-specific felt needs, except for salary or other establishment expenditure.

7. The above local body grant will be governed as per the provisions in the Operational Guidelines issued on the subject vide OM No. F.15(2)FC-XV/FCD/2020-25, dated 01-06-2020.

8. PAO-State Loan, O/o the Chief Controller of Accounts, Department of Expenditure, Ministry of Finance, North Block, New Delhi is requested to advise the Reserve Bank of India, Nagpur to credit the above amount to the accounts of the respective State Government(s).

9. The payments are adjustable in the accounts of the Ministry of Finance in Demand Grant No. 038 - Transfers to State and Union Territory Government(s) for the year 2020-2021 under **Function Head 3601071020100, Object Head 31,** Scheme **code 2084** as **Grants for Local Bodies(3.01 Rural Bodies).**

10. The action taken on this letter may be intimated to this Division.

(Bhartendu Kumar Singh)
Director (FCD)
Tel. No. 24360647(O)

Copy to:

| Sl. No. | Name |
|---|---|
| 1 | The Secretary, RBI, Central office, Mumbai. |
| 2. | The Manager, RBI, CAS, Nagpur. |
| 3 | The Secretary, Ministry of Panchayti Raj, Krishi Bhawan, New Delhi. |
| 4 | The Manager, RBI, Central Accounts Section, Nagpur. |
| 5 | The Budget Division (States Section), DEA, North Block, New Delhi. |
| 6 | The PAO, Department of Expenditure (DOE), North Block, New Delhi. |
| 7 | The Accountant General (A&E), concerned State Government(s). |
| 8 | The Accountant General (Audit), concerned State Government(s). |
| 9 | The Secretary (Finance), concerned State Government(s). |
| 10 | The Secretary (Panchayati Raj), concerned State Government(s). |

(Bhartendu Kumar Singh)
Director (FCD)
Tel. No. 24360647(O)

**ANNEXURE-I**

**RLB Release Sanction Order No.3/2020-21 dated 17/06/2020**

| S. No. | Name of State | Amount of 1st instalment of RLB's Basic grant (untied) for the year 2020-21 (Rs. in crore) |
|---|---|---|
| | | |
| 1 | Andhra Pradesh | 656.25 |
| 2 | Arunachal Pradesh | 57.75 |
| 3 | Assam | 401.00 |
| 4 | Bihar | 1254.50 |
| 5 | Chhattisgarh | 363.50 |
| 6 | Goa | 18.75 |
| 7 | Gujarat | 798.75 |
| 8 | Haryana | 316.00 |
| 9 | Himachal Pradesh | 107.25 |
| 10 | Jharkhand | 422.25 |
| 11 | Karnataka | 804.25 |
| 12 | Kerala | 407.00 |
| 13 | Madhya Pradesh | 996.00 |
| 14 | Maharashtra | 1456.75 |
| 15 | Manipur | 44.25 |
| 16 | Meghalaya | 45.50 |
| 17 | Mizoram | 23.25 |
| 18 | Nagaland | 31.25 |
| 19 | Orissa | 564.50 |
| 20 | Punjab | 347.00 |
| 21 | Rajasthan | 965.50 |
| 22 | Tamil Nadu | 901.75 |
| 23 | Telangana | 461.75 |
| 24 | Tripura | 47.75 |
| 25 | Uttar Pradesh | 2438.00 |
| 26 | Uttarakhand | 143.50 |
| 27 | West Bengal | 1103.00 |
| | **Total** | **15177.00** |

*****

केंद्र शासनाने विकसित केलेल्या
PRIASoft - PFMS
कार्यप्रणाली च्या वापराबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन परिपत्रक क्र. पिईएस 2320/प्र.क्र.22/आसक
बांधकाम भवन, मर्झबान पथ,फोर्ट,मुंबई
दिनांक: ~~8~~ १८ जून, 2020

**शासन परिपत्रक:-**

केंद्र शासनाच्या सूचनेनुसार केंद्रीय वित्त आयोगाचा निधी वितरित करण्याकरिता PFMS प्रणाली राबविण्यात येत आहे. केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीमधून करण्यात येणारी सर्व प्रदाने PFMS प्रणालीवरून करण्याच्या सूचना केंद्र शासनाने दिल्या आहेत. त्याकरिता PFMS प्रणाली PRIASoft या प्रणालीसोबत संलग्न (Integrate) करणे आवश्यक आहे. त्याकरिता कोणकोणत्या तांत्रिक बाबींची पूर्तता करावयाची आहे, त्याची सविस्तर कार्यपद्धती सोबत जोडलेल्या प्रपत्रातील User Manual मध्ये देण्यात आली आहे.

2. राज्यातील सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), गटविकास अधिकारी, ग्रामसेवक व सरपंच यांनी सोबतच्या मॅन्युअल नुसार कार्यवाही करावी.

3. या प्रणालीद्वारे Vendor Payment - Fund Transfer Order (FTO) डिजिटल स्वाक्षरी प्रमाणित करावयाचे आहेत. अर्थातच कोणत्याही परिस्थितीत चेक द्वारे पेमेंट अदा करता येणार नाहीत. आपल्या ग्रामपंचायतद्वारे योग्य त्याच Vendors ला डिजिटल पेमेंट अदायगी करण्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रामसेवक व सरपंच यांची असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Pravin Jain
(प्रवीण जैन)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व उप मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व गट विकास अधिकारी, पंचायत समिती
सर्व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत
सर्व सरपंच, ग्रामपंचायत
कार्यासन वित्त-4, ग्रामविकास विभाग मुंबई
ग्रामविकास विभागातील सर्व कार्यासने
निवड नस्ती - कार्यासन आसक
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त मुख्य सचिव, ग्रामविकास यांचे स्वीय सहाय्यक


Scanned with CamScanner

# User Manual

**(1) Digital Signature Certificate (DSC) Register करण्याची कार्यपद्धती :-**

1. **https://aacountingonline.gov.in** या वेबसाइटवरून Requirements of PRIASOFT + PFMS Integration for FFC Scheme ही झिप फाईल Download करावी.

2. झिप फाईल Extract करावी व त्यामध्ये असलेले JDK_8u191 हे सॉफ्टवेअर संगणकात Install करावे. तसेच DSC Signer.exe हा टूल Install करावा.

3. झिप फाईल मध्ये PPT मध्ये दर्शविल्याप्रमाणे सोबत दिलेल्या rootCA.crt Import करावे.

**(अ) उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची DSC Registration करण्याची कार्यपद्धती:-**

1. जिल्हा परिषदेला दिलेल्या User Name व Password च्या सहाय्याने **https://egramswaraj.gov.in** या वेबसाईटवर लॉगिन करावे.
2. लॉगिन केल्यानंतर Master Entry या मेनुमध्ये DSC management -> Register your DSC या पर्यायावर क्लिक करा. व उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची DSC संगणकाला जोडा.
3. Desktop वरील Icon DSC Signer हा टूल Run करा. आता उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांची DSC select होईल व पिन टाकण्यासाठी विचारण्यात येईल. DSC PIN टाकुन ok या बटणावर क्लिक करा.
4. आपणास Dy CEO (VP) यांची माहिती दर्शविली जाईल. आता Save DSC या बटनावर क्लिक करावे.
5. क्लिक केल्यानंतर OTP Generate होईल व Registered Mobile क्रमांकावर पाठविण्यात येईल. OTP enter करून submit बटनावर क्लिक करावे.
6. DSC Registration प्रक्रिया पूर्ण होऊन State Admin कडे Approval करीता जाइल.

**(ब) गटविकास अधिकारी यांची DSC Register करणे :-**

वरील प्रमाणेच गटविकास अधिकारी यांनी त्यांची DSC Register करून घ्यावी आणि DyCEO यांनी त्यांच्या लॉगिन मधून BDO यांनी Register केलेल्या DSC ला Approval द्यावे.

**** EGRAMSWARAJ प्रणाली मध्ये जिल्हयाचे लॉगिन करून BDO यांची DSC Profile Approve करावी.**

**(क) EGRAMSWARAJ-PFMS Integration Activity for Checker- ग्रा.पं. सरपंच / Maker - ग्रा.पं. ग्रामसेवक.**

1. जिल्हास्तरावरून आपणास मिळालेले **Checker सरपंच** आणि **Maker ग्रामसेवक** यांचे User ID व Password EGRAMSWARAJ या आज्ञावलीमध्ये BADMIN LOGIN मधुन सर्व **Checker सरपंच** आणि **Maker ग्रामसेवक** यांचे password रीसेट करून द्यावेत.


Scanned with CamScanner

2. पासवर्ड रीसेट करण्याकरिता BADMIN लॉग इन करून मास्टर मेनूमध्ये user reset password वर क्लिक करा. त्यानंतर संबंधित ग्रा.पं.च्या Checker सरपंच यांचा user name enter करा, नवीन Password (उदा. Admin@123) ठेवा व पुढील प्रक्रिया पूर्ण करा. नंतर BADMIN यांच्या Registered ई-मेल वर आलेला OTP (दोन्ही ठिकाणी) enter करा आणि submit बटन वर क्लिक करा.
3. वरील प्रमाणेच **Maker ग्रामसेवक** यांचे पासवर्ड रीसेट करून घ्यावे.
4. जिल्हास्तरावरून मिळालेले **Checker सरपंच** आणि **Maker ग्रामसेवक** यांचे password रिसेट केल्यानंतरच ग्रामपंचायत स्तरावर ग्रामसेवक यांना पाठवून दयावेत. रिसेट केल्यानंतर user ID व password यांची मास्टर फाईल आपल्या पंचायत समिती रेकॉर्डला जतन करून ठेवावे.

**(ड) ग्रामपंचायत स्तरावरील Activity कार्यपद्धती - ग्रामसेवक आणि सरपंच यांची माहिती अद्यावत करणे.**

1. ग्रामपंचायत स्तरावरील Activity :- आपणास प्राप्त झालेल्या user ID व पासवर्ड ने लॉगिन केल्यानंतर Checker सरपंच आणि Maker ग्रामसेवक यांचे Profile update करणे अनिवार्य आहे.

- **Checker सरपंच profile संबधित ग्रा.पं.सरपंच यांची खालील माहिती अचूक नोंदवावी.**
  1. नाव :-
  2. ग्रामपंचायत:
  3. पदनाम:-सरपंच
  4. मोबाईल क्रं:- (अद्यावत व कार्यरत असलेला क्रमांक द्यावा).
  5. ई-मेल:-(अद्यावत व कार्यरत असलेला ईमेल आयडी द्यावा).
- **Maker ग्रामसेवक profile संबंधित ग्रा.पं. ग्रामसेवक यांची खालील माहिती अचूक नोंदवावी.**
  1. नाव:
  2. ग्रामपंचायत:
  3. पदनाम:
  4. मोबाईल क्र:- (अद्यावत व कार्यरत असलेला क्रमांक द्यावा)
  5. ई-मेल:-( अद्यावत व कार्यरत असलेला ईमेल आयडी द्यावा)

**(ई-मेल व मोबाईल क्रमांक अचूक व कार्यरत असलेला पाहिजे यावर ओटीपी पाठविण्यात येतो.)**

2. वरील प्रमाणे माहिती साठवून झाल्यानंतर सर्व माहिती BDO यांना Approval करिता पाठविली जाईल. BDO यांनी Profile Approval दिल्यानंतर पुन्हा लॉगिन करून DSC enroll करता येईल.

**(ई) ग्रामसेवक आणि सरपंच यांची यांची DSC Enroll करणे:-**

1. **ग्रामसेवक आणि सरपंच यांची DSC Enroll करण्यासाठी आपल्या ग्रा. पं. चे Day Book last day (शेवटचा दिवस) म्हणजे कालच्या तारखेपर्यत लेखे नोंद करून Closing करणे अनिवार्य आहे.**
2. Dsc Enroll करण्यासाठी आवश्यक फाईल PRIASOFT HOME PAGE वरून डाऊनलोड करून **DSC Register करण्याची कार्यपद्धती** नुसार आपल्या संगणकात इन्स्टॉल करून घेणे अनिवार्य आहे.
3. ज्या ग्रा.पं.चे कालच्या दिवसा पर्यंतचे Day book close झालेले आहेत, अशाच ग्रा.पं.चा checker /maker ID ने eGramswaraj आज्ञावली मध्ये लॉगीन करावे व DSC enroll करावी.
4. **Checker सरपंच यांची DSC enroll करणे.**

- EGRAMSWARAJ आज्ञावली मध्ये सरपंच Checker यांचे लॉग इन करावे.


Scanned with CamScanner

- Master menu मध्ये DSC management मधील Register Your DSC ला क्लिक करावे.
- सरपंच Checker यांची DSC जोडुन व DSC PIN ENTER करून DSC ENROLL करावी.

5. **Maker ग्रामसेवक यांची DSC Enroll करणे:-**

- EGRAMSWARAJ आज्ञावली मध्ये maker ग्रामसेवक यांचे लॉगिन करावे.
- Master menu मध्ये DSc management मधील Register your DSC ला क्लिक करावे.
- ग्रामसेवक Maker यांची DSC जोडुन व DSC PIN ENTER करून DSC enroll करावी

6. आपल्या ग्रा.पं.चा checker /maker ID Active झाल्यानंतर आपण केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीचा जमा खर्च Online व Real Time पद्धतीने करू शकता.

(2) **गट विकास अधिकारी यांच्या करीता सुचना:-**

अ) BDO LOGIN करून सर्व ग्रामपंचायतींच्या Checker सरपंच आणि Maker ग्रामसेवक यांची profile तपासुन Approve करावी. त्याकरिता master menu मध्ये DSC management वरून approve DSC वर क्लिक करावे.

ब) Checker सरपंच आणि maker ग्रामसेवक यांची Dsc योग्य आहे व मुदत संपलेली नाही याची खात्री करून DSC approve करावी.

**(3) Maker/Checker DSC Genaration**

Maker Login मध्ये DSC Genarate पर्याय निंवडून त्या मध्ये १४ वित्त आयोग योजना निवड करून Genarate DSC> tab ला click करावे.
DSC Genarate झाल्या नंतर Maker च्या DSC ने eSign करावे तसेच checker चे देखील याच प्रमाणे eSign करून घ्यावे.

**** Checker/Maker DSC ENROLL केल्यानंतर Vendor Registration करावे.

**(4) Vendor Registration (Agency Registration)**

**Step 1 :-**

- **ग्रामसेवकांनी Maker** login द्वारे EGRAMSWARAJ लॉग इन करावे.
- मास्टर मेनू मध्ये जाऊन एजन्सी पर्याय निवडावा. या पर्यायाला Vendor Registration ही म्हणतात
- Vendor registration पर्यायांमध्ये विचारलेल्या प्रमाणे माहिती भरून घ्यावी.

Vendor Details माहिती (उदा.नाव,खाते क्रं,TAN,PAN,GST,etc.) **Vendor** खाते क्र. राष्ट्रीकृत बॅकेतील असावा.

**Step 2 :-**

- Vendor माहिती eSign पर्यायांमध्ये साठविली जाऊन ह्या माहितीला प्रमाणित करण्यास maker DSC ने sing करावी.
- Vendor माहिती यानंतर Checker लॉगीनला उपलब्ध होईल.


Scanned with CamScanner

- Checker लॉगीनने नोंदविलेली माहिती बरोबर असल्याचे प्रामाणिकरण करण्यास Checker ने DSC sing करून घ्यावी.
- प्रमाणित झालेली Vendor माहिती PFMS Account Verify साठी पुढे प्रोसेस होईल. Account Verify झाल्यास Manage>View मध्ये PFMS code तयार झालेला दिसून येईल.

**3. Resident/Employee Registration :- Step 1:-**

- ग्रामसेवकांनी Maker login द्वारे EGRAMSWARAJ लॉग इन करावे.
- मास्टर मेनू मध्ये जाऊन Employee पर्याय निवडावा. या पर्यायाला Resident/Employee Registration ही म्हणतात.
- Employee registration पर्यायांमध्ये विचारलेल्या प्रमाणे माहिती भरून घ्यावी.
  Employee Details माहिती (उदा.नाव,खाते क्रं,DOB,etc.) खाते क्र. राष्ट्रीकृत बॅकेतील असावा.

**(5) Resident/Employee Registration Step 2 :-**

- Employee माहिती eSign पर्यायांमध्ये साठविली जाऊन ह्या माहितीला प्रमाणित करण्यास maker DSC ने sing करावी.
- Employee माहिती यानंतर Checker लॉगीनला उपलब्ध होईल.
- Checker लॉगीनने नोंदविलेली माहिती बरोबर असल्याचे प्रामाणिकरण करण्यास Checker ने DSC sing करून घ्यावी.
- प्रमाणित झालेली Employee माहिती PFMS Account Verify साठी पुढे प्रोसेस होईल. Account Verify झाल्यास Manage>View मध्ये PFMS code तयार झालेला दिसून येईल.

प्रमाणित झालेल्या Vendor (Agency, Resident, Employee) यांना पेमेंट अदा करण्यासाठी FTO - Payment Voucher Add करता येईल.

**(6) Online Payment Voucher :-**

1. Day close (payment voucher date 19.05.2020 असल्याल 18.05.2020 दिनांक close असणे अनिवार्य)
2. Voucher Transaction मध्ये payment voucher add करावा व mode of payment select करावे त्यामध्ये PFMS पर्याय निवडा.
3. voucher Freeze करावे.

**(7) Transfer Order (FTO) :-**

1. Sign FTO करिता चालू दिवस close करणे अनिवार्य.
2. Maker Dsc ने voucher FTO approved करावे व checker DSC लोगिन याच प्रकारे approved करावे.
3. Payment Status स्तर
4. Initiated
5. Acknowledged
6. Credited

**(8) Voucher :-**



Scanned with CamScanner

- https://pfms.nic.in login मध्ये my fund पर्याय निवडून आलेला निधी Acknowleged करावे.त्याची receipt entry auto Freeze mode मध्ये साठविले जाते.परंतु या सर्व बाबीस चालू दिवसclose असणे अनिवार्य आहे.
- https://egramswaraj.gov.in/pfmsDashboard.do या लिंक द्वारे pfms अहवाल तपासणी करू शकता.

टीप :- या प्रणालीद्वारे Vendor Payment - **Fund Transfer Order (FTO) डिजिटल स्वाक्षरी प्रमाणित करावयाचे आहेत. अर्थातच कोणत्याही परिस्थितीत चेक द्वारे पेमेंट अदा करता येणार नाहीत. आपल्या ग्रामपंचायतद्वारे योग्य त्याच Vendors ला पेमेंट अदायगी करण्याची सर्वस्वी जबाबदारी ग्रामसेवक व सरपंच यांची असेल.**

..............................xxxxxxx..............................


Scanned with CamScanner

**१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना.**

## महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग

शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५९/ वित्त-४

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

तारीख: २६ जून,२०२०.

**संदर्भ -**

१. शासन निर्णय क्रमांक पविआ/२०२०/प्र.क्र.३१/वित्त-०४ दि.०९.०३.२०२०.
२. शासन पत्र क्रमांक :- जीपीडीपी-२०२०/प्र.क्र.३१/ पंरा-६ , ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक २८.०४.२०२०.
३. शासन निर्णय क्रमांकः पेमेंट ४७१९/प्र.क्र.०७/ आ.स.क. ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक १९.०५.२०२०.
४. केंद्र शासनाचे पत्र क्र.१५(२)एफसी-एक्सव्ही/एफसीडी/२०२०-२५, दि.१.६.२०२० चे पत्र.
५. केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ.५(४) एफसी-एक्सव्ही /एफसीडी /२०२०-२५, दि.१७.६.२०२० चे पत्र

**प्रस्तावना -**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार दि.१ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२५ या कालावधीत केंद्रशासनाकडून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला मुलभूत /बेसिक अनुदान (अनटाईड ) व बंधित अनुदान ( टाईड ) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात निधी देण्यात येणार आहे. प्रस्तुत अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत या तिन्ही स्तरासाठी उपलब्ध करण्यात येणार आहे.

२. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या दि.१ एप्रिल, २०२० ते दि. ३१ मार्च, २०२५ या पाच वर्षाच्या कालावधीत ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी निधी प्राप्त होणार आहे. केंद्र शासनाने राज्यांसाठी निधी वितरीत करताना सदर निधीची परिगणना सन २०११ च्या जनगणनेनुसारची लोकसंख्या व क्षेत्रफळ या निकषांनुसार केली आहे. प्रस्तुत निधी १) मुलभूत /बेसिक अनुदान (अनटाईड ) व २) बंधित अनुदान (टाईड ) या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणार असून ते ५०-५०% च्या प्रमाणात विभागण्यात आले आहे. त्यानुसार १५ व्या वित्त आयोगांतर्गत वरील दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणारा निधी पंचायत राज संस्थाना वितरणाबाबत १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशी तसेच केंद्रिय

पंचायतराज मंत्रालयाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील पंचायतराज संस्थांसाठी निधी वितरित करण्याबाबतचे निकष ठरविणे, वितरित निधीतून पंचायतराज संस्थानी करावयाच्या बाबी ठरविणे तसेच निधी खर्च करताना पंचायतराज संस्थानी पालन करावयाची मार्गदर्शक तत्वे/सूचना ठरविणे याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**<u>शासन निर्णय -</u>**

**अ)** १५ व्या वित्त आयोगाच्या अंतरिम अहवालातील ( सन-२०२०-२१) प्रकरण-५ मुद्दा क्र.५.३ (v ) नुसार केंद्र शासनाव्दारे प्राप्त स्थानिक स्वराज्य संस्थांकरिताचा निधी संबंधित राज्याच्या वित्त विभागाव्दारे संबंधित पंचायत राजच्या तिन्ही स्तरांवर (ग्रामपंचायत,पंचायत समिती, जिल्हा परिषद ) खालीलप्रमाणे हस्तांतरीत करण्यात येईल.

**<u>निधी वितरणाचे प्रमाण -</u>**

मुलभूत/बेसिक अनुदान (अनटाईड) व बंधित अनुदान (टाईड) या दोन्ही अनुदानाच्या वितरणाचे पंचायतराजच्या प्रत्येक स्तरावरील निश्चित प्रमाण (exact proportion ) राज्य शासनाव्दारे खालील प्रमाणे ठरविण्यात आले असून याबाबत संदर्भीय क्रमांक १ अन्वये दि.०९.०३.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

| अ.क्र. | स्थानिक स्वराज्य संस्था | निधी वितरण प्रमाण |
|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत | ८०% |
| २ | पंचायत समिती | १०% |
| ३ | जिल्हा परिषद | १०% |

१५ व्या वित्त आयोगाच्या अंतरिम अहवालातील (सन २०२०-२१ )प्रकरण-५ मुद्दा क्र.५.३ ( ii ) आणि (v) नुसार १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधी वितरणाचे निकष खालीलप्रमाणे आहेत.

**<u>निधी वितरणचे निकष</u>**

| अ.क्र. | निकष | टक्केवारी |
|---|---|---|
| १ | जिल्हयाची ग्रामीण लोकसंख्या (सन-२०११ च्या जनगणनेनुसार) | ९०% |
| २ | जिल्हयाचे ग्रामीण क्षेत्रफळ | १०% |
| | एकूण | १००% |

सदर हस्तांतरण, केंद्रशासनाकडून निधी प्राप्त झाल्यापासून १० कार्यालयीन दिवसांच्या आत वितरित होणे अनिवार्य आहे. निधी वितरणास विलंब झाल्यास सदर निधी व्याजासहीत वितरित करावा लागेल. मागील वर्षाच्या बाजार कर्जावरील प्रभावी व्याज दराच्या प्रमाणात हे व्याज आकारण्यात येईल.

**ब) <u>१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधीतून पंचायत राज संस्थांनी करावयाच्या बाबी</u>**

१. **<u>मुलभूत / बेसिक अनुदान</u>** हा अबंधित (अनटाईड) स्वरूपाचा आहे.सदर अनुदानाचा ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजांनुसार (Location Specific felt Needs ) आवश्यक बाबींवर वापर करावा.

२. **<u>बंधित / टाईड अनुदान</u>**

बंधित अनुदानचा वापर पुढील पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे :-

१. स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरूस्ती

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुर्नभरण / पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), जल पुर्नप्रक्रिया (वॉटर रिसायकलींग).

बंधित अनुदानाचा ५०% निधी हा वरील नमूद दोन बाबींसाठी करावयाचा आहे. जर वरील दोन बाबींपैकी एकाची पुर्णत: अमलबजावणी झाली असेल तर त्यासाठीचा निधी दुस-या बाबीसाठी खर्च करण्यात यावा.

**क) <u>अनुदान वितरणाची कार्यपध्दती</u>**

१. **<u>मुलभूत /बेसिक अनुदान ( अनटाईड )</u>** :- पंचायत राज मंत्रालयाच्या शिफारशींच्या आधारे मुलभूत अनुदानाचे वितरण २ हप्त्यांमध्ये वित्त आयोग कक्ष, वित्त मंत्रालय, भारत सरकार यांचे व्दारे वितरित करण्यात येईल. त्यासाठी हप्ता वितरणानंतर केंद्र शासनाच्या दि.१.६.२०२० च्या पत्रातील ANNCXURE II मध्ये देण्यात आलेल्या मसूद्यात निधी हस्तांतरण प्रमाणपत्र केंद्र शासनास सादर करणे अनिवार्य आहे.

२. **<u>बंधित / टाईड अनुदान</u>** :- पंचायत राज मंत्रालय (भारत सरकार) यांच्या शिफारशींच्या आधारे बंधित अनुदानाचे २ हप्त्यांमध्ये वितरण करण्यात येईल. <u>अनुदानाची शिफारस करण्यापुर्वी</u> पेयजल स्वच्छता विभाग, जलशक्ती मंत्रालय आणि पंचायत राज मंत्रालय व्दारा खालील बाबींचे मुल्यांकन करण्यात येईल.

१. हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थाची देखभाल आणि स्थिती.

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुर्नभरण / पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिग), जल पुर्नप्रक्रिया (वॉटर रिसायकलींग).

३. GPDP (ग्रामपंचायत विकास आराखडा) अपलोड करणे तसेच १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या उपयोगीता संबंधित माहिती वेबसाईटवर भरणे.

४. जलशक्ती मंत्रालयाव्दारे नमूद अटी व्यतिरिक्त बंधित अनुदानाच्या उद्येशा संबंधित देण्यात आलेल्या इतर अटींची पुर्तता करणे.

सन २०२१-२२ चे पात्रता मुल्यांकन सन २०२०-२१ च्या परिणामांवर आधारीत असेल. पुढील वर्षासाठी सुध्दा समान प्रक्रिया राबविली जाईल.

**ड) मार्गदर्शक सूचना :- .**

१) १५ व्या वित्त आयोगाच्या निधी राज्य शासनाकडून जिल्हा परिषदांना वितरीत करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी (जिल्हा परिषद ) यांच्या बी.डी.एस. वर प्राप्त झाल्यानंतर जिल्हा परिषदांनी तो निधी तात्काळ कोषागारातून काढून १५ व्या वित्त आयोगासाठी स्वतंत्रपणे उघडण्यात आलेल्या बँक खात्यात जमा करून घ्यावा. जिल्हा परिषदांना अनुदान प्राप्त झाल्यानंतर ते विहीत केलेल्या निकषांच्या आधारे तातडीने (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत) खात्यावर इ.सी.एस. ( Electronic Clearance System) / एन.इ.एफ.टी. (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस.( Real Time Gross Settlement ) या आधुनिक बँकिंग सिस्टीमद्वारे संबंधित (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत) खात्यावर वर्ग करावयाचे आहे. त्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ज्या बँका निधी हस्तांतरणाच्या वरील आधुनिक सुविधा उपलब्ध करुन देतील, अशा आय.एफ.एस.सी. (IFSC) कोड धारण केलेल्या व एम.आय.सी.आर. (MICR) कोड असलेल्या **राष्ट्रीयकृत बँकेत बचत खाते उघडण्यात यावे.**

२) १५ व्या वित्त आयोगाचा निधी पंचायत राज संस्थांनी (जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायत ) राष्ट्रीयकृत बँकामध्ये वरील अनु.क्र. १ मध्ये नमूद केल्यानुसार सेवा उपलब्ध करून देईल, त्या बँकेच्या बचत खात्यातच ठेवावा.

३) सद्याच्या कोरोणाच्या वाढत्या प्रादूर्भावामुळे उद्दभवलेल्या तांत्रिक व प्रशासकीय आडचणीमुळे १५ व्या वित्त आयोगाच्या बेसिक ग्रँटच्या पहिल्या हफ्त्याचे वितरण पंचायतराज संस्थांना अर्थसंकलपीय वितरण प्रणाली द्वारे (BEAMS वर ) करण्यात येत आहे.या पुढील ग्रँटच्या हफ्त्याचे वितरण (PFMS) Public Finance Management System द्वारे पंचायतराज संस्थाच्या तिन्ही स्तरांवर करण्यात येईल.

४) १५ व्या वित्त आयोगांतर्गत खात्यातील व्यवहार ग्रामपंचायतीच्या नावाने सरपंच व ग्रामसेवक / ग्रामविकास अधिकारी संयुक्त स्वाक्षरीने व्हावे. तसेच पंचायत समितीच्या नावाने गट विकास अधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या नावाने मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांच्या स्वाक्षरीने व्हावे.

५) शासनाने दिलेल्या मार्गदर्शक तत्त्वानुसार वितरीत निधीतून ग्रामपंचायतींनी त्यांच्या स्तरावर करावयाच्या बाबींच्या नियोजनाचे अधिकार व जबाबदारी ग्रामपंचायतीच्या सभेची (कमिटीची) राहील. मात्र ग्रामपंचायतीच्या सभेत (कमिटीत) घेतलेले निर्णय, ग्रामपंचायतींनी वेळोवेळी ग्रामसभेत सादर करणे आवश्यक राहील.

**६) तथापि संबंधीत पंचायत राज संस्थेस निधी प्राप्त झाल्यापासून २ महिन्याच्या कालावधीत (आचारसंहितेचा कालावधी वगळून) जर प्राप्त निधीचे नियोजन त्यांच्या सभेमध्ये झाले नाही तर त्या निधीच्या नियोजनाचे अधिकार जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी आणि ग्रामपंचायत स्तरासाठी संबंधीत ग़टविकास अधिकारी यांना राहतील. शासनाने विहित केलेल्या बाबीं व्यतिरिक्त इतर बाबींवर निधी खर्च केल्यास ती रक्कम संबंधित जबाबदार अधिका-यांकडून/कर्मचा-याकडून वसूल करण्यात येईल.**

७) वित्त आयोगाच्या निधीच्या खर्चाचे नियोजन करताना गरजेवर आधारित नियोजन होईल याचीही दक्षता घ्यावी.

८) शासनातर्फे १५ व्या वित्त आयोगांतर्गत देण्यात येणा-या बेसिक ग्रँट तथा टाईट ग्रँटचे शासनस्तरावरुन स्वतंत्र वितरण आदेश निर्गमित करण्यात येतील. त्यानुसार वरील ग्रँटचे स्वतंत्र हिशेब ठेवणे व त्यांचा पंचायतराजच्या तिन्ही स्तरासाठी एकत्रित आर्थिक व भौतिक अहवाल शासनास पाठविणे व निधी खर्च झाल्यावर त्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र शासनास व महालेखापाल कार्यालयास सादर करणे याची संपूर्ण जबाबदारी संबंधीत उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची असेल.

९) ग्रामीण स्थानिक संस्थांच्या १५ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त निधीचे हिशोब ठेवणे, त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे आणि त्यांचे लेखे प्रिया-सॉफ्ट या संगणकिय आज्ञावलीत ठेवणे, याबाबीच्या समन्वयनाची जबाबदारी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद यांना देण्यात येत असून त्यांचेवर या कामी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांचे नियंत्रण असेल.

१०) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांनी पंचायतराज संस्थाच्या तिन्ही स्तरावरील १५ व्या वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीच्या खर्चाचा आढावा घेण्यासाठी दर महिन्यात एक बैठक घ्यावी.

११) पंचायतराज संस्थाच्या तिन्ही स्तरावर १५ व्या वित्त आयोगांतर्गत वितरीत निधीमधून होणा-या बाबी/योजना/कार्यक्रम हे निकषांप्रमाणे असल्याचे तपासून त्यांचे हिशेब, आर्थिक व भौतिक अहवाल

त्या त्या तालुका गटविकास अधिका-याने त्याच्या सहीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेमार्फत दरमहा मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांना पाठवावेत.

१२) पंचायतराज समिती संस्थाच्या तिन्ही स्तरावरील निधीच्या विनियोजनाच्या नियंत्रणाची व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची राहील.

१३) मान्य योजना व कार्यक्रमांव्यतिरिक्त इतर बाबी घेऊ नयेत. इतर बाब निकडीची वाटल्यास त्यासाठी राज्य शासनाची मंजूरी घ्यावी. (या सदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या सहीच्या पत्रानेच शासनास पत्रव्यवहार करावा)

१४) मालमत्ता कर- कायद्याप्रमाणे जे कर पंचायत राज संस्था आकारु शकतात, ते कर त्यांनी पूर्णपणे आकारावेत व उपभोक्ता शुल्क (User charges) वसूल करावेत आणि त्याचा हिशेब ठेवावा.

१५) पंचायत राज संस्थांकडून नागरिकांना दिल्या जाणा-या सेवांचा दर्जा त्या सेवांबाबत शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या निकषांनुसार असेल याची दक्षता घ्यावी.

१६) ग्रामपंचायत, पंचायत समिती व जिल्हा परिषद स्तरावरील अधिकारी/कर्मचा-यांना शासनाकडून प्राप्त सूचनांबाबत अद्ययावत माहिती देण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षण वर्गांचे आयोजन करावे.

१७) शासनाने विहित केलेल्या मान्य बाबींवरच या निधीतून प्राप्त होणा-या व्याजाची रक्कम खर्च करावी व त्याचे हप्तानिहाय स्वतंत्र हिशेब ठेवावेत आणि त्याचा आर्थिक व भौतिक अहवाल दरमहा शासनास पाठवावा.

१८) ग्रामपंचायतींचे लेखा परीक्षण विहित वेळेत होईल याची काळजी घ्यावी व त्रुटींचे निराकरण तात्काळ करावे.

१९) मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा परिषद पातळीवर गुणवत्ता नियंत्रणासाठी विहित प्रक्रिया अंगीकारून आऊटसोर्सिग पध्दतीने त्रयस्त पक्ष नियंत्रण कक्ष (Third Party control / vigilance cell ) गठित करावा व पंचायत राज संस्थामार्फत होणारी कामे / दिल्या जाणा-या सेवा / योजना / कार्यक्रम यांचा दर्जा व गुणवत्ता विहित केलेल्या निकषानुसार राहील याची खबरदारी घ्यावी.

**२०) जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १५ व्या वित्त आयोगांतर्गत घेतलेल्या कामाच्या संदर्भातील प्राप्त होणा-या तक्रारीचे तात्काळ निराकरण व्हावे यासाठी जिल्हा परिषद स्तरावर तक्रार निवारण कक्ष उभारावा व तक्रारींचे निवारण वेळचेवेळी करावे.**

२१) निधी वितरणासाठी राज्य शासनाने जे निकष दिले आहेत त्यानुसार प्रगणन (Calculations) करण्यासाठी डाटाबेस तयार करुन घ्यावा म्हणजे निधी वितरण विहित वेळेत करता येईल.

२२) पंचायत राज संस्थांनी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करु नये व जास्तीचे आर्थिक दायीत्व निर्माण करु नये.

२३) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांनी ह्या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायत स्तरावरील अधिका-यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

२४) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीतून ज्या बाबीं /योजना / कार्यक्रम हाती घेण्यात आले असतील त्याचे दर्शक फलक संबंधित बाबीं /योजनां / कार्यक्रमाच्या ठिकाणी ठळकपणे दिसतील असे लावावेत.

२५) निधी वितरणास विलंब झाल्यास त्यावर द्यावयाच्या व्याजाची जबाबदारी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांची राहील.

२६) संदर्भीय क्रमांक २ मधील दि.२८.०४.२०२० च्या पत्रान्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार सन २०२०-२१ या वर्षीचा ग्रामपंचायत विकास आराखडा सुधारित करून प्लॅन प्लस वर अपलोड करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

सदर शासन निर्णय शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक **२०२००६२६१२३४१५००२०** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.06.30 14:01:37 +05'30'

**(प्रविण देविचंद जैन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.राज्यपाल यांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४) मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
५) मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
६) मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
७) मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
८) मा.अ.मु.स. (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक
९) महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
१०) महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
११) सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
१२) सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.

१३) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
१४) सर्व उपसचिव, ग्राम विकासविभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
१५) सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
१६) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१७) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
१८) सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
१९) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
२०) वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय / वित्त आयोग कक्ष.)
२१) ग्राम विकास विभाग ( सर्व कार्यासने )
२२) निवड नस्ती का.क्र.वित्त-४.

**वितरण आदेश क्रमांक: १**
**कोषागारातून रोख रक्कम देय अनुदान**
**सन २०२०-२०२१.**

**१५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या बेसिक ग्रँटच्या (अनटाईड) पहिल्या हप्त्याचे वितरण.**

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५८/ वित्त-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
तारीख: २९ जून,२०२०.

वाचा -

१. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.३१/वित्त-४,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक. ९ /३/२०२०.
२. शासन पत्र क्रमांकः जीपीडीपी-२०२०/प्र.क्र.३१/ पंरा-६ ,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक-२८/४ /२०२०
३. शासन परिपत्रक क्रमांकः पिईएस-२३२०/प्र.क्र.२२/ आसक,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक-१६/६ /२०२०
४. केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ.१५(४) एफसी-एक्सव्ही/एफसीडी /२०२०-२५ दि.१७.६.२०२० चे पत्र
५. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ५९ /वित्त-४,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक. २६/६/२०२०.

**प्रस्तावना -**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी सन २०२०-२१ च्या बेसिक ग्रँटच्या (अनटाईड ) हप्त्यापोटी रू.१४५६.७५ कोटी इतका निधी मुक्त केला असल्याचे केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ४ येथील दि.१७.६.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार १५ व्या वित्त आयोगाकडून राज्य शासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय -**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाचा सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा बेसिक ग्रँटचा (अनटाइड) स्वरूपातील पहिल्या हप्त्याचा केंद्रशासनाकडून मुक्त करण्यात आलेला रू. १४५६.७५ कोटी इतका निधी सोबतच्या विवरणपत्रात (प्रपत्र अ ) दर्शविल्याप्रमाणे सर्व जिल्हा परिषदांना (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांसाठी ) (२५१५२४७७ ) या लेखाशिर्षाखाली सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी

अधिकारी यांच्या अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे ( बीम्सवर ) वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी सर्व पंचायत राज संस्थाना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांमध्ये अनुक्रमे १०:१०:८० या प्रमाणात वितरीत करण्यात येत आहे.

२. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राप्त संपूर्ण अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना वितरीत करावयाचे आहे. त्याकरीता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बीम्सवर वितरीत करण्यात आलेला निधी त्यांनी तात्काळ कोषागारातून काढून प्रस्तुत निधीच्या जिल्हा परिषदेसाठी देण्यात आलेला १०% निधी स्वत:कडे ठेउन विहित केलेल्या निधी वाटपाच्या निकषांच्या आधारे आपल्या अधिनस्त सर्व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीना इ.सी.एस.(Electronic Clearance System)/एन.इ.एफ.टी (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस (Real Time Gross Settlement) या आधुनिक बँकिंग सिस्टीमद्वारे संबंधित पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींच्या खात्यावर तातडीने वर्ग करावा. संपूर्ण निधी विहित निकषानुसार सर्व पंचायत समिती व ग्रामपंचायतींना वितरीत करून त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या “प्रपत्र -ब” नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शासनास तातडीने सादर करावे.

३. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी, पंधराव्या वित्त आयोगाचा निधी यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार पंधराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीच्या व्यवहारासाठी उघडलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या स्वतंत्र बचत खात्यातच ( Savings Bank Account ) ठेवावा.

४. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची राहील.

५. पंधराव्या वित्त आयोगाच्या सन २०२०-२१ या पहिल्या आर्थिक वर्षाच्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानातून घ्यावयाची कामे, त्याचे नियोजन यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन दि.२६ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासूनच्या पंधराव्या वित्त आयोगाच्या वितरित निधीतून पंचायतराज संस्थानी ग्रामपंचायत विकास आराखडयानुसार कामे व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावयाची असून यासंदर्भातील सूचना ग्राम विकास विभागाकडून संदर्भाधीन दि.२८ एप्रिल, २०२० च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

६. वरील प्रक्रियेमध्ये गावातील सद्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून गावाच्या गरजांची निश्चिती करून **कामे ठरविण्याचा अधिकार ग्रामसभा व ग्रामपंचायतीला आहेत.**

७. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार बेसिक ग्रँट (अनटाईड) ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजेनुसार ( Location Specific felt needs ) आवश्यक बाबींवर वापर करावा.

८. **ग्रामपंचायतींनी पंधराव्या वित्त आयोगांतर्गत खात्यातील व्यवहार संदर्भीय क्र.३ दि. १६ जून, २०२० च्या शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात यावी.**

९. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करू नये व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करू नये.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरासाठी वरील वितरीत निधीतून होणारा खर्च "मागणी क्र एल-३, २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १९८- ग्रामपंचायतीस सहाय्य (००) (०८) १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना विविध विकास योजनांसाठी अनुदाने (जनरल बेसिक ग्रँट) (२५१५ २४७७), (योजनेतर) ३१-सहाय्यक अनुदाने"(वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकावा.

११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ह्या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

१२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. १४-२०२० वित्त आयोग कक्ष, दिनांक २४/६/२०२० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.**२०२००६२९११२१०१७२२०** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.06.29 14:08:25 +05'30'

**(प्रविण देविचंद जैन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
४) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
५) सर्व जिल्हा परिषदांचे मा. अध्यक्ष,
६) सर्व मा. विधानसभा व विधान परिषद सदस्य,
७)मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
८)महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतींसह),
९)महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतींसह),
१०)अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११)सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहायक,
१२) सर्व विभागीय आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय,
१३) सर्व सह/उप सचिव, ग्राम विकास विभाग,
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,

१५) संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे,

१६) संचालक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई,

१७) सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद ,

१८) सर्व महसूल विभागाचे उप आयुक्त (विकास),

१९) सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),

२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,

२१) गट विकास अधिकारी (सर्व) (संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या मार्फत),

२२) वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय/वित्त आयोग कक्ष/अर्थसंकल्प- १७),

२३) ग्राम विकास विभाग (सर्व कार्यासने),

२४) निवड नस्ती (वित्त-४).

## प्रपत्र- अ

## बेसिक ग्रँट

### वितरण आदेश क्र. १ क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५८ / वित्त-४, दिनांक २९ /०६/२०२० चे विवरणपत्र

(रू.हजारात)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ठाणे | २२२२९ | २२२२९ | १७७८२९ | **२२२२८७** |
| २ | पालघर | ३६२२३ | ३६२२३ | २८९७८६ | **३६२२३२** |
| ३ | रायगड | ३८८१६ | ३८८१६ | ३१०५२६ | **३८८१५८** |
| ४ | रत्नागिरी | ३२७२६ | ३२७२६ | २६१८११ | **३२७२६३** |
| ५ | सिंधुदूर्ग | १८३२४ | १८३२४ | १४६५९२ | **१८३२४०** |
| ६ | नाशिक | ८२०४४ | ८२०४४ | ६५६३४९ | **८२०४३७** |
| ७ | धुळे | ३४९६७ | ३४९६७ | २७९७३६ | **३४९६७०** |
| ८ | नंदूरबार | ३२१०२ | ३२१०२ | २५६८१८ | **३२१०२२** |
| ९ | जळगाव | ६७१२० | ६७१२० | ५३६९५६ | **६७११९६** |
| १० | अहमदनगर | ८५३९७ | ८५३९७ | ६८३१७३ | **८५३९६७** |
| ११ | पुणे | ८५५१७ | ८५५१७ | ६८४१३३ | **८५५१६७** |
| १२ | सातारा | ५६७०४ | ५६७०४ | ४५३६३५ | **५६७०४३** |
| १३ | सांगली | ४८७६६ | ४८७६६ | ३९०१३० | **४८७६६२** |
| १४ | सोलापूर | ६९२३३ | ६९२३३ | ५५३८६१ | **६९२३२७** |
| १५ | कोल्हापूर | ५९९७४ | ५९९७४ | ४७९७९० | **५९९७३८** |
| १६ | औरंगाबाद | ४९११५ | ४९११५ | ३९२९१६ | **४९११४६** |
| १७ | जालना | ३७३७८ | ३७३७८ | २९९०२८ | **३७३७८४** |
| १८ | परभणी | २९९२९ | २९९२९ | २३९४३५ | **२९९२९३** |
| १९ | हिंगोली | २३५८७ | २३५८७ | १८८६९९ | **२३५८७३** |
| २० | बीड | ४९२७१ | ४९२७१ | ३९४१७० | **४९२७१२** |
| २१ | नांदेड | ५७१३६ | ५७१३६ | ४५७०९१ | **५७१३६३** |
| २२ | उस्मानाबाद | ३२९६७ | ३२९६७ | २६३७३२ | **३२९६६६** |
| २३ | लातूर | ४२३९९ | ४२३९९ | ३३९१९० | **४२३९८८** |

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २४ | बुलढाणा | ४८०२८ | ४८०२८ | ३८४२२६ | **४८०२८२** |
| २५ | अकोला | २६०२६ | २६०२६ | २०८२०८ | **२६०२६०** |
| २६ | वाशिम | २३३३२ | २३३३२ | १८६६५६ | **२३३३२०** |
| २७ | अमरावती | ४५२५५ | ४५२५५ | ३६२०४० | **४५२५५०** |
| २८ | यवतमाळ | ५२८५७ | ५२८५७ | ४२२८५७ | **५२८५७१** |
| २९ | वर्धा | २१७२७ | २१७२७ | १७३८१७ | **२१७२७१** |
| ३० | नागपूर | ३६०११ | ३६०११ | २८८०८५ | **३६०१०७** |
| ३१ | भंडारा | २२५३८ | २२५३८ | १८०३०८ | **२२५३८४** |
| ३२ | गोंदिया | २५८७८ | २५८७८ | २०७०२४ | **२५८७८०** |
| ३३ | चंद्रपूर | ३५८७३ | ३५८७३ | २८६९८३ | **३५८७२९** |
| ३४ | गडचिरोली | २७३०१ | २७३०१ | २१८४१० | **२७३०१२** |
| | एकूण | **१४५६७५०** | **१४५६७५०** | **११६५४०००** | **१४५६७५००** |

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.06.29 14:09:39 +05'30'

(प्रविण देविचंद जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

## प्रपत्र-ब

प्रमाणित करण्यात येते की, १५ व्या वित्त आयोगांतर्गत सन -----------या वर्षाचा बेसिक ग्रँटचा (अनटाईड) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.----------------, दि.--------अन्वये जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त सर्व निधी ---------(संबंधित जिल्हा परिषदेचे नाव) या जिल्हा परिषदेच्या अधिनस्त सर्व ग्रामपंचायतींना (----ग्रामपंचायतींची संख्या) शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच विहित केलेल्या निकषानुसार इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे.

सही:
नाव:
दिनांक:
(मुख्य लेखा व वित्त अधिकारी)
जिल्हा परिषद ---------

सही:
नाव:
दिनांक:
(मुख्य कार्यकारी अधिकारी)
जिल्हा परिषद ---------

वितरण आदेश क्रमांक: १
कोषागारातून रोख रक्कम देय अनुदान
सन २०२०-२०२१.

**१५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या बंधित अनुदानाच्या (टाईड ग्रॅट) पहिल्या हप्त्याचे वितरण.**

# महाराष्ट्र शासन

ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ६२/ वित्त-४
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,
तारीखः २७ जुलै,२०२०.

वाचा -

१. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.३१/वित्त-४,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक. ९ /३/२०२०.
२. शासन पत्र क्रमांकः जीपीडीपी-२०२०/प्र.क्र.३१/ पंरा-६ ,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक-२८/४ /२०२०.
३. शासन परिपत्रक क्रमांकः पिईएस-२३२०/प्र.क्र.२२/ आसक,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक-१६/६ /२०२०.
४. शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र. ५९ /वित्त-४,ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२, दिनांक. २६/६/२०२०.
५. केंद्र शासनाचे पत्र क्र.एफ.१५ (४) एफसी-एक्सव्ही/एफसीडी/२०२०-२५ दि.१५.७.२०२० चे पत्र.

**प्रस्तावना -**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरित करण्यासाठी सन २०२०-२१ च्या बंधित अनुदानाच्या (टाईड ग्रॅट) हप्त्यापोटी रू.१४५६.७५ कोटी इतका निधी मुक्त केला असल्याचे केंद्र शासनाच्या संदर्भ क्र. ५ येथील दि.१५.७.२०२० च्या पत्रान्वये कळविले आहे. त्यानुसार केंद्र शासनाकडून राज्य शासनास प्राप्त झालेला निधी राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. याबाबत शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाचा सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाचा बंधित अनुदानाचा (टाइड ग्रॅट) पहिल्या हप्त्याचा केंद्र शासनाकडून मुक्त करण्यात आलेला रू.१४५६.७५ कोटी इतका निधी

सोबतच्या विवरणपत्रात (प्रपत्र अ) दर्शविल्याप्रमाणे सर्व जिल्हा परिषदांना (जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत या तिन्ही स्तरांसाठी ) (२५१५२४७७ ) या लेखाशिर्षाखाली सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीव्दारे ( बीम्सवर ) वितरीत करण्यात येत आहे. सदर निधी सर्व पंचायत राज संस्थाना जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायत यांमध्ये अनुक्रमे १०:१०:८० या प्रमाणात वितरीत करण्यात येत आहे.

२. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्राप्त संपूर्ण अनुदान जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्रामपंचायतींना वितरीत करावयाचे आहे . त्याकरीता जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या बीम्सवर वितरीत करण्यात आलेला निधी त्यांनी तात्काळ कोषागारातून काढून प्रस्तुत निधीच्या जिल्हा परिषदेसाठी देण्यात आलेला १०% निधी स्वत:कडे ठेउन विहित केलेल्या निधी वाटपाच्या निकषांच्या आधारे आपल्या अधिनस्त सर्व पंचायत समिती आणि ग्रामपंचायतीना इ.सी.एस.(Electronic Clearance System) /एन.इ.एफ.टी (National Electronic Fund Transfer) किंवा आर.टी.जी.एस (Real Time Gross Settlement) या आधुनिक बँकिंग सिस्टीमद्वारे संबंधित पंचायत समिती आणि ग्रामपंचायतींच्या खात्यावर तातडीने वर्ग करावा. संपूर्ण निधी विहित निकषानुसार सर्व पंचायत समिती व ग्रामपंचायतींना वितरीत करून त्याबाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडलेल्या “प्रपत्र -ब” नुसार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शासनास तातडीने सादर करावे.

३. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी, पंधराव्या वित्त आयोगाचा निधी यापूर्वी दिलेल्या सूचनांनुसार पंधराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीच्या व्यवहारासाठी उघडलेल्या राष्ट्रीयकृत बँकेच्या स्वतंत्र बचत खात्यातच ( Savings Bank Account ) ठेवावा.

४. शासनाने दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत स्तरावरील निधीच्या वितरणाचे नियोजन, सनियंत्रण व समन्वयनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) यांची राहील.

५. पंधराव्या वित्त आयोगाच्या सन २०२०-२१ या पहिल्या आर्थिक वर्षाच्या ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना वितरीत केलेल्या अनुदानातून घ्यावयाची कामे, त्याचे नियोजन यासंदर्भातील मार्गदर्शक सूचना संदर्भाधीन दि.२६ जून, २०२० च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. तसेच सन २०२०-२१ या आर्थिक वर्षापासूनच्या पंधराव्या वित्त आयोगाच्या वितरित निधीतून पंचायतराज संस्थानी ग्रामपंचायत विकास आराखडयानुसार कामे व उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी करावयाची असून यासंदर्भातील सूचना ग्राम विकास विभागाकडून संदर्भाधीन क्र.२, दि. २८ एप्रिल, २०२० च्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत.

६. वरील प्रक्रियेमध्ये गावातील सद्याच्या परिस्थितीचे विश्लेषण करून गावाच्या गरजांची निश्चिती करून **कामे ठरविण्याचा अधिकार ग्रामसभा व ग्रामपंचायतीला** आहेत.

७. पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार टाईड ग्रँटचा वापर पुढील पायाभूत सेवांसाठी करावयाचा आहे. :-

१. स्वच्छता आणि हागणदारीमुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरूस्ती.

२. पेयजल पाणीपुरवठा, रेन वॉटर हार्वेस्टिग, वॉटर रिसायकलींग गरजेनुसार (Location Specific felt needs ) आवश्यक बाबींवर वापर करावा.

टाईडग्रँटच्या ५०% निधी हा वरील नमूद दोन बाबींसाठी करावयाचा आहे. जर वरील दोन बाबींपैकी एकाची पुर्णत: अंमलबजावणी झाली असेल तर त्यासाठीचा निधी दुस-या बाबीसाठी खर्च करण्यात यावा.

**८. ग्रामपंचायतींनी पंधराव्या वित्त आयोगांतर्गत खात्यातील व्यवहार संदर्भीय क्र.३ दि. १६ जून, २०२० च्या शासन परिपत्रकान्वये कार्यवाही करण्यात यावी.**

९. ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थानी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करू नये व जास्तीचे आर्थिक दायित्व निर्माण करू नये. पेयजल पुरवठा आणि स्वच्छता विभाग आणि जलशक्ती मंत्रालय, भारत सरकार यांच्या व्दारे निर्गमित करण्यात आलेल्या मार्गदर्शक सूचनांच्या अनुषंगाने राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी आपल्या ग्रामपंचायत विकास आराखडयामध्ये पेयजल आणि स्वच्छता संबंधित बाबींचा समावेश करावा. तसेच राज्याच्या सन २०२०-२१ च्या वार्षिक अंमलबजावणी योजनेत पेयजल पुरवठा आणि स्वच्छता संबंधित उपक्रमांचा समावेश करण्यात यावा. आणि अंतिम करण्यात आलेले उपक्रम ऑनलाईन Integrated Management Information System ( IMIS ) वर अपलोड करण्यात यावे.

१०. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तिन्ही स्तरासाठी वरील वितरीत निधीतून होणारा खर्च "मागणी क्र एल-३, २५१५- इतर ग्रामीण विकास कार्यक्रम, १९८- ग्रामपंचायतीस सहाय्य (००) (०८) १४ व्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार ग्रामपंचायतींना विविध विकास योजनांसाठी अनुदाने (जनरल बेसिक ग्रँट) (२५१५ २४७७), (योजनेतर) ३१-सहाय्यक अनुदाने"(वेतनेतर) या लेखाशिर्षाखाली सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पीय तरतूदीतून खर्ची टाकावा.

११. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी ह्या शासन निर्णयाच्या प्रती त्यांचे अधिनस्त सर्व जिल्हा परिषद/ पंचायत समिती/ ग्रामपंचायत स्तरावरील अधिकाऱ्यांना तात्काळ उपलब्ध करून द्याव्यात.

१२. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ७ - २०२० वित्त आयोग कक्ष, दिनांक २१/७/२०२० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईट (www.maharashtra.gov.in) उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक संकेतांक क्र. **२०२००७२४१४३६१८७५२०** असा आहे. हा शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने सांक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.07.28 13:16:44 +05'30'

**(प्रविण देविचंद जैन)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१) मा. राज्यपालांचे सचिव,
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३) मा. मंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
४) मा. राज्यमंत्री (ग्राम विकास) यांचे खाजगी सचिव,
५) सर्व जिल्हा परिषदांचे मा. अध्यक्ष,
६) सर्व मा. विधानसभा व विधान परिषद सदस्य,
७)मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
८)महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा परीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतींसह),
९)महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा परीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतींसह),
१०)अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव, वित्त विभाग/नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई,
११)सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहायक,
१२) सर्व विभागीय आयुक्त (महसूल), विभागीय आयुक्त कार्यालय,
१३) सर्व सह/उप सचिव, ग्राम विकास विभाग,
१४) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१५) संचालक, राज्य ग्रामीण विकास संस्था, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा), पुणे,
१६) संचालक, स्थानिक निधी लेखा, महाराष्ट्र राज्य, कोकण भवन, नवी मुंबई,
१७) सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद ,
१८) सर्व महसूल विभागाचे उप आयुक्त (विकास),
१९) सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),
२०) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
२१) गट विकास अधिकारी (सर्व) (संबंधित जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी, यांच्या मार्फत),
२२) वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय/वित्त आयोग कक्ष/अर्थसंकल्प- १७),
२३) ग्राम विकास विभाग (सर्व कार्यासने),
२४) निवड नस्ती (वित्त-४).

## प्रपत्र- अ

## बंधित (टाईड) ग्रँट

### वितरण आदेश क्र. १ क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.६२ / वित्त-४, दिनांक २७/०७/२०२० चे विवरणपत्र

(रू.हजारात)

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | ठाणे | २२२२९ | २२२२९ | १७७८२९ | **२२२२८७** |
| २ | पालघर | ३६२२३ | ३६२२३ | २८९७८६ | **३६२२३२** |
| ३ | रायगड | ३८८१६ | ३८८१६ | ३१०५२६ | **३८८१५८** |
| ४ | रत्नागिरी | ३२७२६ | ३२७२६ | २६१८११ | **३२७२६३** |
| ५ | सिंधुदूर्ग | १८३२४ | १८३२४ | १४६५९२ | **१८३२४०** |
| ६ | नाशिक | ८२०४४ | ८२०४४ | ६५६३४९ | **८२०४३७** |
| ७ | धुळे | ३४९६७ | ३४९६७ | २७९७३६ | **३४९६७०** |
| ८ | नंदूरबार | ३२१०२ | ३२१०२ | २५६८१८ | **३२१०२२** |
| ९ | जळगाव | ६७१२० | ६७१२० | ५३६९५६ | **६७११९६** |
| १० | अहमदनगर | ८५३९७ | ८५३९७ | ६८३१७३ | **८५३९६७** |
| ११ | पुणे | ८५५१७ | ८५५१७ | ६८४१३३ | **८५५१६७** |
| १२ | सातारा | ५६७०४ | ५६७०४ | ४५३६३५ | **५६७०४३** |
| १३ | सांगली | ४८७६६ | ४८७६६ | ३९०१३० | **४८७६६२** |
| १४ | सोलापूर | ६९२३३ | ६९२३३ | ५५३८६१ | **६९२३२७** |
| १५ | कोल्हापूर | ५९९७४ | ५९९७४ | ४७९७९० | **५९९७३८** |
| १६ | औरंगाबाद | ४९११५ | ४९११५ | ३९२९१६ | **४९११४६** |
| १७ | जालना | ३७३७८ | ३७३७८ | २९९०२८ | **३७३७८४** |
| १८ | परभणी | २९९२९ | २९९२९ | २३९४३५ | **२९९२९३** |
| १९ | हिंगोली | २३५८७ | २३५८७ | १८८६९९ | **२३५८७३** |
| २० | बीड | ४९२७१ | ४९२७१ | ३९४१७० | **४९२७१२** |
| २१ | नांदेड | ५७१३६ | ५७१३६ | ४५७०९१ | **५७१३६३** |
| २२ | उस्मानाबाद | ३२९६७ | ३२९६७ | २६३७३२ | **३२९६६६** |
| २३ | लातूर | ४२३९९ | ४२३९९ | ३३९१९० | **४२३९८८** |

| अ.क्र. | जिल्हा परिषदेचे नाव | जिल्हा परिषद | पंचायत समिती | ग्रामपंचायत | एकूण रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| २४ | बुलढाणा | ४८०२८ | ४८०२८ | ३८४२२६ | **४८०२८२** |
| २५ | अकोला | २६०२६ | २६०२६ | २०८२०८ | **२६०२६०** |
| २६ | वाशिम | २३३३२ | २३३३२ | १८६६५६ | **२३३३२०** |
| २७ | अमरावती | ४५२५५ | ४५२५५ | ३६२०४० | **४५२५५०** |
| २८ | यवतमाळ | ५२८५७ | ५२८५७ | ४२२८५७ | **५२८५७१** |
| २९ | वर्धा | २१७२७ | २१७२७ | १७३८१७ | **२१७२७१** |
| ३० | नागपूर | ३६०११ | ३६०११ | २८८०८५ | **३६०१०७** |
| ३१ | भंडारा | २२५३८ | २२५३८ | १८०३०८ | **२२५३८४** |
| ३२ | गोंदिया | २५८७८ | २५८७८ | २०७०२४ | **२५८७८०** |
| ३३ | चंद्रपूर | ३५८७३ | ३५८७३ | २८६९८३ | **३५८७२९** |
| ३४ | गडचिरोली | २७३०१ | २७३०१ | २१८४१० | **२७३०१२** |
| | एकूण | **१४५६७५०** | **१४५६७५०** | **११६५४०००** | **१४५६७५००** |

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.07.28 13:17:29 +05'30'

(प्रविण देविचंद जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

## प्रपत्र-ब

प्रमाणित करण्यात येते की, १५ व्या वित्त आयोगांतर्गत सन -----------या वर्षाचा बंधित ग्रँटचा (टाईड) शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.-----------------, दि.---------अन्वये जिल्हा परिषद स्तरावर प्राप्त सर्व निधी ---------(संबंधित जिल्हा परिषदेचे नाव) या जिल्हा परिषदेच्या अधिनस्त सर्व ग्रामपंचायतींना (----ग्रामपंचायतींची संख्या) शासनाच्या मार्गदर्शक सूचना तसेच विहित केलेल्या निकषानुसार इलेक्ट्रॉनिक प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| सही: | सही: |
| नाव: | नाव: |
| दिनांक: | दिनांक: |
| (मुख्य लेखा व वित्त अधिकारी) | (मुख्य कार्यकारी अधिकारी) |
| जिल्हा परिषद --------- | जिल्हा परिषद --------- |

पंधराव्या वित्त आयोगाअंतर्गत पाणी पुरवठा योजनांसाठी निधी वापराबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्र. जजीमि/०६०२०/प्र.क्र.२०/पापु-०७**

सातवा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॉफर्ड मार्केटजवळ, लोकमान्य टिळक मार्ग,
नवीन मंत्रालय, मुंबई.
दिनांक: ०३ ऑगस्ट २०२०.

**वाचा**

१. ग्राम विकास विभागाचे पत्र क्र. : जीपीडीपी २०२०/प्र.क्र. ३१/पंरा-६, दिनांक १९ मे, २०२०
२. शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. पंविआ/२०२०/प्र.क्र.५९/वित्त-४, दि. २६ जून, २०२०
३. शासन निर्णय ग्रामविकास विभाग क्र. पंविआ/२०२०/प्र.क्र.५८/वित्त-४, दि. २९ जून, २०२०
४. केंद्र शासनाचे पत्र क्र. W-११०३७/३/२०१९- Water-१, २२ July, २०१९
५. शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्रमांक : जजीमि/०६२०/ प्रक्र.२०/पापु-०७, दि.३०.६.२०२०

**प्रस्तावना-**

केंद्र शासनाने पंधराव्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात येणारा निधी ५०% बंधीत स्वरुपात ठेवला असून त्याचा वापर मुख्यत: पिण्याच्या पाण्याच्या व स्वच्छतेच्या योजनांसाठी करण्यात यावा अशा सूचना दिलेल्या आहेत. १५ व्या वित्त आयोगा अंतर्गत ग्रामपंचायतींना वितरीत होणारा निधी हा ग्रामविकास विभागातर्फे वितरीत करण्यात येतो. ग्राम विकास विभागाने १५ व्या वित्त आयोगाचा निधी वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय दि. २९ जून, २०२० निर्गमित केला आहे.

या निधीतील बंधीत निधी वितरीत करताना जल जीवन मिशन अंतर्गत ग्रामीण पाणीपुरवठा योजना कार्यक्रमांसाठी वापरण्यात यावा या संदर्भात पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत सुस्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक:-**

पंधराव्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या निधीमधील, बंधीत स्वरुपातील निधी हा सद्यस्थितीत पाणी पुरवठ्याच्या कामांसाठी प्राधान्याने वापरणे गरजेचे आहे. यास अनुसरून पंधराव्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात येणाऱ्या निधीमधील, बंधीत स्वरुपातील निधी पुढील आदेश होईपर्यंत फक्त संबंधीत ग्रामपंचायतीने १००% कार्यात्मक घरगुती नळजोडणी (FHTC) देण्यासाठी वापरण्यात यावा, असे करताना खालील सुचनांचे पालन करण्यात यावे.

अ) जी गावे जल जीवन मिशन अंतर्गत, संदर्भ क्र.५ दि.३०.६.२०२० शासन निर्णयामध्ये नमुद सुधारणात्मक पुनर्जोडणीसाठी कार्यकारी अभियंता यांच्या स्तरावर निवडण्यात आली आहेत, त्यांची कार्यात्मक घरगुती नळ जोडणीची कामे (FHTC) ग्रामपंचायत पातळीवर पुर्ण करावी. ग्राम विकास विभागाने दिलेले वित्त आयोगाचा निधी वापरासंबंधीचे प्रशासकीय अधिकार ग्रामपंचायतीस आहेत त्या मर्यादेत प्रशासकीय मान्यता ग्रामपंचायतीस देता येईल. अशा कामांना तांत्रिक मान्यता देण्यास उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उपविभाग, जिल्हा परिषद हे सक्षम राहतील.

ब) ज्या गावांमध्ये संदर्भ क्र.५ मधील शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या कामांपेक्षा अधिक कामे (ऊदा. स्त्रोत विकास, नवीन स्त्रोतांचा शोध, ऊर्ध्व /गुरुत्व वाहीन्या,पाण्याची टाकी बांधणे ई..) करुन कार्यात्मक घरगुती नळ जोडणीची कामे (FHTC) करावयाची आहेत, अशा गावांनी १५ वित्त आयोगातून प्रथम १००% घरांना नळजोडणीची कामे पूर्ण करावीत. ग्राम विकास विभागाने दिलेले वित्त आयोगाचा निधी वापरासंबंधीचे प्रशासकीय अधिकार ग्रामपंचायतीस आहेत, त्या मर्यादेत ग्रामपंचायतीने प्रशासकीय मान्यता द्यावी. अशा कामाना तांत्रिक मान्यता देण्यास उप अभियंता, पाणी पुरवठा उपविभाग, जिल्हा परिषद हे सक्षम राहतील.

क) वरील ब मधील ग्राम पंचायतींनी कार्यात्मकता साध्य करण्यासाठी नळजोडणी व्यतिरिक्त इतर आवश्यक कामाचे ( ऊदा. स्त्रोत विकास, नवीन स्त्रोतांचा शोध, ऊर्ध्व / गुरुत्व वाहीन्या,पाण्याची टाकी बांधणे ई. ) स्वतंत्र अंदाजपत्रक तयार करावे. अशा कामांना रु. १५.०० लक्ष किंमतीपर्यंत प्रशासकीय मान्यता ही ग्रामपंचायत देईल. मात्र या सर्व प्रस्तावांना तंत्रिक मान्यता देण्यास कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद हे सक्षम अधिकारी असतील.

ड) वरील अ ब क प्रमाणे कामे करतांना, वित्त आयोगाच्या निधी कमी पडल्यास त्या प्रमाणात जलजीवन मिशनचा निधी जिल्हा स्तरावरून ग्रामपंचायतींच्या खात्यात तात्काळ मुख्य कार्यकारी अधिकारी , जिल्हा परिषद जमा करतील.

ई ) वरील सर्व कामे (अ ब क ) ग्रामपंचायतीस्तरावर ग्राम विकास विभागाने वित्त आयोगाच्या निधीसाठी घालून दिलेल्या प्रक्रियांचे पालन करून, करण्यात यावे.

फ) तांत्रिक मान्यता देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने प्रत्येक अंदाजपत्रकांना मान्यता देतांना, खालीलप्रमाणे प्रमाणित करणे आवश्यक राहील.

**“या तांत्रिक मान्यतेनुसार एकूण --- (येथे संख्या नमूद करावी) इतक्या घरांना जल जीवन मिशनच्या निकषानुसार कार्यात्मक नळ जोडणी (FHTC) मिळतील. त्याचे निकषानुसार मुल्यमापन करुन घेण्यात येईल.**

ग) वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत मंजुर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील समाविष्ट कामांचा, जल जीवन मिशन अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकात समावेश करण्यात येऊ नये.

ह) वित्त आयोगांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी जिल्हा परिषद तांत्रिक मंजूरीसाठी कोणतीही प्रशासकीय फी आकारणार नाही. जल जीवन मिशन अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकाबाबत प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही करावी.

ए) वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतीने उपरोक्त नमूद केलेल्या कामाचा अहवाल जिल्हा परिषदेस देणे अनिवार्य राहील.

ज) रु. १५.०० लक्ष किंमतीपेक्षा जास्त किंमतीच्या सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे प्रचलित पद्धतीने करण्यात यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२००८०३१११३३४७१३२८ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

VASANT BHIMRAO MANE

Digitally signed by VASANT BHIMRAO MANE
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=280e2beac20f526041fee94f6226522e1407a7f6aa0b06c8769634d48c2976bc, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=VASANT BHIMRAO MANE
Date: 2020.08.03 16:15:44 +05'30'

**( वसंत माने )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत :**

१. मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा. राज्य मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा, महाराष्ट्र विधिमंडळ, मंत्रालय, मुंबई
७. मा. विरोधी पक्षनेता, विधान परिषद, महाराष्ट्र विधिमंडळ, मंत्रालय, मुंबई
८. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य, विधानभवन, मुंबई
९. मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव, मंत्रालय, मुंबई
१०. मा.अपर मुख्य सचिव ( पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) यांचे स्विय सहायक, मंत्रालय, मुंबई
११. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर, मुंबई-२१
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता)
१४. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
१५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१६. सह सचिव / उपसचिव / विशेष कार्य अधिकारी सर्व, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई
१७. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, बेलापूर, नवी मुंबई
१८. मुख्य अभियंता (सर्व),/ अधीक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
१९. कार्यकारी अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण / ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२०. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद, (सर्व)
२१. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील अवर सचिव / कार्यासन अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)
२२. निवडनस्ती (कार्यासन पापु - ०७)
२३. WSSO.

**१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार पंचायत राजच्या तिन्ही स्तरांसाठी प्राप्त होणा-या निधीमधुन हाती घ्यावयाच्या कामांच्या संदर्भात कामकाजाचे सर्वसाधारण समन्वय व नियंत्रण करणेबाबत.**

शासन परिपत्रकक्रमांक-पंविआ-२०२०/प्रक्र-६२ /वित्त-४
ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन, मुंबई.
दि.१० ऑगस्ट, २०२०
संदर्भ - शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-६२ /वित्त-४, दि.२७.७.२०२०

## परिपत्रक

१. १५ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी अनुसरून राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बळकटीकरणासाठी राज्याला मूलभूत / बेसिक अनुदान व बंधित अनुदान या दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात निधी देण्यात येणार आहे. त्यानुसार मूलभूत / बेसिक अनुदान व बंधित अनुदान या दोन प्रकारच्या अनुदानाच्या पहिल्या हप्त्याचे वितरण सर्व जिल्ह्यांना माहे जून २०२० आणि जुलै २०२० मध्ये करण्यात आलेले आहे.

२. पंधराव्या वित्त अंतर्गत वरील दोन प्रकारच्या अनुदानाच्या स्वरूपात प्राप्त होणाऱ्या निधीतून पंचायतराज संस्थांनी करावयाच्या बाबी ठरविणे, तसेच निधी खर्च करताना पंचायतराज संस्थांनी पालन करावयाची मार्गदर्शक तत्त्वे/सूचना, आणि विविध प्राधिकाऱ्यांची कर्तव्य आणि जबाबदाऱ्या या बाबत दि.२६.०६.२०२० रोजीच्या शासन निर्णयान्वये सविस्तर आणि स्वयंस्पष्ट मार्गदर्शक सूचना यापूर्वीच निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

३. पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत जिल्हास्तरावर प्राप्त झालेला निधी, प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून १० कार्यालयीन कामकाजांच्या दिवसांच्या आत संबंधित पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती यांना हस्तांतरित होणे अनिवार्य आहे. निधी हस्तांतरणास विलंब झाल्यास सदर निधी, त्यावर मागील वर्षाच्या बाजार कर्जावरील व्याजदराने व्याज आकारणी करून त्यासह वितरित करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

४. त्याचप्रमाणे संबंधित संस्थेस निधी प्रत्यक्ष प्राप्त झाल्यापासून दोन महिन्यांच्या आत अनुज्ञेय कामांच्या आराखड्यास समुचित सक्षम प्राधिकरणाची मान्यता घेऊन त्यानंतर लगेचच कामांच्या अंमलबजावणीच्या अनुषंगिक प्राथमिक प्रक्रिया पूर्ण केल्या जाऊन कामे पूर्ण होणे अपेक्षित आहे.

५. अशाप्रकारे पंधराव्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीच्या जलद विनियोगासाठी क्षेत्रीय आणि पर्यवेक्षक पातळीवर सुयोग्य समन्वय आणि नियंत्रण असणे आणि सर्व जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या यांच्या कामकाजात सुसूत्रता आणि समानता असणे आवश्यक आहे. त्यासाठी खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

   I. पंचायत संस्थांच्या जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि ग्रामपंचायती या तिन्ही स्तरां साठी पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या अनुषंगाने विनियोगाच्या नियंत्रणाची व समन्वयाची मुख्य जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांची आहे. त्यामुळे पुढील काळात पंधराव्या वित्त आयोगासाठी जिल्हा परिषदेचा ग्रामपंचायत विभाग नोडल विभाग म्हणून कार्य करील.



Scanned with CamScanner


Scanned by CamScanner

II. पंचायतराजच्या जिल्हा परिषद पंचायत समिती आणि ग्रामपंचायती या तीनही स्तरांसाठी अनुज्ञेय असलेले अनुदान आहरित करून अनुज्ञेयतेनुसार विहित कालमर्यादेत संबंधित संस्थेपर्यंत वितरित करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व अनुषंगिक कार्यालयीन प्रक्रिया उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) यांचेकडून पार पाडल्या जातील. यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे पर्यवेक्षण करतील तर मुख्य कार्यकारी अधिकारी हे नियंत्रण ठेवतील.

III. जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरासाठी चिन्हांकित असलेल्या १०% निधी मधून हाती घ्यावयाची अनुज्ञेय कामे आणि विकास परियोजना यांचे संदर्भात विविध कार्यान्वयीन यंत्रणा बरोबर समन्वय ठेवून, सर्वसमावेशक एकत्रित आराखडा तयार करून, तो विचारार्थ आणि अंतिम मान्यतेस्तव समुचित सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणेबाबतची कार्यवाही जिल्ह्यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे नियंत्रणाखाली उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) आणि पंचायत समित्यांसाठी गट विकास अधिकारी यांचे नियंत्रणाखाली संबंधित सहाय्यक गटविकास अधिकारी, हे करतील.

IV. जिल्हा परिषद व पंचायत समिती या दोन्ही स्तरांसाठी पंधराव्या वित्त आयोगांतर्गत कामाच्या संदर्भात मुख्य लेखा व वित्त अधिकारी हे वित्तीय नियंत्रक म्हणून कार्य करतील. वित्तीय सल्ला, प्रदानपूर्व लेखापरीक्षण आणि लेखांकन या बाबींशी निगडीत कामकाज महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखा संहिता, १९६८ मधील तरतुदींस अनुसरून मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचे नियंत्रण आणि मार्गदर्शनाखाली पार पाडले जाईल.

V. बंधित आणि मूलभूत अशा दोन्ही प्रकारच्या निधीवर प्राप्त होणाऱ्या व्याजाच्या रकमांचा निधी निहाय स्वतंत्र हिशोब ठेवणे, त्याबाबत अनुषंगिक माहिती अद्यावत ठेवणे, त्यात्या खात्यातील व्याज त्यात्या खात्यात जमा केले जाईल. आणि शासन निर्देशांनुसारच आणि विहित कार्यपद्धत अनुसरूनच त्याचा विनियोग अनुज्ञेय बाबींसाठीच होईल हे सुनिश्चित करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेसाठी मुख्य लेखा व वित्त अधिकारी, पंचायत समिती समिती साठी गट विकास अधिकारी आणि ग्रामपंचायतीसाठी ग्राम विकास अधिकारी / ग्रामसेवक यांची राहील.

VI. पंधराव्या वित्त आयोग अंतर्गत कामे आणि विकास परियोजना यांची अंमलबजावणी/ कार्यान्वयन करताना सर्व अनुषंगिक प्रचलित शासन नियम-विनियम दिशानिर्देश यांचे काटेकोर अनुपालन केले जाईल आणि विहित कार्यपद्धतीचा तंतोतंत अवलंब केला जाईल हे सुनिश्चित करण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित कार्यान्वयीन अधिकारी / कर्मचारी आणि पर्यवेक्षीय अधिकारी यांची राहील. कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारची अनियमितता, गैरप्रकार, दुर्विनियोजन घडणार नाही यासाठी समुचित प्रतिबंधात्मक आणि पर्यवेक्षीय उपाययोजना करणे आणि दक्षता बाळगणे संबंधित पर्यवेक्षीय अधिकारी यांचे साठी अनिवार्य राहील.

VII. शासन निर्देश आणि मार्गदर्शक सूचना यांचे काटेकोर अनुपालन करून विहित कालमर्यादेत कामे आणि विकास परियोजना यांची अंमलबजावणी जलद गतीने केली जाईल. यासाठी सर्व संबंधितांनी प्रत्येक टप्प्यावर योग्य ती खबरदारी घ्यावी. कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारची हयगय, टाळाटाळ होणार नाही, निधीच्या खर्चाचा अनुशेष निर्माण होणार नाही, निधी विनावापर अखर्चित पडून राहणार नाही, निधीचा नियमोचीत विनियोग करण्यामध्ये अवाजवी विलंब होणार नाही, आवश्यक ती माहिती उपयोगिता प्रमाणपत्र आणि अहवाल शासनास विहित कालमर्यादेत अचूकरित्या आणि तत्परतेने सादर केले जातील,



Scanned with CamScanner



Scanned by CamScanner

यासाठी सर्व पर्यवेक्षीय अधिकाऱ्यांनी नियोजनबद्धरीतीने जाणीवपूर्वक आणि ठोस प्रयत्न करणे बंधनकारक राहील.

VIII. पंधराव्या वित्त आयोगांतर्गत पंचायत राज या तीनही स्तरांवरील कामे आणि विकास परियोजना यांचे नियोजन आणि अंमलबजावणी यावर प्रथम नियंत्रण उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत), वित्तीय नियंत्रण मुख्य लेखा व वित्त अधिकारी (ग्रामपंचायत स्तर वगळून) आणि अंतिम नियंत्रण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

Pravin Jain

(प्रविण जैन)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त, कोकण/ नाशिक/पुणे/औरंगाबाद/अमरावती/नागपूर

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

सर्व उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

सर्व मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद,

उप सचिव ( पंचायत राज ) ग्रामविकास विभाग, मुंबई.

निवडनस्ती कार्यासन वित्त - ४

प्रत माहितीसाठी,

मा.मंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव

मा.राज्यमंत्री (ग्रामविकास) यांचे खाजगी सचिव

मा.अतिरिक्त मुख्य सचिव (ग्रामविकास) यांचे स्वीय सहायक

Scanned with CamScanner



Scanned by CamScanner

"आमचं गाव, आमचा विकास"
उपक्रमांतर्गत सन २०२१-२२ या
वर्षाचा वार्षिक ग्रामपंचायत विकास
आराखडा तयार करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## ग्राम विकास विभाग

## शासन निर्णय क्रमांकः जीपीडीपी- २०२०/ प्र.क्र.३९ / पं.रा.६

**२५,** मर्झबान पथ**,** बांधकाम भवन**,** मुंबई-**४००००१.**

तारीख: २५ सप्टेंबर, २०२०

<u>वाचा :-</u>

१) शासन निर्णय क्रमांकः जीपीडीपी-२०१५/ प्र.क्र.३८/ पं.रा-६, ग्राम विकास विभाग, दि. ०४ नोव्हेंबर, २०१५
२) ग्राम विकास विभागाकडील पत्र क्र. जीपीडीपी २०१५/प्रक्र.३८/पं.रा.-६, दि. ८ जून, २०१६
३) शासन निर्णय क्रमांकः जीपीडीपी २०१७/प्र.क्र.५१/पं.रा.६, ग्राम विकास विभाग, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१८
४) शासन निर्णय क्रमांकः जीपीडीपी २०१८/प्र.क्र.५१/पं.रा.६, ग्राम विकास विभाग, दिनांक ०६ सप्टेंबर, २०१८
५) शासन निर्णय क्रमांकः जीपीडीपी २०१९/प्र.क्र.३८/पं.रा.६, ग्राम विकास विभाग, दिनांक २९ मे, २०१९
६) शासन पत्र क्र. जीपीडीपी - २०२०/ प्र.क्र.३१/प.रा. ६ दि. १९ मे,२०२०
७) शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्र.क्र.५९/वित्त-४, ग्राम विकास विभाग, दिनांक २६ जून, २०२० अन्वये निर्गमित केलेल्या पंधराव्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत मार्गदर्शक सूचना
८) पंचायतीराज मंत्रालय भारत सरकार यांचेकडील पत्र क्र. M-११०१५/१५९/२०१९-CB, दि. १८ ऑगस्ट, २०२०

**शासन निर्णय:-**

"आमचं गाव, आमचा विकास" उपक्रमांतर्गत मार्गदर्शक सूचना व शासनाने संदर्भीय शासन निर्णयान्वये दिलेल्या पूरक मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सबकी योजना सबका विकास मोहिमे अंतर्गत सन २०२०-२१ या वर्षाचा वार्षिक व २०२० ते २०२५ या पाच वर्षांचा पंचवार्षिक आराखडा तयार करून अपलोड केला. त्यानंतर केंद्र शासनाने पंधराव्या वित्त आयोगाच्या अहवालानुसार वित्त आयोगाच्या प्राप्त होणा-या एकूण निधीपैकी ५०% अबंध निधी व ५०% बंधीत निधी

विचारात घेवून सन २०२०-२१ चे वार्षिक आराखडे सुधारीत करण्याच्या सूचना निर्गमित केल्या. त्यानुसार राज्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सन २०२०-२१ चे ग्रामपंचायत विकास आराखडे सुधारीत करून ई-ग्राम स्वराज या वेबपोर्टलवर अपलोड केलेले आहेत. या आराखड्यांना ग्रामपंचयतींनी मंजुरी दिलेली आहे. जेंव्हा ग्रामसभा आयोजित करण्यात येतील, तेंव्हा हे आराखडे ग्रामसभेसमोर सादर करुन मान्यता घेणे गरजेचे आहे.

'आमचं गाव, आमचा विकास' उपक्रमांतर्गत संदर्भ क्र. १ ते ४ आणि ६ व ७ मधील शासन निर्णय / पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, याबाबत केंद्र शासनाने सूचित केलेल्या बाबी, १५ व्या वित्त आयोगाच्या अंमलबजावणी विषयी राज्य शासनाने निर्गमित केलेल्या सूचना आणि खालील पूरक मार्गदर्शक सूचना विचारात घेवून सन २०२१- २२ चा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा अंतीम करणेबाबत कार्यवाही करावयाची आहे.

१) आमचं गाव आमचा विकास उपक्रमांतर्गत ग्रामपंचायतींचा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना शासनाच्या संदर्भ क्र. १ मधील दिनांक ०४ नोव्हेंबर, २०१५ रोजीच्या शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतींनी खालील निधी स्त्रोत विचारात घ्यावयाचे आहेत.

अ) ग्रामपंचायतींना विविध करांच्या माध्यमातून प्राप्त होणारा निधी. (मालमत्ता कर, पाणी कर व ग्राम निधी इत्यादी.)..

आ) राज्य शासनाकडून प्राप्त होणारा महसूली हिस्सा. (उदा. जमीन महसूल उपकर, मुद्रांक शुल्क अनुदान, इत्यादी.)

इ) महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत विकास कामांसाठी प्राप्त होणारा निधी.

इ) १५ व्या वित्त आयोगाचा निधी

ई) स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर प्राप्त होणारा निधी.

उ) बक्षिसे व पारितोषिके यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना मिळणारा निधी

ऊ) लोकसहभागातून मिळणारा निधी.

१.१. ग्राम निधी :

ग्राम निधीमध्ये ग्रामपंचायतींना विविध करांच्या माध्यमातून प्राप्त होणारा निधी आणि राज्य शासनाकडून प्राप्त होणारा महसूली हिस्सा यांचा समावेश करण्यात येतो. ग्राम निधीचे अंदाजपत्रक महाराष्ट्र ग्राम पंचायत अधिनियम १९५८ अंतर्गत अंदाजपत्रकाबाबत असलेल्या नियमानुसार करण्यात येते. यामध्ये ग्राम पंचायतीचे स्वत:चे सर्व उत्पन्न विचारात घेऊन, शासनाने निश्चित केलेल्या प्रमाणात ग्राम पंचायतीने करावयाचा प्रशासकिय खर्च, मागासवर्गीयासाठी करावयाची तरतुद, अपंगा साठी तरतुद, महिला व बालकल्याण यासाठी तरतुद करुन शिल्लक असलेला निधी गावातील विकास कामासाठी दर्शविण्यात येतो.

आमचं गाव आमचा विकास उपक्रमांतर्गत ग्रामपंचायतींचा वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना ग्राम पंचायतीच्या अंदाजपत्रकामधील विकास कामासाठी दर्शविण्यात आलेला निधीच विचारात घ्यावयाचा आहे,

१.२. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत विकास कामांसाठी प्राप्त होणारा निधी :

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मार्गदर्शक सूचना नुसार प्राप्त होणारा निधी आणि कामांचे नियोजन करुन आराखडा तयार करायचा असून, त्याची इतर निधीमधुन घेण्यात येणा-या कामे/उपक्रमासमवेत सांगड घालावयाची आहे. या योजनेंतर्गत निधीची उपलब्धता आणि त्या संपूर्ण निधीचे नियोजन करण्याचे सर्व अधिकार ग्राम पंचायतींना असल्यामुळे या सर्व कामांचा समावेश ग्राम पंचायत विकास आराखड्यामध्ये करावयाचा आहे.

१.३. १५ व्या वित्त आयोगाचा निधी :

पंधराव्या वित्त आयोगाच्या शिफारसीनुसार केंद्र शासनाने दिलेल्या सूचनानुसार राज्य शासनाने पंधराव्या वित्त आयोगाच्या निधीच्या नियोजनाबाबत मार्गदर्शक सूचना संदर्भ क्र. ७ अन्वये निर्गमीत केलेल्या आहेत. त्यानुसार ग्राम पंचायत निहाय प्राप्त होणारा निधीचा तपशिल संबधित ग्राम पंचायतींना जिल्हा परिषदे मार्फत कळविण्यात येत असून या निधीचे नियोजन खालीलप्रमाणे करावयाचे आहे.

अ) पंधराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त होणा-या एकूण निधीच्या ५० % निधी बंधीत स्वरुपाचा असून यामधुन खाली नमुद दोन बाबींसाठी विनियोग करावयाचा आहे.

१. स्वच्छता व हागणदारी मुक्त स्थानिक स्वराज्य संस्थांची देखभाल व दुरुस्ती

२. पेयजल पाणीपुरवठा, जल पुनर्भरण /पावसाच्या पाण्याची साठवण ( रेन वॉटर हार्वेस्टिंग), जलपुर्नप्रक्रिया ( वॉटर रिसायकलींग)

ब) पंधराव्या वित्त आयोगाच्या प्राप्त होणा-या निधीच्या ५० % निधी अबंधीत स्वरुपाचा असून या निधीमधुन ग्राम पंचायतीच्या निकडीच्या गरजा व आवश्यकतेसाठी ग्रामसभेने निश्चित केलेल्या प्राधान्य क्रमानुसार वापरावयाचा आहे.

क) १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधुन कामे प्रस्तावीत करताना शासन पत्र क्र. जीपीडीपी - २०२०/ प्र.क्र.३१/प.रा. ६ दि. १९ मे,२०२० मध्ये नमुद केल्याप्रमाणे एकूण निधीच्या २५ % आरोग्य, शिक्षण व उपजिवीका या उपक्रमासाठी, १० % महिला व बालकल्याण उपक्रमासाठी आणि लोकसंख्येच्या प्रमाणात अनु. जाती/ अनु. जमाती यांच्यासाठी तरतुदी आराखड्यामध्ये करावयाच्या आहेत.

ड)संदर्भ क्र. ७ मधील शासन निर्णयान्वये ( मुध्दा क्र. २२) सूचित केल्याप्रमाणे पंचायत राज संस्थांनी प्राप्त निधीपेक्षा जास्त खर्च करु नये व जास्तीचे आर्थिक दायीत्व निर्माण न करता नियोजनासाठी वित्त आयोगाच्या प्राप्त होणा-या निधीच्या १.२० पट निधी विचारात घेऊन आराखडा तयार करावयाचा आहे.

१.४. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर प्राप्त होणारा निधी:
या अभियानांतर्गत प्राप्त होणा-या निधीचे नियोजन यासंबधित मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन करावयाचे आहे. त्यासाठी इतर योजनांशी सांगड घालावी.
१.५. बक्षिसे व पारितोषिके यांच्या माध्यमातून ग्रामपंचायतींना मिळणारा निधी:
सदरचा निधी गावाच्या विकास कामांसाठी असल्याने त्याचे नियोजन, या रक्कमा वितरीत करताना शासनाने दिलेल्या सूचना विचारात घेऊन करावे. या निधीची सांगड इतर योजनामधील कामांशी घालावी.
१.६. लोकसहभागातून मिळणारा निधी:
अ) लोकसहभाग, वर्गणी, देणग्या इ. मधुन प्राप्त होणारा निधी विविध कामे, उपक्रम, कार्यक्रमांशी सांगड घालुन नियोजन करावे.
ब) गावातील विविध गरजा आणि निकडी भागवण्यासाठी निधी बरोबरच लोकसहभाग आवश्यक आहे.त्यासाठी वार्षिक आराखडा तयार करताना कोणकोणत्या बाबी, उपक्रम व कामामध्ये लोकसहभाग घेण्यात येणार आहे याचे नियोजन ग्रामसभेमध्ये करावयाचे आहे. आराखड्यामध्ये लोकसहभागातुन व विना खर्चाची कामे यांची स्वतंत्र यादी दर्शविण्यात यावी.
२. याबाबत शासनाकडील पत्र जा.क्र.जीपीडीपी २०१५/प्र.क्र.३८/पंरा दि.०८ जून, २०१६ अन्वये स्पष्टीकरण करण्यात आल्याप्रमाणे ग्राम पंचायतींना उपलब्ध असलेल्या स्रोतातून प्राप्त होणा-या निधीमध्ये वाढ (दुप्पट वा दिडपट) न करता मूळ तरतूदीनुसार आराखडा तयार करण्यात यावा. फक्त १५ व्या वित्त आयोगांतर्गत उपलब्ध होणा-या निधीच्या १.२० पट निधी वार्षिक आराखडा तयार करतांना विचारात घेण्यात यावा. त्याचप्रमाणे वित्त आयोगांतर्गत अपेक्षीत निधीमधून हाती घेतलेल्या अपूर्ण कामांसाठी आवश्यक तरतूद वजा करुन उर्वरीत निधीच्या १.२० पट निधी वार्षिक आराखडे तयार करतांना विचारात घ्यावा. यासाठी 'आमचं गाव, आमचा विकास' उपक्रमांतर्गत संदर्भ क्र. १ ते ४ मधील शासन निर्णय / पत्रान्वये निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना आणि खालील पूरक मार्गदर्शक सूचना विचारात घ्यावयाच्या आहेत.
३. राज्य शासनाच्या विविध विभागांचा सहभाग, विविध विभागांमार्फत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांचे अभिसरण करून ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करावयाचा आहे.
४. ग्राम सभा नियोजन
४.१. ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी ग्राम पंचायतीने ग्राम सभा आयोजित करावयाची असून या ग्रामसभा आणि आराखडा तयार करण्याची प्रक्रिया सुरळीत, यशस्वी, पारदर्शकतेने व नियोजित पध्दतीने पार पाडण्यासाठी - पंचायत समिती मतदार संघ (गण)◦ हा नियोजन घटक म्हणून निश्चित करण्यात आलेला आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील प्रत्येक गणासाठी एका विस्तार अधिका-याची प्रभारी अधिकारी म्हणून नियुक्ती करावयाची आहे. याच विस्तार अधिकारी / प्रभारी अधिका-याची नियुक्ती ग्रामसभासाठी संपर्क

अधिकारी म्हणून करावयाची आहे. त्याचप्रमाणे ग्रामसभा आणि नियोजन प्रक्रियेमध्ये गावातील महिला, युवती, युवक, आर्थिक व सामाजिक कमकुवत घटक यांना समाविष्ठ करण्यासाठी प्रत्येक गणासाठी एका मुख्य सेविकेची (ए.बा.वि.से.) निवड करून त्यांचे प्रशिक्षण पूर्ण करावयाचे आहे.

४.२. या ग्रामसभेमध्ये ग्राम पंचायतीने आतापर्यंत हाती घेतलेली कामे/उपक्रम, त्यावर झालेला खर्च, शिल्लक निधी आणि ग्राम पंचायतीस पुढील चार वर्षामध्ये वर्षनिहाय मिळणारे उत्पन्न आणि इतर निधीची सविस्तर माहिती ग्राम सभेत द्यावयाची आहे.

त्याचप्रमाणे यापूर्वी ग्राम सभेने कामे/उपक्रमांचा ठरविलेला प्राधान्यक्रम, गावाच्या गरजा, अडचणी आणि त्यावरील उपाययोजनांसह केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची अंमलबजावणी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचे चालू व पुढील वर्षांचे नियोजन/आराखडा, या योजनांची ग्राम पंचायत विकास आराखडयातील प्राधान्यक्रमाशी सांगड घालणेबाबतचे नियोजन ग्राम सभेत सादर करावयाचे आहे. याबाबतची जबाबदारी संबधित सरपंच, ग्रामसेवक, संपर्क अधिकारी (विस्तार अधिकारी) व संबधित प्रशिक्षित पर्यवेक्षिका यांचेवर सोपवावी.

४.३. केंद्र शासनाच्या दिनांक १३ ऑगस्ट, २०१८ च्या पत्रान्वये सूचित केल्याप्रमाणे ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी आयोजित केलेल्या ग्रामसभेमध्ये शासनाच्या विविध विभागांतर्गत त्या ग्रामपंचायतीमध्ये हाती घेतलेल्या व घेण्यात येणा-या योजनांची माहिती त्या-त्या विभागाच्या अधिकारी / कर्मचा-यांनी ग्रामसभेमध्ये उपस्थित राहून द्यावयाची आहे. संबंधित ग्राम पंचायतीच्या कार्यक्षेत्रामध्ये ७३ व्या घटना दुरूस्तीच्या अनुषंगाने पंचायतराज संस्थांकडे हस्तांतरीत २९ विषयांची अंमलबजावणी करण्यात येत असलेल्या केंद्र / राज्य शासनाच्या योजनांशी संबंधित विभागाच्या अधिकारी/ कर्मचारी यांनी उपस्थित रहावयाचे आहे. शासनाच्या विविध योजना ग्राम स्तरावर राबवीत असलेल्या व संदर्भ क्र. ४ च्या शासन निर्णयामध्ये नमुद केल्याप्रमाणे राज्य व जिल्हा परिषदेच्या सर्व विभागांच्या अधिकारी/कर्मचा-यांनी सदरच्या ग्राम सभेमध्ये उपस्थित रहावयाचे असून, संबंधितांना तशा लेखी सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी द्याव्यात.

यासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी राज्य व जि.प. च्या संबधित विभागांच्या जिल्हास्तरावरील अधिका-यांची बैठक घेवून आवश्यक तो समन्वय साधावा तसेच जिल्हास्तरावरील या सर्व अधिका-यांनी ग्राम सभेस उपस्थित राहण्याबाबत त्या त्या विभागाच्या ग्राम स्तरीय वा इतर अधिका-यांना उपस्थित राहण्याबाबत लेखी सूचना देणेबाबत सूचीत करावे. अशाच स्वरुपाची तालुकास्तरीय अधिकायांची बैठक गट विकास अधिकारी यांनी घेऊन सर्व संबधित अधिका-यांना ग्रामसभांचे वेळापत्रक व त्यांनी ग्रामसभेमध्ये सादर करावयाच्या माहितीचा नमुना उपलब्ध करून द्यावयाचा आहे.

४.४. या सर्व राज्य व जि.प. विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी ग्राम सभेमध्ये उपस्थित राहून संबंधित ग्राम पंचायती विषयी प्रामुख्याने खालील बाबींची माहिती देवून, त्याविषयी ग्राम सभेमध्ये चर्चा घडवून आणावयाची आहे. त्यानुसार संबधितांना माहितीचा नमुना व लेखी सूचना द्याव्यात. यासाठी जिल्हास्तरावरील राज्य शासनाच्या व जिल्हापरिषदेच्या सर्व खातेप्रमुखांच्या प्रशिक्षण कार्यक्रमामध्येही आवश्यक त्या सूचना द्याव्यात.

१. ग्राम पंचायतीमध्ये त्यांच्या विभागामार्फत चालू वर्षी हाती घेतलेल्या योजना/उपक्रमांची माहिती. यामध्ये योजने अतंर्गत मंजूरी असलेल्या भौतिक व आर्थिक बाबींसह योजना/उपक्रमांच्या सद्यस्थितीचा समावेश असावा.

२. विभागामार्फत राबविण्यात येणा-या इतर योजना/उपक्रम.

३. ग्राम पंचायतमध्ये राब वित असलेल्या योजनांची सद्यस्थिती, उपलब्ध निधी व त्यामधील अडचणी/त्रुटी

४. योजनांच्या अंमलबजावणी मध्ये लोकांचा सहभाग / सहकार्य

५. योजना/उपक्रमांच्या यशस्वी अंमलबजावणी व पारदर्शकतेसाठी आवश्यक असणारा लोकसहभाग, ग्राम स्तरावरील प्रसिध्दी आणि योजनेच्या अपेक्षीत ध्येय साध्यासाठी ग्राम पंचायतीकडून आवश्यक असलेला भौतिक व आर्थिक सहभाग

४.५. ग्राम सभेमध्ये कार्यक्षेत्रातील सर्व घटकांनी उपस्थित राहून चर्चेमध्ये सक्रीय सहभाग घेणेसाठी ग्राम पंचायतीने ग्रामसभेच्या दिनांकापूर्वी पुरेशा कालावधीसाठी ग्रामसभेची प्रसिध्दी गावाच्या सर्व वाड्या, वस्त्या येथे करावी. गट विकास अधिकारी यांनी या ग्रामसभांचे ग्राम पंचायत निहाय वेळापत्रक तयार करावयाचे असून त्यास स्थानिक रित्या प्रसिध्दी द्यावयाची आहे.

४.६ ग्राम सभेचे कामकाज पारदर्शकपणे होऊन, ग्रामस्थांनी सक्रीय सहभाग घेण्याच्या दृष्टीने त्यांना ग्राम पंचायती मार्फत राबविण्यात येणा-या योजना/उपक्रमांची सविस्तर माहिती होणेसाठी ग्राम पंचायतीने चालू वर्षी हाती घेतलेल्या सर्व योजना/उपक्रमांची नावे, अंदाजपत्रकीय रक्कम, झालेला खर्च, उपक्रमाची सद्यस्थिती इ. माहिती दर्शविणारे फलक गावामध्ये प्रमुख ठिकाणी लावावेत.

४.७. ग्राम सभांचे वेळापत्रक

आमचं गाव, आमचा विकास उपक्रमा विषयी शासन निर्णय दि. ०४ नोव्हेंबर, २०१५ अन्वये निश्चित केल्याप्रमाणे पुढील वर्षाचा ग्राम पंचायत विकास आराखडा ०२ ऑक्टोबरच्या ग्रामसभेमध्ये अंतिम करावयाचा आहे, तथापि सन २०२०-२१ या वर्षाचा ग्राम पंचायत विकास आराखडा व पंचवार्षिक ग्राम पंचायत विकास आराखडा  निश्चित करण्यासाठी या शासन निर्णयामधील सर्व बाबी विचारात घेवून विविध विभागांच्या ग्रामस्तरीय अधिकारी / कर्मचा-यांना उपस्थित रहाता यावे या दृष्टीने सदरच्या ग्राम सभा दि. ०२ ऑक्टोबर २०२० ते ३१ डिसेंबर, २०२० या तीन महिन्यांच्या कालावधीत आयोजित करावयाच्या आहेत. प्रत्येक तालुक्याच्या गट

विकास अधिका-यांनी तालुक्यातील सर्व ग्राम पंचायतीच्या ग्राम सभांचे वेळापत्रक निश्चित करुन त्यास आवश्यक ती प्रसिध्दी द्यावी.

४.८. संपर्क अधिकारी

गट विकास अधिकारी यांनी त्यांच्या तालुक्यातील ग्राम पंचायतींच्या ग्राम सभांचे नियोजन करतांना प्रत्येक ग्राम पंचायतीच्या ग्राम सभेसाठी तालुकास्तरावरील विस्तार अधिकारी/कर्मचा-याची संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करावयाची आहे. अशी नियुक्ती करताना प्रत्येक पंचायत समिती मतदार संघासाठी प्रशिक्षित केलेल्या प्रभारी अधिका-याची नियुक्ती करावी. गट विकास अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या संपर्क अधिका-यांची एकत्रित बैठक घेवून ग्राम सभा पारदर्शक,प्रभावी व यशस्वीपणे पार पाडण्याच्या दृष्टीने त्यांच्या वरील जबाबदारी अवगत करावी. यामध्ये प्रामुख्याने ग्राम पंचायतीने लावलेले माहितीफलक, ग्रामसभेची प्रसिध्दी, ग्राम पंचायतीने राबविल्या योजना/उपक्रमांची माहिती, ग्राम पंचायतीस ग्राम पंचायत विकास आराखडयासाठी उपलब्ध होणारा निधी, ग्राम सभेसाठी जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या विविध विभागाकडील अधिकारी/कर्मचा-यांच्या उपस्थितीसाठी करावयाचा पाठपुरावा, सभेची जागा व व्यवस्था इ. बाबींचा समावेश असावा.

५. महिला सभा, मागासवर्गीय व वंचित घटकांची सभा व बालसभा

ग्रामपंचायतीने मुख्य ग्रामसभेच्या शक्यतो आदल्या दिवशी किंवा दोन दिवस अगोदर महिला सभा, मागासवर्गीय व वंचित घटकांची सभा व बालसभा अशा तीन सभा आयोजित करावयाच्या आहेत. या सभांची जबाबदारी प्रत्येक गणासाठी नियुक्त केलेल्या व प्रशिक्षण पूर्ण केलेल्या पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.) व विस्तार अधिकारी (प्रभारी अधिकारी/संपर्क अधिकारी) यांचेवर संयुक्तपणे सोपवावी. यासाठी अंगणवाडी सेविका, मदतनीस, स्वयंसहाय्यता गट व मुख्याध्यापक यांचा सहभाग घ्यावा. या तिन्ही सभामधील चर्चा व शिफारशी याबाबत ग्रामपंचायतीने आराखडा निश्चित करण्यासाठी आयोजित केलेल्या ग्रामसभेमध्ये चर्चा घडवून आणणे ग्रामपंचायतीवर बंधनकारक राहिल.

५.१. महिला सभा -

ग्रामपंचायत, स्वयंसहाय्यता गट / संघ, महिला व लिंगसमभाव (Gender) यांचे एकात्मिकरणासाठी ग्रामपंचायत व स्वयंसहाय्यता गट / संघ यांच्या भूमिका एकमेकांशी पूरक असणे गरजेचे आहे. स्वयंसहाय्यता गट / संघाच्या माध्यमातून गावातील गरीब व वंचीत घटकांना त्यांचे अधिकार व हक्काची माहिती, त्यांची मागणी व ते प्राप्त करून घेण्याची संधी याबाबत सक्षम करून या घटकांचा समावेश स्थानिक विकासाच्या प्रक्रियेमध्ये करणे आवश्यक आहे. महिला ग्रामसभेमध्ये प्रामुख्याने खालील बाबीवर चर्चा घडवून आणावी.

१. ग्रामपंचायत विकास आराखडा.

२. राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयंसहाय्यता गटांनी लोकसहभागीय प्रक्रियेत तयार केलेल्या सूक्ष्म पत आराखडा (Micro Credit Plans).

३. ग्रामपंचायतीमार्फत राबविण्यात येणा-या विविध स्वरूपाच्या योजना / उपक्रम / कार्यक्रमांच्या समुदाय आधारीत सनियंत्रणामध्ये, ग्रामपंचायतीमार्फत देण्यात येणा-या विविध सेवांची जबाबदारीमध्ये स्वयंसहाय्यता गट / संघाचा सहभाग/समावेश करणेबाबत चर्चा

४. ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना वातावरण निर्मिती, जाणीवजागृती व क्षमता बांधणीसाठी स्वयंसहाय्यता गट / संघ व महिलांचा सहभाग आणि ग्रामपंचायत विकास आराखड्याचे अंदाजपत्रक, नियोजन, अंमलबजावणी व सनियंत्रणामध्ये महिलांचा स्वयंप्रेरणेने व अर्थपूर्णरित्या सहभाग निश्चित करावा.

५. महिला, बालके व स्वयंसहाय्यता गट यांच्या समस्या, अडचणी व त्या सोडवण्यासाठी ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये समाविष्ट करावयाच्या उपाययोजना याबाबत विचारविनिमय करणे.

५.२. गावातील मागासवर्गीय व वंचित घटकांची सभा -

ग्रामपंचायतीने गावातील वंचित घटक, विधवा व परित्यक्ता महिला, अपंग,शेतमजूर व मागासवर्गीय घटकांची एकत्रित सभा घ्यावी. या सभेमध्ये त्यांच्या गरजा, समस्या, अडचणी व त्यावरील उपाययोजना तसेच गावाच्या विकासाबाबतच्या भूमिका याबाबत चर्चा घडवून आणावी.

५.३. बालसभा

१. ग्रामपंचायत विकास आराखडा ग्रामसभेमध्ये चर्चा करून निश्चित करण्यात येत असल्याने व ग्रामसभेसाठी १८ वर्षे पूर्ण झालेल्या व मतदार यादीत नाव असलेल्या व्यक्तीस सहभागी होता येत असल्याने, १८ वर्षाखालील बालकांना या ग्रामसभेमध्ये सहभाग घेता येत नाही. त्यासाठी ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना ग्रामपंचायतीने प्राथमिक शाळेत जाणा-या विद्यार्थ्यापासून ते १८ वर्षे वयापर्यंतच्या बालकांसाठी सरपंच यांच्या अध्यक्षतेखाली स्वतंत्र बालसभा आयोजित करावी. या बालसभेमध्ये प्राथमिक शाळेच्या सहाय्याने प्राथमिक शाळेतील सर्व विद्यार्थी व गावातील हायस्कूल, कॉलेजमध्ये जाणारे आणि १८ वर्षे वयापर्यंतच्या सर्व मुले / मुलींचा समावेश असावा. या सभेमध्ये गावातील ० ते १८ वयोगटातील बालकांच्या गरजा, आवश्यकता, मागण्या, शिक्षण, आरोग्य, स्वच्छ पिण्याचे पाणी, विविध स्वरूपाचे दाखले इ. बालकांविषयीच्या सर्व मुद्यांवर चर्चा करावी.

२. बालविवाह, बालमजुर, बाल शोषण यासारख्या बालकांच्या पिळवणूकीच्या बाबी व बाल हिंसा यापासून संरक्षण करण्याबाबत उपाययोजना.

३. पूर्वप्राथमिक शिक्षणाच्या सुविधा व त्यानंतर पुढील शिक्षणाची व्यवस्था

४. गावातील ० ते १८ वर्षे वयोगटातील बालके व गरोदर महिलांच्या पोषणाबाबत मुल्यमापन करून आवश्यक ती उपाययोजना.

६. ग्रामपंचायत विकास आराखडा - प्राधान्यक्रम ठरविणे

वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे निश्चित करताना गावातील विविध घटकांच्या गरजा, समस्या, अडचणी, त्यावरील उपाययोजना, गावाचा सर्वांगिण विकास या सर्व बाबी विचारात घेवून ग्रामसभेमध्ये चर्चा करून उपलब्ध होणा-या निधीच्या प्रमाणात आराखडा अंतीम करण्यासाठी कामे/उपक्रम/कार्यक्रमांचा प्राधान्यक्रम ग्रामसभेत ठरविण्यात यावा. कामे/उपक्रम/कार्यक्रमांचा प्राधान्यक्रम ठरविताना खालील प्रमुख बाबी विचारात घ्याव्यात.

६.१. ग्रामपंचायतीने ग्राम पंचायत विकास आराखड्यांतर्गत गेल्या तीन वर्षामध्ये केलेले ग्रामपंचायत विकास आराखडे, प्रत्यक्षात प्राप्त निधी, हाती घेतलेली कामे, पूर्ण कामे, अपूर्ण कामे, झालेला खर्च व शिल्लक निधी याची माहिती त्याचप्रमाणे पुढील चार वर्षात वर्षनिहाय ग्रामपंचायतीस उपलब्ध होणारा अपेक्षित निधी इ. माहिती ग्रामसभेसमोर ठेवून चर्चा करावी.

६.२. ग्रामसभेमध्ये राज्य व जिल्हा परिषदेच्या विविध विभागाच्या अधिकारी/कर्मचा-यांनी सादर केलेली माहिती विचारात घ्यावी.

६.३. मिशन अंत्योदय अंतर्गत सर्वेक्षणातील माहिती व स्वयंसहाय्यता गटांमार्फत तयार करण्यात आलेला दारिद्र्य निर्मुलन सुक्ष्म पत आराखडा, विविध सर्वेक्षणातील गावाशी संबंधीत माहिती (उदा. शिक्षण, आरोग्य, पशुसंवर्धन इ. विभागांकडील सर्वेक्षण) बाबत चर्चा करावी.

६.४. ग्रामपंचायतीने सर्वसाधारण ग्रामसभेच्या आदल्या दिवशी घेतलेल्या महिलासभा, मागासवर्गीय व वंचित घटकांची सभा व बालसभा यामध्ये झालेली चर्चा व सभेतील निष्कर्श ग्रामसभेसमोर ठेवून त्यावर चर्चा करावी.

६.५. ग्रामपंचायतीच्या कार्यक्षेत्रातील सर्व प्राथमिक शाळा व अंगणवाड्यांच्या कामकाजाच्या अहवालाबाबत ग्रामसभेत चर्चा करावी.

६.६. आमचं गाव, आमचा विकास शासन निर्णय जीपीडीपी-२०१५/ प्र.क्र.३८/ पं.रा-६, ग्राम विकास विभाग, दि. ०४ नोव्हेंबर, २०१५ मधील मुद्दा क्र. ६.१.२ मध्ये नमुद सर्व बाबी विचारात घ्याव्यात. त्याचप्रमाणे आराखडा अंतीम करताना महिला व बालकल्याण १०%, अनुसूचित जाती जमातीच्या कल्याणासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात आणि आरोग्य, शिक्षण, उपजिवीका (Livelihood) २५% याप्रमाणात किमान तरतूद शासनाकडील पत्र जा.क्र.जीपीडीपी २०१५/प्र.क्र.३८/पं.रा.६ दि.०८ जून, २०१६ मधे नमूद केल्या प्रमाणे विभाग निहाय टक्केवारीची तरतूद लागू राहील. संदर्भ क्र. ६ च्या पत्राद्वारे कळविल्यानुसार पंधराव्या वित्त आयोगाच्या ५०% बंधीत निधाचे नियोजन करताना हाती घ्यावयाची कामे आणि या परिच्छेदात वर नमुद केलेले घटक / बाबींवरील खर्च यांची आपापसात व परस्पर सांगड घालावी.

६.७. शासन निर्णय क्रमांक: जीपीडीपी २०१७/प्र.क्र.५१/पं.रा.६, ग्राम विकास विभाग, दिनांक ०२ फेब्रुवारी, २०१८ मधील मुद्दा क्रमांक १ मध्ये नमुद खालील बाबी विचारात घ्याव्यात.

अ) सन २०२०-२१ च्या ग्रामपंचायत विकास आराखड्यामधील अपूर्ण कामे, त्या-त्या निधीतून पूर्ण करण्यासाठी प्रथम पुरेशा प्रमाणात तरतूद करावी.

ब) ग्रामपंचायत हद्दीतील ग्रामपंचायतीच्या मालकीच्या आणि जिल्हा परिषदेच्या मालकीच्या तथापि गावासाठी वापरात असलेल्या सर्व शाळा, अंगणवाड्या इमारतींची दुरूस्ती व देखभालीसाठी पुरेशी तरतूद करावी. यामध्ये ग्रामपंचायत, प्राथमिक शाळा, अंगणवाडी इमारती, स्वच्छतागृहे यांचा समावेश असावा.

क) वरील दोन्ही मुद्यांनुसार पुरेशी तरतुद केल्यानंतर उरलेल्या निधीचे नियोजन प्राधान्यक्रमानुसार आराखड्यातील नविन कामासाठी/उपक्रमासाठी करण्यात यावे.

ड) वार्षिक आराखडा अंतीम करताना एकूण आराखड्याच्या १०% पेक्षा जास्त निधी वैयक्तिक लाभाच्या उपक्रमांवर करू नये.

६.८. शासन निर्णय क्रमांक: जीपीडीपी २०१८/प्र.क्र.५१/पं.रा.६, ग्राम विकास विभाग, दिनांक ०६ सप्टेंबर, २०१८ मधील मुद्दा क्र. ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दारिद्र्य निर्मुलन, मानव विकास, सामाजिक विकास, आर्थिक विकास, पर्यावरणीय व वातावरण विषयक विकास, सार्वजनिक सेवा, सुप्रशासन, कौशल्यवृध्दी, शाश्वत विकासाची ध्येये, स्वच्छता, सांडपाणी व घनकचरा व्यवस्थापन इ. बाबींचा एकात्मिक विचार करावा.

६.९. शासन पत्र क्रमांक: जीपीडीपी २०२०/प्र.क्र.३१/पं.रा.६, ग्राम विकास विभाग, दिनांक १९ मे, २०२० मधील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमुद केल्याप्रमाणे जल जीवन मिशन अतर्गत कामेही विचारात घ्यावीत.

७. महत्वाकांक्षी जिल्हे (Aspirational Districts)

मा.पंतप्रधान यांनी दिनांक ९ ऑगस्ट, २०१७ रोजी, निती आयोगामार्फत निश्चित केलेल्या देशातील ११५ जिल्ह्यांमध्ये केंद्र व राज्य शासनाच्या विविध उपक्रम / योजनांचे अभिसरण (Convergence) करून केंद्र शासन व राज्य शासनाचे अधिकारी यांच्या संयुक्त प्रयत्नाने (Collaboration) आणि जिल्ह्या-जिल्ह्यामधील स्पर्धा (Competition) यामधून जिल्ह्यातील बलस्थाने आणि कमजोरीची क्षेत्रे विचारात घेवून जिल्ह्याचा सर्वांगीण विकास साधणेबाबत महत्वाकांक्षी जिल्हे (Aspirational Districts) हा कार्यक्रम जाहीर केला आहे. या कार्यक्रमांतर्गत ४९ प्रमुख कामगिरी निर्देशके (Key Performance Indicators) निश्चित केलेले आहेत.

या ११५ महत्वाकांक्षी जिल्ह्यांमध्ये (Aspirational Districts) महाराष्ट्रातील नंदूरबार, उस्मानाबाद, वाशिम व गडचिरोली या चार जिल्ह्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. या चार जिल्ह्यांमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना महत्वाकांक्षी जिल्हे (Aspirational Districts) कार्यक्रमांतर्गत निश्चित केलेली प्रमुख कामगिरी निर्देशके (Key Performance Indicators) विचारात घ्यावयाची आहेत.

८. मिशन अंत्योदय

मिशन अंत्योदय हे जीवन आणि जीवनमान यांचे रूपांतर मोजण्यायोग्य दृष्य परिणामामध्ये करण्यासाठी अभिसरण व उत्तरदायित्वाचा ढाचा आहे. (Mission Antyodaya is an Accountability & Convergence Framework for transforming lives and livelihood on

measurable outcomes). यामध्ये राज्यातील सर्व जिल्हे व ग्रामपंचायतींचा समावेश करण्यात आलेला आहे. मिशन अंत्योदय बाबत सविस्तर तपशिल https://missionantyodaya.nic.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना केंद्र व राज्य शासनाच्या विविध विभागाच्या योजना / उपक्रम / कार्यक्रमांचे अभिसरण करून त्याअन्वये ग्रामीण भागातील जीवन व जीवनमान उंचावण्यासाठी आवश्यक त्या बाबीं विचारात घ्याव्यात.

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनोन्नती अभियान (MSRLM), नवी मुंबई यांचे मार्फत मिशन अंत्योदय अंतर्गत पायाभुत सर्वेक्षण, ग्रामपंचायतनिहाय Facilitator च्या नियुक्त्या व Facilitator चे प्रशिक्षण घेण्यात येईल .Facilitator मार्फत बेसलाईन सर्वे पूर्ण करून (MA Mobile App), data upload करुन Poverty Reduction Plan तयार करून ग्रामसभेत सादर करावयाचा आहे.

९. ग्राम सामाजिक परिवर्तन मोहिमेअंतर्गत (VSTF) राज्य शासनाने निवडलेल्या गावांसाठी तयार करण्यात आलेला आराखडा, ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करतांना विचारात घ्यावा.

१०. मॉडेल ग्रामपंचायत क्लस्टर - केंद्र शासनाच्या सूचनेनुसार राज्यातील अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर, ठाणे, जळगाव, गडचिरोली, नाशिक, पुणे, धुळे, कोल्हापूर व नांदेड या अकरा जिल्ह्यातील प्रत्येकी एक क्लस्टर निवड करण्यात आलेला आहे. या क्लस्टर मध्ये निवड केलेल्या ग्रामपंचायतींसाठी (प्रत्येक क्लस्टर मधुन कमाल ५ ग्रामपंचायती) नॅशनल इन्स्टीट्युट ऑफ रुरल डेव्हलोपमेंट ॲन्ड पंचायत राज (NIRDPR), हैद्राबाद यांचेमार्फत स्वतंत्रपणे अतिरिक्त प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या ग्रामपंचायतीमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडे तयार करण्याची प्रक्रिया, सर्व घटकांचा सक्रिय सहभाग, केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, उपक्रम, मोहिमा यांची सांगड घालणे इ. बाबत सविस्तर प्रशिक्षण देऊन या ग्रामपंचायतींचे आराखडे हे मॉडेल आराखडे तयार करावयाचे असून या ग्रामपंचायती आदर्श ग्रामपंचायती करावयाच्या आहेत. या आदर्श ग्रामपंचायती जिल्ह्यातील इतर ग्रामपंचायतींना मार्गदर्शक ठरतील.

११. पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा ग्रामपंचायत विकास आराखडा :

पेसा क्षेत्रातील ग्रामपंचायतींचा पंचवार्षिक व वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी शासन निर्णय क्र.४ नुसार कार्यवाही करावयाची आहे. पेसा क्षेत्रातील प्रत्येक गावासाठी स्वतंत्र महिला सभा, मागासवर्गीय व वंचित घटकांची सभा व बालसभा आणि सर्वसाधारण ग्रामसभा घ्यावयाच्या आहेत. प्रत्येक पेसा गावाच्या ग्रामसभेने आराखडा तयार करावयाचा असून, ग्रामपंचायत क्षेत्रातील सर्व गावांचे आराखडे एकत्र करुन ग्रामपंचायतीने एकत्रीत पंचवार्षिक व वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करावयाचा आहे.

१२. लोकसहभागातून विना-निधी / कमी खर्चाची विकासकामे / उपक्रम ग्रामपंचायत विकास आराखड्यामध्ये विविध योजना अंतर्गत उपलब्ध होणा-या निधी व्यतिरिक्त लोकसहभागातून लोकांची गरज व निकड विचारात घेवून हाती घेण्यात येणा-या विविध स्वरूपाच्या उपक्रमांचा समावेश स्वतंत्रपणे करावयाचा आहे. यामध्ये उदाहरणादाखल खालील उपक्रम घेता येतील.

१. १०० टक्के लसीकरण
२. स्वच्छ व कचरा विरहीत ग्रामपंचायत बाबत जाणीव जागृती
३. शाळा व अंगणवाडीमध्ये १०० टक्के पट नोंदणी व उपस्थिती
४. गावातील सर्व क्षेत्र पिकाखाली आणणे.
५. शोषखड्ड्यांचा व परसबागांचा वापर करून गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन करणे.
६. स्वच्छतागृह व शौचालयांच्या वापराबाबत जाणीव जागृती.
७. कुपोषण मुक्त गाव
८. बालमजुर मुक्त गाव
९. तंटामुक्त गाव, व्यसनमुक्त गाव, प्लास्टीकमुक्त गाव इ.

या उदाहरणादाखल दिलेल्या उपक्रमासाठी निधीची गरज नाही व हे आवश्यक उपक्रम असल्याने यांचा समावेश आराखड्यामध्ये करणेबाबत यापूर्वीही सूचना दिलेल्या आहेत.मात्र त्याप्रमाणे कार्यवाही अभावानेच होत असल्याचे दिसून आले आहे, ही बाब खचितच योग्य नाही. सन २०२१-२२ वर्षाच्या व त्यापुढील वर्षांच्या आराखड्यात यापैकी किमान काही बाबींचा आराखड्यात उल्लेख करुन पुढे त्याची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे

१३. प्रशासकीय व तांत्रिक मान्यता

आमचं गाव, आमचा विकास उपक्रमांतर्गत शासन निर्णय क्रमांक:जीपीडीपी-२०१५/प्र.क्र.३८/पं.रा.६, दिनांक ४ नोव्हेंबर, २०१५ नुसार ग्रामसभेने प्रारूप ग्रामपंचायत विकास आराखडा मंजूर केल्यानंतर, ग्रामपंचायतीने आराखड्यातील प्रत्येक उपक्रमाचा प्रकल्प अहवाल तयार करावयाचा आहे. (राज्य प्रकल्प संचालक यांचेकडील पत्र क्र. राग्रास्वअ/प्रशि/४०६/२०१७-१८, दि. २२ जानेवारी, २०१८ अन्वये विहित केलेल्या नमुन्यात) या सर्व उपक्रमांच्या प्रकल्प अहवालासह ग्रामपंचायत विकास आराखडा तालुकास्तरीय तांत्रिक छाननी समितीकडे सादर करावयाचा आहे. तालुकास्तरीय तांत्रिक छाननी समितीने शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे आराखड्यातील सर्व उपक्रमांची तालुकास्तरीय संबंधीत तांत्रिक अधिका-यामार्फत तांत्रिकदृष्ट्या छाननी व तपासणी करून आराखडा तांत्रिकदृष्ट्या व आर्थिक निकषानुसार योग्य असल्यास त्यास तांत्रिक समिती मान्यता देईल.

तालुकास्तरीय तांत्रिक छाननी समितीकडून आराखडा योग्य असल्याचे कळविल्यानंतर ग्रामपंचायत आराखड्यातील प्रत्येक उपक्रमाचे अंदाजपत्रक तयार करेल. आराखड्यातील बांधकाम, पाणी पुरवठा व लघुसिंचन विभागाकडील कामांच्या बाबतीत ग्रामपंचायत संबंधीत

विभागाच्या सक्षम प्राधिका-याची तांत्रिक मंजूरी घेईल. इतर उपक्रमांच्या बाबतीत तालुकास्तरीय तांत्रिक छाननी समितीने तांत्रिक व आर्थिक दृष्ट्या योग्य असलेल्या उपक्रमांचे ग्रामपंचायत सविस्तर खर्चाचे अंदाजपत्रक तयार करून प्रत्येक उपक्रमास स्वतंत्रपणे ग्रामपंचायतीची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेईल व त्यानंतर उपक्रमाची अंमलबजावणी करेल.

१४. क्षमता बांधणी व प्रशिक्षण

ग्रामपंचायत विकास आराखडा (पंचवार्षिक व वार्षिक ) तयार करताना ग्रामपंचायत कार्यक्षेत्रातील सर्व घटकांचा सक्रिय सहभाग मिळवून त्यांच्या गरजा / निकड विचारात घेण्याच्या दृष्टीकोनातून ग्रामपंचायत स्तरावर या घटकांना आराखड्याविषयीची प्रक्रिया, माहिती, आकडेवारी आणि शाश्वत विकासाची ध्येये (SDG) अवगत करून त्यांचे हक्क व जबाबदा-या याविषयीची जाणीव निर्माण करावयाची आहे. यासाठी प्रशिक्षित संपर्क अधिकारी तथा प्रभारी अधिकारी, प्रशिक्षित पर्यवेक्षिका, सबकी योजना सबका विकास या मोहीमे अंतर्गत प्रत्येक ग्रामपंचायतीसाठी नियुक्त केलेल्या Facilitator,आणि जिल्हा परिषद व राज्य शासनाच्या विविध विभागांच्या अधिकारी / कर्मचा-यांमार्फत ग्रामसभेत त्यांच्या विभागाची सर्व माहिती द्यावयाची आहे.

यासाठी खालीलप्रमाणे मोठ्या प्रमाणात क्षमता बांधणी व प्रशिक्षणाचे कार्यक्रम हाती घ्यावयाचे आहेत.

१. राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांचेमार्फत प्रत्येक जिल्ह्यासाठी चार प्रवीण प्रशिक्षक प्रशिक्षित करण्यात येतील. त्याचप्रमाणे प्रत्येक जिल्हा परिषदेच्या दोन उप मुख्य कार्यकारी अधिका-यांना ( ग्रा.पं. व म.बा.क.) व उपायुक्त ( विकास) यांना राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा, पुणे यांचेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल.

२. या प्रशिक्षित चार प्रवीण प्रशिक्षक आणि दोन उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी खालील प्रशिक्षण/ कार्यशाळा पूर्ण करावयाच्या आहेत व उपायुक्त (विकास) हे याबाबतचे सनियंत्रण करतील .

अ) जिल्हा स्तरीय प्रशिक्षण/ कार्यशाळा१. गणनिहाय नियुक्त केलेले सर्व प्रभारी अधिकारी व पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.) यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण.

१. गणनिहाय नियुक्त केलेले सर्व प्रभारी अधिकारी व पर्यवेक्षिका (ए.बा.वि.से.) यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण.

२. सर्व जि.प. सदस्य

३. जि.प. चे सर्व खातेप्रमुख, सर्व गट विकास अधिकारी आणि जिल्ह्यातील प्रमुख शैक्षणिक व समाजिक संस्थांचे प्रतिनिधी

४. जिल्हा स्तरावरील विविध खात्यांचे राज्य शासनाचे सर्व अधिकारी ( Line Dept.)

५. गट स्तरीय तांत्रिक छाणनी समितीचे सर्व सदस्य

**ब) गट स्तरीय प्रशिक्षण/ कार्यशाळा**

१. तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवक यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण

२. सर्व पंचायत समिती सदस्य, पं. स. स्तरावरील सर्व खातेप्रमुख, तालुका स्तरावरील विविध खात्यांचे राज्य शासनाचे सर्व अधिकारी ( Line Dept.), सर्व विस्तार अधिकारी, पर्यवेक्षिका आणि तालुक्यातील प्रमुख शैक्षणिक व समाजिक संस्थांचे प्रतिनिधी यांची एकदिवशीय कार्यशाळा.

**क) गण स्तरीय कार्यशाळा .**

गण स्तरावर खालील दोन प्रकारच्या कार्यशाळा घ्यावयाच्या आहेत. या कार्यशाळांची जबाबदारी गणनिहाय नियुक्त केलेल्या प्रशिक्षित विस्तार अधिकारी ( प्रभारी अधिकारी) व प्रशिक्षित पर्यवेक्षिका यांचेवर सोपवावी. यासाठी आवश्यकतेनुसार गट विकास अधिकारी यांनी जिल्हा स्तरीय प्रवीण प्रशिक्षक व इतर तालुकास्तरीय यंत्रणेची मदत घ्यावी

१ गणातील सर्व ग्रामपंचायतींचे सर्व सदस्य , ग्रामस्तरीय संसाधन गटाचे सर्व सदस्य व सर्व विभागांचे (जि.प. व राज्य शासन) ग्राम स्तरावरील सर्व कर्मचारी यांची एक दिवसाची कार्यशाळा

२ गणातील सर्व ग्रामपंचायतींमधील स्वयंसहाय्यता गटांच्या ग्रामसंघाचे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष, अंगणवाडी सेविका, ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य आणि समूह संसाधन व्यक्ती (CRPs) यांची एक दिवसाची कार्यशाळा

३ या सर्व प्रशिक्षण/ कार्यशाळांचे वेळापत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी गट विकास अधिका-यांच्या मार्फत निश्चित करून त्यास जिल्हा स्तरावरून प्रसिध्दी द्यावी. या सर्व कार्यशाळा ग्रामसभांचा कार्यक्रम सुरु होण्यापूर्वी पूर्ण करावयाच्या असल्यामुळे त्यानुसार प्रशिक्षण/ कार्यशाळांचे वेळापत्रक मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी निश्चित करावे.

४ जिल्हा व तालुका स्तरीय प्रशिक्षण/ कार्यशाळा आयोजनाची जबाबदारी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.) यांचेवर आणि गणस्तरीय प्रशिक्षण/ कार्यशाळा आयोजनाची जबाबदारी संबंधित गट विकास अधिकारी यांचेवर सोपवावी. या सर्व प्रशिक्षण/ कार्यशाळा आयोजन/खर्चा विषयी सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येत आहेत, त्यानुसार सर्व प्रशिक्षण/ कार्यशाळा विहित मुदतीत सुरळीतपणे व गुणवत्तापूर्वक पार पाडण्याची जबाबदारी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेवर सोपवण्यात येत आहे.

*१५.* ग्राम पंचायत विकास आराखडा वेळापत्रक

जिल्हयातील सर्व ग्राम पंचायतीचे वार्षिक आराखडे तयार करुन ते ई-ग्राम स्वराज या पोर्टलवर दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत अपलोड करावयाचे असल्याने , त्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण व कार्यशाळा यांचे वेळपत्रक परिशिष्ट २ नुसार निश्चित करण्यात येत आहे. त्यानुसार

राज्य ग्रामीण विकास संस्था, यशदा पुणे व सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कार्यवाही करावयाची आहे.

१६. *माहिती, शिक्षण व संवाद :-*

ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्यासाठी ग्राम पंचायत कार्यक्षेत्रातील सर्व घटकांना या विषयीची संपूर्ण माहिती मिळणे अपेक्षित आहे. त्यासाठी व सर्व घटकांचा सक्रीय सहभाग मिळण्यासाठी ग्राम पंचायत विकास आराखडा तयार करण्याच्या या शासन निर्णयामध्ये नमूद सर्व प्रक्रीयांना जिल्हास्तरावरुन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जास्तीत जास्त प्रसिध्दी द्यावी. यासाठी जिल्हा, तालुका आणि गण स्तरावर ( Cluster Level) घेण्यात येणा-या कार्यशाळांचे वेळापत्रक आणि ग्राम सभांच्या वेळापत्रकास जिल्हा व तालुकास्तरावरुन प्रसिध्दी द्यावी. यासाठी जिल्हा व तालुका स्तरावर प्रेस कॉन्फरंस घेणे, ठळक ठिकाणी मोठे बोर्ड/ फलक लावणे इ. उपक्रम हाती घेता येतील.

१७. केंद्र व राज्य शासनाच्या वेबसाइटवर आराखडे अपलोड करणे:-

केंद्र शासनाने विकसित केलेल्या ई-ग्राम स्वराज या वेबपोर्टलवर ग्रामसभांमार्फत अंतीम करण्यात आलेले सन २०२१-२२ या वर्षाचे ग्रामपंचायत विकास आराखडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत अपलोड करण्याची जबाबदारी संबंधीत ग्रामसवेक व केंद्रचालक यांचेवर सोपवावी. सर्व ग्रामपंचायतींचे ग्रामपंचायत विकास आराखडे मुदतीत अपलोड करून घेण्याची दक्षता संबंधित गट विकास अधिका-यांनी घ्यावी व त्याचा नियमित आढावा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) यांनी घ्यावा.

१८. पारदर्शकता, उत्तरदायित्व व सनियंत्रण

१८.१. ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करताना गावातील सर्वांना ग्रामपंचायतीस उपलब्ध होणारा निधी, अपूर्ण कामासाठी आवश्यक निधी व प्राधान्यक्रमाने प्रस्तावित करावयाची कामे व आराखड्याविषयीची अनुषंगिक माहिती व आकडेवारी पारदर्शकपणे उपलब्ध करून देवून, जास्तीतजास्त व्यक्तींचा सहभाग प्राप्त करून घ्यावयाचा आहे. ग्रामसभेने मंजूर केलेल्या अंतीम ग्रामपंचायत विकास आराखड्याची माहिती ग्रामपंचायतीने खालील नमुन्यात ऑईल पेंटने नोटीस बोर्ड / फलक तयार करून ग्रामपंचायत इमारत किंवा गावातील मध्यवर्ती ठिकाणी दर्शनी भागावर लावावा.

## ग्रामपंचायत विकास आराखडा सन २०२१-२२

**ग्रामपंचायतीचे नाव :** **तालुका -** **जिल्हा -**

ग्रामपंचायतीस सन २०२१-२२ मध्ये उपलब्ध होणारा एकूण निधी रूपये. ------------/-

| अ.क्र. | प्रकल्प / उपक्रम / कामाचे नाव | कामाचे ठिकाण | आराखड्यातील तरतूद (रूपये) | प्रकल्प / उपक्रम / काम हाती घेवून पूर्ण करण्याचा अपेक्षित कालावधी | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | **पासून.** | **पर्यंत** |
| **अ** | अपूर्ण प्रकल्प / उपक्रम / कामे. | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| **ब** | देखभाल व दुरूस्तीची कामे | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| **क** | नविन प्रकल्प / उपक्रम / कामे | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | **एकूण** | | | | |

१८.२. शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेबर, २०१५ मधील मुद्दा क्र. ७.५.१ अन्वये प्रत्येक ग्रामपंचायतीने सामाजिक लेखापरिक्षण समितीची स्थापना ग्रामसभेमार्फत करावयाची आहे. या समितीने ग्रामपंचायतीने हाती घेतलेल्या कामांचे सामाजिक लेखापरिक्षण करून त्याचा अहवाल दर तीन महिन्यांनी ग्रामपंचायत व ग्रामसभेकडे सादर करावयाचा आहे. या समितीची स्थापना करून ती कार्यान्वित करावी. या समितीचा बोर्ड / फलक ग्राम पंचायत इमारतीवर लावावा व त्याचा नियमित आढावा गट विकास अधिकारी यांनी घ्यावा.

१८.३.शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेबर, २०१५ मधील मुद्दा क्र. ७.५.२ अन्वये प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये कार्यगट स्थापन करून ग्रामपंचायत विकास आराखड्यामधील कामांची गुणवत्ता व प्रगती याची पाहणी करून अंमलबजावणीबाबतचा अहवाल ग्रामपंचायत व

ग्रामसभेकडे सादर करावयाचा आहे. त्यादृष्टीने सदर गट कार्यान्वित करावा. या कार्यगटाचा बोर्ड / फलक ग्राम पंचायत इमारतीवर लावावा.

१८.४. शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेबर, २०१५ अन्वये सूचना दिल्यानुसार जिल्हास्तरीय सनियंत्रण व कार्यकारी समितीच्या नियमित बैठका घेवून कार्यक्रमाचा आढावा घ्यावा.

१८.५. तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांनी महिन्यातून दोन वेळा ग्रामसेवकांची व तीन महिन्यातून एकदा सरपंच व ग्रामसेवक यांची एकत्रित बैठक घेवून कार्यक्रमाचा आढावा घ्यावा.

१८.६. प्रत्येक ग्रामपंचायतीच्या वार्षिक आराखड्याची नोंद तालुकास्तरावर गट विकास अधिकारी यांनी घेवून तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचा एकत्रित अहवाल जिल्हास्तरावर दि. १५ जानेवारी, २०२१ पर्यंत सादर करावयाचा असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायतींचा ग्राम पंचायत विकास आराखड्यांचा एकत्रित अहवाल शासनास व राज्य व्यवस्थापन कक्ष (पंचायतराज), पुणे यांचेकडे दि. २५ जानेवारी, २०२१ पूर्वी सादर करावा. वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडा अहवाल नमुना परिशिष्ट १ नुसार विहित करण्यात येत आहे.

१९. "सबकी योजना सबका विकास" मोहिम

केंद्र शासनाच्या ग्राम विकास व पंचायती राज मंत्रालयाने "सबकी योजना सबका विकास" लोकसहभागातून लोकांचा ग्रामपंचायत विकास आराखडा ही मोहीम दिनांक २ ऑक्टोबर, २०२० ते ३१ जानेवारी, २०२१ या कालावधीत राबविणेचे निश्चित केलेले आहे. या मोहीमे अंतर्गत राज्य शासनाचे विविध विभागांचा सहभाग, विविध विभागांमार्फत ग्रामपंचायत क्षेत्रामध्ये राबविण्यात येत असलेल्या केंद्र व राज्य शासनाच्या विकास योजनांचे अभिसरण करून सन २०२१-२२ चा ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करावयाचा आहे. गतवर्षीप्रमाणे या वर्षी सदर मोहिमेची अंमलबजावणी करुन ग्रामपंचायत विकास आराखडा यापूर्वी वर नमुद केल्याप्रमाणे दि. ३१ डिसेंबर, २०२० पर्यंत अंतीम करावयाचा असून केंद्र शासनाच्या वेबपोर्टलवर अपलोड करावयाचा आहे.

२०. मा. सचिव, पंचायती राज मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडील दि. १८.०८.२०२० च्या अ.शा. पत्रात उल्लेख केल्याप्रमाणे आणि सध्याच्या कोविड -१९ च्या पार्श्वभुमीवर वरील मार्गदर्शक सूचनानुसार ग्राम पंचायत विकास आराखड्यांना ग्रामसभांमध्ये मान्यता घेताना , खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

१. विविध सभा घेताना सामाजिक अंतर, सॅनिटायझेशन, मास्कचा वापर व याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे पालन करावे

२. महिला, बालसभा आणि मागासवर्गीय व वंचित घटकांच्या सभा घेतल्यानंतर ग्राम सभेऐवजी ग्रामपंचायतीच्या मासिक विशेष सभेमध्ये ग्रामपंचायत विकास आराखडा तयार करावा. त्यासाठी या मार्गदर्शक सूचनामध्ये वर नमुद केलेल्या व ग्रामसभेमध्ये पूर्ण करावयाच्या सर्व बाबी/

कार्यपध्दती ग्रामपंचायतीच्या मासिक सभेमध्ये पूर्ण कराव्यात व ग्रामपंचायत विकास आराखडा अंतीम करावा.

३. ज्या ग्रामपंचायतीमध्ये प्रशासक नियुक्त केलेले आहेत, तेथे प्रशासकांनी ग्रामपंचायतींच्या मासिक सभेची याविषयीची जबाबदारी पूर्ण करुन ग्रामपंचायत विकास आराखडा अंतीम करावा.

४. वरील प्रमाणे अंतीम केलेले ग्रामपंचायत विकास आराखडे, ग्रामपंचायतीच्या यानंतर होणा-या ग्रामसभेमध्ये ठेवुन ग्रामसभेची मंजुरी घ्यावी.

५. ग्रामपंचायत मासिक सभा किंवा प्रशासकांनी अंतीम केलेले ग्रामपंचायत विकास आराखडे केंद्र शासनाच्या बेब साइट वर अपलोड करावेत.

६. अशाप्रकारे निश्चित केलेल्या आराखड्यांना माहिती फलकांद्वारे प्रसिध्दी द्यावी.

शासन निर्णय दिनांक ४ नोव्हेबर, २०१५, दिनांक ८ जून, २०१६, दिनांक २ फेब्रुवारी, २०१८, दिनांक ६ सप्टेंबर, २०१८ व दिनांक २९ मे, २०१९ अन्वये दिलेल्या मार्गदर्शक सूचना आणि वर नमुद केलेल्या सर्व बाबी विचारात घेवून सर्व ग्रामपंचायतींचा सन २०२१-२२ या वर्षाचा ग्रामपंचायत विकास आराखडा सोबत परिशिष्ट २ मध्ये विहित केलेल्या वेळापत्रकाप्रमाणे पूर्ण होईल याची दक्षता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी घ्यावयाची आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२००९०७१४५१०९२१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Neela Ranade

Digitally signed by Neela Ranade
DN: cn=Neela Ranade, o=Rural Development Department, ou=Under Secretary, email=neela.ranade@gov.in, c=IN
Date: 2020.09.30 14:49:21 +05'30'

**( नीला रानडे )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदय यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई-३२
३. सर्व मा.मंत्री/मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.विरोधी पक्षनेते, विधानपरिषद/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
५. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक,

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव / सचिव (वित्त / नियोजन/ ग्राम विकास/ जलसंधारण/ महसूल/ महिला व बाल विकास/ आदिवासी विकास / सामाजिक न्याय / सार्वजनिक आरोग्य/ पाणी पुरवठा/ सार्वजनिक बांधकाम

७. सर्व सन्माननीय विधानपरिषद /विधानसभा सदस्य व संसद सदस्य महाराष्ट्र राज्य.

८. विभागीय आयुक्त (सर्व विभाग),

९. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)

१०.जिल्हाधिकारी (सर्व)

११.राज्य प्रकल्प संचालक, राज्य प्रकल्प व्यवस्थापक कक्ष (राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान), ए-९, शिवसागर अपार्टमेंट, मोदीबाग, गणेशखिंड रोड, शिवाजीनगर, पुणे-४११०१६

१२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,

१३.माहिती व तंत्रज्ञान कक्ष, ग्रामविकास विभाग, मर्झबान रोड, फोर्ट, मुंबई,

१४.सह सचिव/ उप सचिव, ग्राम विकास विभाग (सर्व)

१५.निवड नस्ती. (पं.रा.-६)

परिशिष्ट १

वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे (जिल्ह्याचा गोषवारा)

सन २०२१-२२

जिल्ह्याचे नाव -

| अ.क्र. | तालुक्याचे नाव | ग्रा.पं. संख्या | तालुक्यातील सर्व ग्रा.पं.चे एकत्रित अपेक्षित उत्पन्न | | | | | | वार्षिक आराखड्यामध्ये प्रमुख विभागांतर्गत प्रस्तावित उपक्रम व रक्कमेचा तपशिल | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | स्वच्छतेच्या मुलभूत सुविधा व हागणदारी मुक्त उपक्रमांची देखभाल दुरूस्ती | | पिण्याचे पाणी व पाऊस-पाणी संकलन व पुनर्वापर | | शिक्षण | |
| | | | स्वनिधी | वित्त आयोग | मनरेगा | स्वच्छ भारत अभियान | इतर निधी | एकूण | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० | ११ | १२ | १३ | १४ | १५ |
| १ | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | |
| सरासरी | | | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद-----------------

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद-----------------

परिशिष्ट १

वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे (जिल्ह्याचा गोषवारा)

सन २०२१-२२

जिल्ह्याचे नाव -

| वार्षिक आराखड्यामध्ये प्रमुख विभागांतर्गत प्रस्तावित उपक्रम व रक्कमेचा तपशिल | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुक्याचे नाव | ग्रा.पं. संख्या | आरोग्य | | उपजिवीका व पोषण | | महिला बालकल्याण विकास | | मागासवर्गीयांचा विकास | | बांधकामे | | रस्ते | |
| | | | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | | | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम |
| १ | २ | ३ | १६ | १७ | १८ | १९ | २० | २१ | २२ | २३ | २४ | २५ | २६ | २७ |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | |
| सरासरी | | | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद-----------------

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद-----------------

परिशिष्ट १

वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे (जिल्ह्याचा गोषवारा)

सन २०२१-२२

जिल्ह्याचे नाव -

| वार्षिक आराखड्यामध्ये प्रमुख विभागांतर्गत प्रस्तावित उपक्रम व रक्कमेचा तपशिल | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुक्याचे नाव | ग्रा.पं. संख्या | कृषी | | पशु संवर्धन | | जलसंधारण | | गटारे | | घन कचरा व्यवस्थापन | | सौर व अपारंपारिक उर्जा | |
| | | | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम |
| १ | २ | ३ | २८ | २९ | ३० | ३१ | ३२ | ३३ | ३४ | ३५ | ३६ | ३७ | ३८ | ३९ |
| १ | | | | | | | | | | | | | | |
| २ | | | | | | | | | | | | | | |
| ३ | | | | | | | | | | | | | | |
| ४ | | | | | | | | | | | | | | |
| ५ | | | | | | | | | | | | | | |
| ६ | | | | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | | | | |
| सरासरी | | | | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद----------------

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद----------------

परिशिष्ट १

वार्षिक ग्रामपंचायत विकास आराखडे (जिल्ह्याचा गोषवारा)

सन २०२१-२२

जिल्ह्याचे नाव -

| वार्षिक आराखड्यामध्ये प्रमुख विभागांतर्गत प्रस्तावित उपक्रम व रक्कमेचा तपशिल | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | तालुक्याचे नाव | ग्रा.पं. संख्या | विविध प्रशिक्षण कार्यक्रम | | | लोकसहभागाची व इतर खर्च न येणारी (Costless) कामे | | इतर (असल्यास तपशील द्यावा) | | एकूण | |
| | | | प्रशिक्षणाचे नाव | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम | उपक्रम संख्या | रक्कम |
| १ | २ | ३ | ४० | ४१ | ४२ | ४३ | ४४ | ४५ | ४६ | ४७ | ४८ |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | |
| एकूण | | | | | | | | | | | |
| सरासरी | | | | | | | | | | | |

स्वाक्षरी/-
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
जिल्हा परिषद-----------------

स्वाक्षरी/-
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद-----------------

## परिशिष्ट २

## ग्रामपंचायत विकास आरखडा (सन २०२१-२२) कार्यक्रम वेळापत्रक

| अ.नं. | उपक्रम | प्रशिक्षण कालावधी - दिवस | प्रशिक्षण पूर्ण करावयाची अंतीम मुदत | कार्यवाही करणारी संस्था / अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | प्रवीण प्रशिक्षकांचे प्रशिक्षण | २ | ३०.०९.२०२० | मु.का.अ. आणि यशदा |
| २ | प्रशिक्षण गरजांचे विश्लेषण, प्रशिक्षण मोड्युल,प्रशिक्षण साहित्य, वाचन साहित्य व सीडी तयार करणे | | ३०.०९.२०२० | यशदा |
| ३ | राज्यस्तरीय अधिकारी व मु.का.अ. यांची कार्यशाळा | १ | ३०.०९.२०२० | यशदा |
| ४ | उपमुख्य कार्यकारीअधिकारी (ग्रा.पं. व म.बा.क.) व उपायुक्त (विकास) यांची कार्यशाळा | १ | ०५.१०.२०२० | यशदा |
| ५ | जिल्हास्तर-जि.प.सदस्यांची कार्यशाळा | १ | १५.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं) |
| ६ | जिल्हास्तर-जि.प.व राज्यशासनाचे जिल्हास्तरीय खातेप्रमुख व ग.वि.अ. यांची कार्यशाळा | १ | १५.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं) |
| ७ | जिल्हास्तर-गट स्तरीय तांत्रिक छाननी समिती सदस्यांची कार्यशाळा | १ | १५.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं) |
| ८ | जिल्हास्तर-गण निहाय नियुक्त केलेले प्रभारी अधिकारी (विस्तार अधिकारी) यांचे प्रशिक्षण | २ | २०.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) व प्रवीण प्रशिक्षक. |
| ९ | जिल्हास्तर-गण निहाय नियुक्त केलेल्या मुख्य सेविका यांचे प्रशिक्षण | २ | २०.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) व प्रवीण प्रशिक्षक. |

## परिशिष्ट २

## ग्रामपंचायत विकास आरखडा (सन २०२१-२२) कार्यक्रम वेळापत्रक

| अ.नं. | उपक्रम | प्रशिक्षण कालावधी - दिवस | प्रशिक्षण पूर्ण करावयाची अंतीम मुदत | कार्यवाही करणारी संस्था / अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १० | तालुकास्तर- तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच व ग्रामसेवक | २ | २५.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ.व प्रभारी अधिकारी |
| ११ | तालुकास्तर- सर्व पं.स.सदस्य,तालुक्यातील सर्व विभागांचे (राज्य व जि.प.) तालुकास्तरीय अधिकारी, पं.स. चे सर्व अधिकारी/कर्मचारी, तालुक्यातील प्रमुख शैक्षणिक व सामाजिक संस्थांचे प्रतिनिधी | १ | २५.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ.व प्रभारी अधिकारी |
| १२ | गण स्तर - गणातील सर्व ग्रामपंचायतींचे सदस्य, ग्राम संसाधन गटाचे सर्व सदस्य, राज्य शासन व जि.प.चे ग्राम स्तरावरील सर्व कर्मचारी | १ | ३०.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ.व प्रभारी अधिकारी |
| १३ | गण स्तर -गणातील सर्व ग्रामपंचायतींमधील स्वयंसहाय्यता गटांच्या ग्रामसंघाचे अध्यक्ष, सचिव व कोषाध्यक्ष, अंगणवाडी सेविका, ग्राम बाल संरक्षण समितीचे सदस्य आणि समूह संसाधन व्यक्ती (CRPs) | १ | ३०.१०.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ., प्रभारी अधिकारी व मुख्यसेविका |
| १४ | जिल्ह्यांनी सर्व ग्रामपंचायतींच्या ग्रामपंचायत बैठकीचे वेळापत्रक निश्चित करून त्यास प्रसिद्धी देणे | | ०५.११.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ., प्रभारी अधिकारी |

# परिशिष्ट २

## ग्रामपंचायत विकास आरखडा (सन २०२१-२२) कार्यक्रम वेळापत्रक

| अ.नं. | उपक्रम | प्रशिक्षण कालावधी - दिवस | प्रशिक्षण पूर्ण करावयाची अंतीम मुदत | कार्यवाही करणारी संस्था / अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १५ | ग्रामस्तर- महिला सभा, मागासवर्गीय व वंचित घटकांची सभा व बालसभा | | ग्रा.पं.च्या विशेष सभेच्या अगोदर ३ ते ४ दिवस | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ., प्रभारी अधिकारी व मुख्यसेविका -सरपंच व ग्रामसेवक |
| १६ | ग्रामस्तर- ग्रामपंचायत विशेष सभा | | ३१.१२.२०२० | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ., प्रभारी अधिकारी व मुख्यसेविका -सरपंच व ग्रामसेवक |
| १७ | ग्रामपंचायत विकास आराखडा ई-ग्राम स्वराज या वेबपोर्टल वर अपलोड करणे | | १५.०१.२०२१ | ग.वि.अ.,प्रभारी अधिकारी, ग्रामसेवक आणि केंद्रचालक |
| १८ | सन २०२०-२१ चा अंतिम ग्रामपंचायत विकास आराखडा विहित केलेल्या नमुन्यात बोर्ड/फलकाद्वारे प्रसिध्द करणे | | २०.०१.२०२१ | मु.का.अ. / उप मु.का.अ.(पं./म.बा.क.) / ग.वि.अ., प्रभारी अधिकारी व मुख्यसेविका -सरपंच व ग्रामसेवक |

स्वच्छ भारत अभियान(ग्रामीण)टप्पा २
ग्रामपंचायतीमध्ये वैयक्तिक तसेच सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनबाबत मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन

## पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः स्वभामि २०२०/प्र.क्र.११६ /पापु १६
मंत्रालय, ७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,
लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.
दिनांक : २८ ऑक्टोबर,२०२०.

वाचा-

१) शासन निर्णय क्रमांकः स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२, बाबत केंद्र शासनाच्या माहे जुलै २०२० च्या मार्गदर्शक सूचना.
२) शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०१९/प्र.क्र.१४१/पापु १६, दिनांक १९ जुलै,२०१९.
३) शासन निर्णय क्रमांकः जजमि २०१९/प्र.क्र.१३८ /पापु-१०(०७) दि.०४.०९.२०२०

ग्रामीण भागातील जीवनमानाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने, वैयक्तिक स्वच्छता, वैयक्तिक शौचालय, सार्वजनिक शौचालय, शाळा व अंगणवाडीमध्ये शौचालयाची सुविधा, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, इत्यादी घटकांची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-१ अंतर्गत करण्यात आली आहे. त्यानुसार राज्यातील ग्रामीण भागातील सर्व ग्रामपंचायती विहित प्रक्रियेद्वारे हागणदारीमुक्त करण्यात आल्या आहेत. वरील घटकांमध्ये शाश्वतता राखण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा - २ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत नवीन निकष व नविन मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे.

उपरोक्त नमूद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, संदर्भाधीन क्रमांक २ येथील, शासन निर्णयातील सुचना अधिक्रमित करून हागणदारीमुक्त झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये वैयक्तिक तसेच

सार्वजनिक स्तरावर घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबविणेबाबत पुढीलप्रमाणे सुचना देण्यात येत आहेत:-

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन म्हणजे ग्रामीण भागातील घनकचरा व सांडपाणी एकत्र गोळा करून, त्याचे निश्चित केलेल्या ठिकाणी एकत्र विकेंद्रीत आणि केंद्रीत (सोयीनुसार) प्रक्रिया करणेकामी वहन करणे, पुर्नचक्रिकरण, शुद्धीकरण व दोन्ही कच-यांची शास्त्रोक्त पद्धतीने व्यवस्थापन करणे /विल्हेवाट लावणे होय. घनकचरा म्हणजे कोणत्याही मानवी समुदायात घरगुती, सार्वजनिक व व्यापारी कामकाजातून काही घनपदार्थ निरूपयोगी म्हणून बाजूला काढले जातात, प्रत्यक्षात ते पदार्थ उपयोगी असले तरी त्यावेळच्या विशिष्ठ कामानंतर निरूपयोगी ठरतात. (मानवी तथा प्राण्यांच्या मलमुत्राशिवाय) सांडपाणी म्हणजे कोणत्याही मानवी समुदायात घरगुती, सार्वजनिक व व्यापारी कामकाजातून काही निरूपयोगी द्रवपदार्थ जसे स्नानगृहातील आंघोळीचे, कपडे धुतलेले पाणी, स्वंयपाक घरातील भांडी धुतलेले, हात धुतलेले अन्नकण मिश्रीत पाणी, औद्योगिक प्रक्रियेतून निर्माण झालेले पाणी [मलमुत्र विरहित सांडपाणी ( ग्रे वॉटर ) ], तसेच सेप्टीक टँक मधील वाहून जाणारे मलमिश्रीत पाणी व मानवी मुत्र [मलमुत्र मिश्रीत सांडपाणी ( सिवेज किंवा ब्लॅक वॉटर )].

२. या शासन परिपत्रकामध्ये नमूद केलेल्या विविध घटक व उपांगाचा अर्थ, केंद्र शासनाच्या जुलै, २०२० मध्ये निर्गमित केलेल्या सूचनांप्रमाणे घेण्यात यावा.

३. विषयाधीन घटकासाठी, लोकसंख्या आधारित अर्थसहाय्य अनुज्ञेय असून, केंद्र व राज्याच्या अर्थसहाय्याचा हिस्सा केन्द्र शासनाने लागू केलेल्या विविध बंधनकारक वजावटी कपात केल्यानंतर, ६०: ४० या प्रमाणात आहे. यामध्ये लाभार्थी ग्रामपंचायतीचा हिस्सा निरंक आहे. याकरिता अनुज्ञेय अनुदानाचा तपशिल परिशिष्ठासोबतच्या **प्रपत्र** “ब” व “क” मध्ये नमूद करण्यात आला आहे.

**३.१** केन्द्र शासनाने माहे जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनान्वये, या टप्यात घ्यावयाच्या काही कामाकरीता १५ वा वित्त आयोगाच्या ग्रामपंचायतीना मिळणारा निधी, नरेगा व इतर निधी स्त्रोतांच्या कृतीसंगमातून घ्यावयाचा आहे. लागू केलेले उपांगनिहाय / बाबवार वित्त स्त्रोत कृतिसंगम (Convergence) तपशिल परिशिष्ठासोबतच्या विवरणपत्र “ड” मध्ये नमूद करण्यात आला आहे.

**४. गाव निवडीचे निकष:-**

**४.१ ग्राम स्तरीय उपांगासाठी निकष (घनकचरा व्यवस्थापन व ग्रे वॉटर मॅनेजमेन्ट):-**

i) केंद्र शासनाच्या जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार ग्रामपंचायत हागणदारीमुक्त म्हणून घोषित केलेली असावी व स्वच्छ भारत अभियान ग्रामीण टप्पा-२ मधील सदर प्रकल्प राबविण्यासाठी सदर गावाचा वार्षिक अंमलबजावणी आराखड्यामध्ये (AIP) समावेश असावा. सदर

गावाचा वार्षिक अंमलबजावणी आराखड्यामध्ये (AIP) समावेश असल्याची खातरजमा गटविकास अधिकारी यांनी करावी.

ii) नदी काठच्या वा जलाशयाच्या काठावरील गावांना प्रथम प्राधान्य द्यावे. तदनंतर मोठया लोकसंख्येच्या गावांना प्राधान्य द्यावे.

iii) प्रकल्प राबविण्यासाठी आराखड्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतींकडे स्वत:च्या मालकीची वा शासकीय जागा असावी.

iv) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार निर्मित प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती शाश्वतपणे करण्यात येईल तसेच त्याच्या देखभाल व दुरूस्तीसह अनुषंगिक खर्च, संबधित ग्रामपंचायतीकडून स्वनिधीमधून करण्यात येईल, याबाबतच्या ठरावासह ग्रामपंचायतीने हमीपत्र उपलब्ध करून देणे. संबंधित गट विकास अधिकाऱ्यांने याबाबीची पुर्तता होईल याची खात्री करावी.

v) ग्रामपंचायतीने शाश्वत स्वच्छता आराखडा तयार करून, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना सादर केलेला असावा व आराखड्यामधील (Sustainable Sanitation Plan) बाबींची पूर्तता होईल, याबाबतचे हमीपत्र ग्रामपंचायतीने द्यावे.

vi) ग्रामपंचायतीमधील ज्या गावासाठी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प राबवावयाचा आहे, अशा गावामध्ये, मागील ५ वर्षामध्ये, निर्मल भारत अभियान वा स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनांमधून, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण ) टप्पा-२ अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेपर्यंत प्रकल्प राबविण्यात आलेला नसावा.

**४.२ जिल्हा स्तरीय उपांगासाठी निकष (प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन [ फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधन करीता) :-**

i) जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती हागणदारीमुक्त म्हणून घोषित केलेल्या असाव्यात व सदर प्रकल्प राबविण्यासाठी सदर जिल्हा स्तरीय उपांगांचा वार्षिक अंमलबजावणी आराखड्यामध्ये (AIP) समावेश असावा.

ii) **प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन [फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधन**साठी प्रकल्प राबविण्यासाठी जिल्हापरिषदेकडे जिल्हा परिषदेच्या मालकीची वा शासकीय जागा असावी. ग्राम पंचायतीची जागा उपलब्ध असल्यास, प्रकल्पासाठी जागा देण्याबाबतचे, ग्राम पंचायतीचे हमीपत्र घ्यावे.

iii) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती शाश्वतपणे करण्यात येईल व त्यांची देखभाल व दुरूस्तीसह अनुषंगिक खर्च, संबधित जिल्हापरिषदेने

स्वनिधीमधून करण्यात येईल, याबाबतच्या ठरावासह जिल्हा परिषदेने हमीपत्र उपलब्ध करून देणे.

iv) जिल्हापरिषदेने **प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन [फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधन**साठी, मागील ५ वर्षामध्ये, निर्मल भारत अभियान वा स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनांमधून, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेपर्यंत प्रकल्प राबविण्यात आलेला नसावा. प्रकल्प राबविण्यात आला असल्यास व अनुदान मर्यादा शिल्लक असल्यास त्या मर्यादेतच या योजनेतून प्रकल्प घेता येईल.

**५. कार्यपध्दती:-**

**५.१ ग्रामस्तरिय उपांगाकरीता ( घनकचरा व्यवस्थापन व ग्रे वॉटर मॅनेजमेन्ट)**

i) संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्रमाक १४.१ मधील तरतुदीनुसार, राबवावयाच्या प्रकल्पाचा संबधित ग्रामपंचायतीच्या तपशिलासह, लोकसहभागावर आधारित सन २०२०-२१ ते सन २०२४-२५ या कालावधीतील प्रत्येक वित्तीय वर्षाकरिता प्रचलित पद्धतीनुसार गावनिहाय आराखडा तयार करून, ग्रामपंचायतीने केन्द्र शासनाच्या आयएमआयएस या संकेतस्थळावर गावनिहाय आराखडयाची माहिती भरावी. ( संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्रमांक ९.१)

ii) उपरोक्त परिच्छेद ४.१ मध्ये नमूद निकषांची पुर्तता करणा-या ग्रामपंचायतीस, सोबतच्या विवरणपत्र-अ प्रमाणे ग्रामसभेच्या विहित ठरावासह, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, यांचेकडे गावनिहाय स्वतंत्र अर्ज करता येईल. स्वच्छ भारत अभियान (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत अनुज्ञेय अनुदाना पेक्षा कमी रक्कमेची कामे पुर्ण केली असल्यास, फरकाच्या रक्कमेसाठी कामे करण्यास ग्रामपंचायतीना विवरणपत्र-अ प्रमाणे अर्ज करता येईल.

iii) संबधित गट विकास अधिकारी, पंचायतसमिती यांनी प्राप्त अर्जांची वरील अनुक्रंमाक ४.१ मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार छाननी करावी व पात्र प्रस्तावाच्या अनुषंगाने, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, जिल्हा परिषद, यांनी कृतीसंगम (Convergence) निहाय निधीची विगतवारी नमूद करून, सविस्तर अंदाजपत्रके तयार करण्यात यावे.

iv) अंदाजपत्रक व आराखडयास ग्रामसभेची मान्यता घेवून, ग्रामसभा ठरावासह प्रस्ताव, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, पंचायत समिती यांनी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांचेकडे सादर करावा. गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यांना सादर करावेत. कार्यकारी अभियंता,

ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यांनी प्रस्तावास तांत्रिक मान्यता देऊन, प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यांना सादर करावेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून, पात्र प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तपासणीअंती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करावी.

v) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी प्रकल्पासाठी अंदाजित खर्च, अतिरिक्त इतर स्रोताद्वारे उपलब्ध निधी, प्रकल्पांतर्गत करावयाच्या कामांचे थोडक्यात विवरण यासह, निधी मागणी प्रस्ताव, लेखाधिकारी, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांच्याकडे पाठवावेत. निधी मागणी प्रस्तावात, जिल्हापरिषदांकडे स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत शिल्लक असलेला निधी नमूद करावा.

vi) सदर प्रस्तावांची लेखाधिकारी, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांनी छाननी करून, प्रस्ताव अभिप्रायासह शासनास (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग) सादर करावा. निधीची उपलब्धतता विचारात घेवून, शासन स्तरावरून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना निधी वितरित करण्यात येईल. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी त्यांच्या स्तरावरून, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना निधी वितरित करावा. जिल्हापरिषदांकडे निधी उपलब्ध असला तरी शासनास नमूद माहितीसह प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

vii) उपरोक्तनुसार शासनाकडून मान्यता प्रदान केल्यानंतर, जिल्हा परिषद लेखा संहितेमधील विहित कार्यपद्धती अवलंबून कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी निविदा प्रपत्र तयार करून, त्यास मान्यता प्रदान करून, शासकीय विहीत पध्दती पाळून निविदा बोलावून व जिल्हा पाणी व स्वच्छता समितीची मान्यता घेऊन कार्यादेश द्यावेत व प्रकल्पाची कामे विहित कालमर्यादेमध्ये पूर्णत्वास न्यावीत. प्रगतीपथावरील कामांच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने कामाचे मोजमाप पुस्तिकेमध्ये (Measurement Book) नोंद करावी. प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर, प्रकल्प वित्तीय वर्षात पूर्ण करण्याची जबाबदारी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती व उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

viii) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, मान्यता प्राप्त प्रकल्प, विहित कालावधीमध्ये कार्यान्वित होतील, यादृष्टीने प्रकल्पांचा जिल्हा पाणी व स्वच्छता समितीने त्रैमासिक आढावा घेवून, गटविकास अधिकारी यांच्या कामकाजावर नियंत्रण ठेवावे, सनियंत्रण करावे व प्रकल्पाची माहिती MIS वर नोंदविण्यात आली आहे याची खातरजमा करुन प्रकल्पांच्या प्रगतीचा अहवाल, प्रत्येक महिन्यास पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर करावा

**ix)** प्रकल्प अंमलबजावणी दरम्यान कामाची तपासणी, त्रयस्थ यंत्रणा म्हणून, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मीत्रा -नाशिक, नीरी-नागपूर, उन्नत महाराष्ट्र अभियानामध्ये सहभागी संस्था, शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्याकडून उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, जिल्हा परिषद यांनी करून घ्यावी व उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पूर्तता करावी. त्रयस्थ यंत्रणाद्वारे करावयाच्या कामाच्या तपासणीसाठी, त्या कामाच्या प्रत्यक्ष किंमतीच्या रकमेच्या ०.५०% एवढी रक्कम तपासणी शुल्क म्हणून अनुज्ञेय राहिल. याकरिता आवश्यक तरतूद अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी.

**x)** प्रकल्पातंर्गत झालेल्या कामाची आणि खर्चाची नोंद, जिल्ह्याच्या सनियंत्रण व मूल्यमापन तज्ज्ञ (Monitoring & Evaluation Specialist) यांच्या सहाय्याने करावे. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाची माहिती, आर्थिक व भौतिक प्रगती, स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) च्या IMIS ( INTEGRATED MANAGEMENT INFORMATION SYSTEM ) तसेच जलस्वराज्य प्रकल्प अंतर्गत तयार करण्यात आलेल्या Monitoring & Evaluation Software वर नोंदविण्याची जबाबदारी, घनकचरा व सांडपाणी सल्लागार यांची राहील. याअनुषंगाने, घनकचरा व सांडपाणी सल्लागार यांना प्रकल्पासंदर्भात आवश्यक माहिती (DATA) उपलब्ध करून देण्याची जबाबदारी, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, जिल्हा परिषद यांची राहील.

**xi)** प्रकल्प कामांच्या उपांगांचा जमा खर्च व त्यानुसार उपयोगिता प्रमाणपत्र (Utilisation Certificate) लेखाधिकारी, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांचेकडे सादर करण्याची जबाबदारी जिल्हा पाणी व स्वछता समिती अंतर्गत लेखाधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

**xii)** संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या माहे जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांतील निर्देशानुसार, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत सार्वजनिक स्तरावर गावासाठी कार्यान्वित करण्यात आलेल्या, विविध उपांगाचे जिल्ह्याच्या सनियंत्रण व मुल्यमापन तथा माहिती व्यवस्थापन प्रणाली तज्ञ यांनी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ( पाणी व स्वच्छता ) जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने, SBM PHASE II मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे GEO-TAGGING करावे. GEO--TAGGING केल्यानंतरच या प्रकल्पाकरिता अनुज्ञेय असलेल्या निधीपैकी शिल्लक असलेल्या निधीचे भूगतान करण्यात यावे. या प्रक्रियेत स्वच्छाग्रहींना आवश्यक प्रशिक्षण देवून, सहभागी करण्यात यावे.

**xiii)** प्रकल्प पूर्ण झाल्यावर, उपांगनिहाय सविस्तर माहितीदर्शक फलक गावाच्या दर्शनी भागात तसेच प्रकल्प पूर्ण केलेल्या ठिकाणी लावावेत. सदर फलकांचे SBM PHASE II मोबाईल ॲप्लिकेशन द्वारे GEO TAGGING करण्यात यावे.

**xiv)** प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कामांची अदायगी करण्यासाठीची देयके, संबधित उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उप विभाग, जिल्हा परिषद यांनी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती

यांच्याकडे सादर करावीत. त्यानुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांनी संबधित ग्रामपंचायतीस निधी वितरित करावा.

xv) प्रकल्पाची कामे समाधानकारक पुर्ण झाल्याबाबत, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, उप विभाग, जिल्हा परिषद यांनी, प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी, प्रकल्प संबधित ग्रामपंचायतीस हस्तातंरीत करण्याबाबतचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत. हस्तांतरीत प्रकल्पांची देखभाल दुरुस्ती व चालवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीची राहील.

**५.२ जिल्हास्तरिय उपांगाकरीता (प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन[फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधन)**

i) येथे उपरोक्त परिच्छेद- ५.१ (I) येथील संबंधित तरतूदी लागू राहतील.

**ii) जिल्ह्यातील कचऱ्याची उपलब्धता, गौशाळा तथा शेती उत्पादनातील व अन्य प्रक्रियायोग्य कचरा लक्षात घेवून, प्लास्टीक वेस्ट साठी (तालूका स्तरीय प्लांट) व गोबरधन तथा फिकलस्लज मॅनंजमेन्ट साठी (जिल्हा स्तरिय प्रक्रिया प्लाटची) उभारणी, केन्द्र शासनाचे मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्तावित करून, त्याची अमलबजावणी करावी.** स्वच्छ भारत मिशन (ग्रा.) टप्पा-२ अंतर्गत अनुज्ञेय अनुदाना पेक्षा कमी रक्कमेची कामे, जिल्ह्यामध्ये स्वच्छ भारत मिशन (ग्रा) अंतर्गत पुर्ण केली असल्यास, फरकाच्या रक्कमेसाठी कामे प्रस्तावित करता येईल.

iii) a) उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग (मुख्यालय) जिल्हा परिषद, यांच्या तांत्रिक सल्ल्यानुसार, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी **मैला व्यवस्थापन** [Fecal Sludge Management] **व गोबरधन अंमलबजावणीसाठी जिल्हास्तरीय प्लांट प्रस्तावित करुन, त्याची अंमलबजावणी केन्द्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार करावी.** उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग (मुख्यालय) जिल्हा परिषद, यांनी कृतीसंगम (Convergence) निहाय निधीची विगतवारी नमूद करून, सविस्तर अंदाजपत्रके तयार करावीत.

iii) b) उप अभियंता, **प्लास्टिक** वेस्ट मॅनेजमेंट करीता तालुक्यास्तरीय एकत्रिकरण व साठवण व्यवस्था करुन,अनुषंगिक मनुष्यबळ (तालुकास्तरीय) नमुद करुन एकत्रित **प्लास्टिक** कचरा केंद्र सरकारच्या संदर्भ-अधिक सुचनांनुसार पुर्नचक्रण, पुर्नवापर अथवा नष्ट करण्यादुष्टीने केंद्र सरकारच्या संदर्भिय सुचनांनुसार पुर्नचक्रण, पुर्नवापर अथवा नष्ट करण्यादुष्टीने प्रक्रिया/योजना प्रस्तावित करावी.

iv) अंदाजपत्रक व आराखडयास जिल्हा पाणी व स्वच्छता समितीची मान्यता घेवून, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, पंचायत समिती यांनी सदर प्रस्ताव तांत्रिक मान्यतेसाठी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यांना सादर करावेत. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, यांनी प्रस्तावास तांत्रिक मान्यता देऊन, प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी,

उप मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, यांना सादर करावेत. उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्हा स्तरावर प्राप्त झालेल्या प्रस्तावांची छाननी करून, पात्र प्रस्ताव प्रशासकीय मान्यतेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावेत. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी तपासणीअंती प्रस्तावास प्रशासकीय मान्यता देण्याची कार्यवाही करावी. प्रशासकीय मान्यताप्राप्त ग्रामपंचायतीचे नाव, ग्रामपंचायतीमधील लोकसंख्या, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी अंदाजित खर्च, अतिरिक्त इतर स्त्रोताद्वारे उपलब्ध निधी, प्रकल्पांतर्गत करावयाच्या कामांचे थोडक्यात विवरण यासह, निधी मागणी नोंदविण्यासाठी एकत्रित प्रस्ताव, लेखाधिकारी,राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांच्याकडे सादर करावेत. लेखाधिकारी,राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांनी सदरहू प्रस्तावांची छाननी करून, त्यांच्या अभिप्रायासह, प्रस्ताव पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे सादर करावा. जिल्हा परिषदांकडे स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत निधी शिल्लक असला तरी, उपरोक्तनुसार प्रस्ताव शासनास सादर करणे आवश्यक आहे. शासनास प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, निधीची उपलब्धतता विचारात घेवून, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना थेट शासन स्तरावरून निधी वितरित करण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी मंजूर केलेले प्रकल्प, विहित कालावधीमध्ये कार्यान्वित होतील, याद्दष्टीने प्रकल्पांचा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी वेळोवेळी आढावा घेवून, सनियंत्रण करावे. तसेच, प्रकल्पांच्या प्रगतीचा अहवाल, पाणी पुरवठा व स्वच्छता विभागास सादर करावा.

उपरोक्तनुसार शासनाकडून मान्यता प्रदान केल्यानंतर, जिल्हा परिषद लेखा संहितेमधील विहित कार्यपद्धती अवलंबून, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग (मुख्यालय) जिल्हा परिषद, यांनी निविदा प्रपत्र तयार करून, त्यास जिल्हा पाणी व स्वच्छता समितीची घेऊन मान्यता प्रदान करून, प्रकल्पाची कामे विहित कालमर्यादेमध्ये पूर्णत्वास न्यावीत व प्रगतीपथावरील कामांच्या गुणवत्तेच्या अनुषंगाने, कामांची मोजमाप पुस्तिकेमध्ये (MEASUREMENT BOOK) नोंद करावी. प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश निर्गमित केल्यानंतर, प्रकल्प वित्तीय वर्षात पूर्ण करण्याची जबाबदारी, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग (मुख्यालय) जिल्हा परिषद यांची राहील. कोणत्याही परिस्थितीत कामाचे तुकडे न पाडता अंदाजपत्रकिय किंमतीच्या अनुषंगाने स्वभामि-२ व कृतिसंगमाच्या तरतुदींच्या अनुज्ञेयतेची, निधी उपलब्धतेची खातरजमा करावी व त्यानंतरच प्रस्तावानां मान्यता प्रदान करावी जेणेकरुन निधी उपलब्धते अभावी प्रस्तावित कामे अपूर्ण राहणार नाहीत.

v) प्रत्यक्षात करण्यात आलेल्या कामांची अदायगी करण्यासाठीची देयके, संबंधित उप अभियंता, ग्रामीण पुरवठा उप विभाग, (मुख्यालय) उप विभाग, जिल्हा परिषद, यांनी कार्यकारी अभियंता, ग्रामीण पुरवठा विभाग जिल्हा परिषद यांच्याकडे सादर करावीत. त्यानुसार कार्यकारी अभियंता, ग्रामीण पुरवठा विभाग, जिल्हा परिषद यांनी संबधित यंत्रणाना निधी अदायगी करावी.

vi) प्रकल्पाची कामे समाधानकारक पुर्ण झाल्याबाबत, उप अभियंता, ग्रामीण पुरवठा उप विभाग (मुख्यालय), जिल्हा परिषद, यांनी प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांच्या मान्यतेने करावी.

vii) उपरोक्त क्रमांक ५.१.v ते ५.१.xiii येथे नमूद केलेले मुद्दे, जिल्हा स्तरिय कार्यपद्धतीकरिता लागू राहतील.

## ६.१ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन- ठळक वैशिष्ठ्ये:-

i) प्रकल्पांचे परिक्षण, विकास व अंमलबजावणी करण्यासाठी, जिल्हा स्तरावरनिवड झालेल्या व्यावसायिक संस्था/स्वयंसेवी संस्था यांचे सहाय्य घेता येईल. जिल्हा परिषदेने त्यांच्या गरजेनुसार, एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट पद्धतीने जिल्ह्यासाठी व्यावसायिक संस्था/स्वंयसेवी संस्था यांचे एम्पॅनेलमेंट करावे. एम्पॅनेलमेंट व्यावसायिक संस्था/स्वंयसेवी संस्था यांनी सर्वेक्षण करणे, अंदाजपत्रकीय प्रस्ताव तयार करणे, आराखडे तयार करणे, पर्यवेक्षण करणे व तांत्रिक सल्ला/सहाय्य प्रदान करणे याबाबीकरिता, ग्रामस्तरिय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाकरिता तसेच जिल्हा स्तरिय **प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन[फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधन**करिता प्रत्येकी अनुज्ञेय असलेल्या निधीच्या ५% किंवा रूपये १,००,०००/- (रूपये एक लक्ष फक्त) यापैकी जी कमी असेल त्या रकमेच्या मर्यादेपर्यंत,[ तथापि सदरची रक्कम रूपये १,००,०००/- (रूपये एक लक्ष फक्त) पेक्षा जास्त नसावी ] व्यावसायिक संस्था/स्वंयसेवी संस्था यांना शुल्क म्हणून अनुज्ञेय राहिल. (संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद क्रमांक १५.२० नुसार ) उपरोक्त ५% किंवा रूपये १,००,०००/- (रूपये १.०० लक्ष फक्त) यापैकी जे कमी असेल त्या रकमेची तरतूद, प्रकल्पाच्या अंदाजपत्रकामध्ये अंतर्भूत करावी. सदर रक्कम अंदाजपत्रकामध्ये समाविष्ठ नसल्यास, रक्कम अनुज्ञेय असणार नाही.

घनकचरा, सांडपाणी, प्लास्टीक, गोबरधन व मल व्यवस्थापन याकरीता वापरावयाची तंत्रज्ञाने याबाबत विवेचन व करावयाची कामे या संदर्भातील उल्लेख, संदर्भ क्रं १ येथील मार्गदर्शक सूचनामध्ये करण्यात आला आहे, त्याचे तंतोतंत पालन करावे.

ii) जिल्हा स्तरावरील जिल्हा पाणी व स्वच्छता कक्षाने, उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली, जिल्हा वार्षिक कृती आराखडयातील (District AAP-Annual Action Plan) बाबी लक्षात घेवून, क्षमता बांधणी आराखडा तयार करावा. क्षमता बांधणी आराखडयाची जिल्हा स्तरावर

अंमलबजावणी करण्याची तसेच प्रशिक्षण देण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेमधील मनुष्यबळविकास सल्लागार, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन सल्लागार यांची राहील. यासर्व बाबींचे सनियंत्रण करण्याची व राज्यस्तरीय प्रशिक्षण देण्याची जबाबदारी, प्रकल्प संचालक (स्वच्छ भारत मिशन) राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांची राहील. सदरचे प्रशिक्षण, ग्रामीण पाणी पुरवठा कक्षाचे,उप अभियंता/शाखा अभियंता/ कनिष्ठ अभियंता, विस्तार अधिकारी (पंचायत), सरपंच/उपसरपंच/ ग्रामसेवक/ग्रामपंचायत सदस्य/ग्रामस्तरीय पाणी पुरवठा व स्वच्छता समितीचे सदस्य/ ग्रामपंचायतीचे पाणी पुरवठा कर्मचारी/ सफाई कर्मचारी, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत, कार्यरत असणारे सर्व सल्लागार तसेच स्वच्छाग्रही/जलसुरक्षक यांना देण्यात यावे. याकरिता येणारा खर्च, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत मनुष्यबळ विकास संसाधन (HRD-HUMAN RESOURCE DEVELOPMENT) या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या निधीमधून करण्यात यावा. (संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचनांमधील परिच्छेद क्रमांक १५.१).

III) प्रशिक्षणामध्ये, ग्रामपंचायतीमधील शाश्वत स्वच्छता आराखडा व लोकसहभागीय पध्दतीने कृती आराखडा तयार करणे, नवीन कुटुंबाला शौचालये उपलब्ध राहतील या अनुषंगाने करावयाची कार्यवाही, सामायिक शौचालय, शौचालयाची देखभाल दुरुस्ती घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन, संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियान, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पांतर्गत जबाबदाऱ्या व कर्तव्ये, प्रकल्पाची प्रभावी अंमलबजावणी, प्रकल्पासंबंधी तांत्रिक बाबींचे मार्गदर्शन, प्रकल्पाची शाश्वत देखभाल व दुरुस्ती, या मुद्यांचा समावेश असावा.

IV) या प्रकल्पाच्या अनुषंगाने जनजागृती करावयाच्या माहिती व प्रचार प्रसिद्धी कार्यक्रमामध्ये संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचनांमधील नमूद मुद्यांचा अंतर्भाव असावा. यासर्व बाबींचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर यांची राहील. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाच्या जनजागृती, प्रचार व प्रसिद्धी साठी येणारा खर्च स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत माहिती, शिक्षण व संवाद (Information Education & Communication) या लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या निधीमधून करावा. (संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांमधील परिच्छेद क्र. ९.१)

**६.२ प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन[फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधनः-**

प्लास्टीक, गोबरधन व मल व्यवस्थापन याकरीता वापरावयाची तंत्रज्ञाने याबाबत विवेचन व करावयाची कामे या संदर्भातील उल्लेख, संदर्भ क्रं १ येथील मार्गदर्शक सुचनांमध्ये करण्यात आला आहे. त्याचे तंतोतंत पालन करावे.

जिल्हयासाठी जिल्ह्याच्या भौगोलिक परिस्थीतीनुरूप घनकचरा, सांडपाणी, **प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट, मैला व्यवस्थापन [फिकल स्लज मॅनेजमेन्ट] व गोबरधनसाठी** वापरावयाच्या विविध

तंत्रज्ञाना बाबत, केन्द्र शासनाने मार्गदर्शक सुचनानुसार दिलेल्या सुचनेनुसार, जिल्हयास किफायतशीर तथा दैनंदिन देखभालीस किमान खर्चाचे विविध तंत्रज्ञानांचा वापरण्यास मुभा असेल.

**७. अंदाजपत्रक आराखडा** :-

**७.१ घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन** :-

**अ)** सध्या अस्तित्वात असलेल्या घरगुती, वैयक्तिक अथवा सार्वजनिक अशा सर्व स्तरावरील उपाययोजना, प्रकल्प व्यवस्थापनासाठी, तंत्रज्ञान किमान खर्चाचे व दैनंदिन देखभाल दृष्टीने किमान खर्चिक असणारी तंत्रज्ञाने यांचा समावेश करताना, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, जिल्हा परिषद यांनी संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचना विचारात घेण्यात याव्यात. आराखडयामध्ये तंत्रज्ञाने प्रस्तावित करण्याकरिता, ग्रामपंचायतीचा शाश्वत स्वच्छता आराखडा, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केलेली तंत्रज्ञाने, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग आणि युनिसेफ, मुंबई यांनी वितरीत केलेल्या **"लोकाधारीत घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन कार्यक्रमासाठी सहभागी नियोजन पुस्तिका" तसेच** केंद्र शासनाच्या https://jalshakti.ddws.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या SLWM Handbook/ Fecal Sludge Management/Grey Water Management/Black Water Management व इतर अनुषंगिक पुस्तके/ मार्गदर्शक सुचना, तसेच, https://water.maharashtra.gov.in **व** www.wsso.in या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या डॉ. सु. वि. मापूस्कर यांचेद्वारा प्रकाशित घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन संदर्भातील पुस्तिकेचा आधार घेण्यात यावा.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा २ मध्ये कुटुंबस्तरावरील उपाययोजना अनुज्ञेय नसल्या तरी, सदर उपाययोजना इतर कृतीसंगमातून (Convergence) घ्यावयाच्या असल्याने, त्यासाठी लागणा-या इतर स्त्रोतामधील उपलब्ध असलेल्या निधीची माहिती, अंदाजपत्रक आराखड्यामध्ये नमूद करावी.

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत घनकचरा वाहतुकीसाठी, मोटार वाहनाच्या (Motorised Vehicle) खरेदीबाबत अनुज्ञेयता नसल्याने, याबाबीचा समावेश अंदाजपत्रकामध्ये करण्यात येवू नये. मात्र तीन चाकी सायकलरिक्षा ( TriCycle Rickshaw) वा बॅटरीवर चालणारी तीन चाकी सायकलरिक्षा (Batter Operated TriCycle Rickshaw) शासनाने निर्धारित केलेले खरेदी निकष पाळून व विहित पद्धती अनुसरून खरेदी करता येईल. याप्रमाणे स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण ) मधून सर्वसाधारणपणे २५०० लोकसंख्येकरिता एक तीन चाकी सायकलरिक्षा ( Cycle Rickshaw) व

जास्तीत जास्त दोन तीन चाकी सायकलरिक्षा ( Cycle Rickshaw) गावासाठी खरेदी करता येतील. सदर तीन चाकी सायकलरिक्षा ( Cycle Rickshaw) चालविण्यासाठी चालकाची व्यवस्था ग्रामपंचायतीने स्वनिधीमधून करावी. गावाच्या लोकसंख्येच्या व्याप्तीकरिता उपांगनिहाय आवश्यक असेलेल्या बाबी अंदाजपत्रकामध्ये समाविष्ट कराव्यात. अंदाजपत्रके प्रचलित जिल्हा दरसूची (DSR-District Schedule Rate) नुसार तयार करावीत.

**ब)** संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचनांमध्ये विहित केलेल्या आर्थिक मर्यादेत, केंद्र शासन व राज्य शासनाच्या प्रमाणशीर हिस्स्यानुसार,पात्र ग्रामपंचायतीतील गावांकरिता निधी वितरण केले जाणार आहे. आर्थिक स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ मधील उपलब्ध मर्यादेपेक्षा जास्त असणा-या प्रकल्पासाठी, अतिरिक्त निधीची पूर्तता संबंधित ग्रामपंचायतीने वित्त आयोग किंवा CSR (Corporate Social Responsibility),नरेगा, खासदार स्थानिक विकास निधी ( MPLAD), आमदार स्थानिक विकास निधी (MLALAD), देणगी निधी (Donor Funding), इतर मंत्रालय व विभागांचे कार्यक्रम निधी ( Funding from programs of other Ministries and departments) इत्यादीद्वारे उपलब्ध असलेल्या निधीमधून करावी. ग्रामपंचायतीने उपलब्ध करून दिलेला, अन्य निधीचा- **कृतीसंगम (Convergence)** सविस्तर उल्लेख प्रस्तावात करावा.

**क)** ग्रामपंचायतीत करावयाच्या या कामांच्या नियोजनाच्या दृष्टीने घ्यावयाची माहिती, स्वच्छते अनुषंगिक बाबी निकष याबाबत माहिती एकत्रित करुन त्या अनुषंगाने आराखडे व अंदाज तयार करणे आवश्यक आहे. याकरिता काही ग्रामपंचायतींतून केलेल्या अभ्यासावर आधारित नमुना सूचकपत्र (TEMPLATE) www.wsso.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली आहेत. ग्रामस्तरीय घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनासाठी गावाच्या आवश्यकतेनुसार, गावाच्या भौगोलिक स्थितीनुसार व वेळोवेळी निर्गमित केलेल्या सुचनांच्या आधारे प्रारुप आराखडे (TYPE ESTIMATE) प्रपत्रात आवश्यक ते बदल करुन, आराखडा तयार करण्याची कार्यवाही करावी.

**७.२ प्लास्टिक वेस्ट मॅनेजमेन्ट ( तालुका स्तरिय), मैला व्यवस्थापन[फिकल स्लज मॅनेजमेन्ट] (जिल्हास्तरीय) व गोबरधन (जिल्हास्तरीय) :-**

जिल्हयात घ्यावयाच्या मैला व्यवस्थापनाच्या कामांचे नियोजन व व्यवस्थापन (जिल्हास्तरावरुन आखणी व नियोजन) या धोरणात्मक बाबी ठरवून तालुक्यांना निर्देश देता येतील. सध्या अस्तित्वात असलेल्या घरगुती, वैयक्तिक अथवा सार्वजनिक अशा सर्वस्तरावरील उपाययोजना, प्रकल्प व्यवस्थापनासाठी, तंत्रज्ञान किमान खर्चाचे व दैनंदिन देखभाल दृष्टीने किमान खर्चिक असणारी तंत्रज्ञाने यांचा समावेश करताना, उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, (उपविभाग) जिल्हा परिषद, यांनी संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचना विचारात घेण्यात याव्यात. आराखडयामध्ये तंत्रज्ञाने

प्रस्तावित करण्याकरिता, ग्रामपंचायतीचा शाश्वत स्वच्छता आराखडा, संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सुचनांमध्ये नमूद केलेली तंत्रज्ञाने घेण्यात यावी. अंदाजपत्रके प्रचलित जिल्हा दरसूची (DSR-District Schedule Rate) नुसार तयार करावीत. तसेच, उपरोक्त क्रमांक ७.१.ब येथे नमूद केलेली बाब येथे लागू राहिल

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०१०२७१७३११४८२२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

ABHAY ARVIND MAHAJAN

Digitally signed by ABHAY ARVIND MAHAJAN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=eea0cc78a4d6d0ac39354115f199293c0261ec37d188efb98aa1199092718fe1, postalCode=400032, street=MANTRALAYA,MUMBAI, serialNumber=55d314deedea5617272cbbbb9c7dc86d2871239af7aa362273942a413ce2a7d0, ou=WATER SUPPLY AND SAINITATION, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=ABHAY ARVIND MAHAJAN
Date: 2020.10.29 12:09:42 +05'30'

**(अभय महाजन)**
**सहसचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत**,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.
५. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.
९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी
१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
११.सहसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,मंत्रालय, मुंबई
१२.संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.
१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१४.उपायुक्त (विकास), सर्व.

१५. संचालक, निरी/संचालक, मीत्रा -नाशिक /संचालक,नीरी-नागपूर/संचालक,उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय

१६.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७.उप अभियंता, ग्रामिण पाणी पुरवठा उप विभाग सर्व.

१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१९.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचा शासन निर्णय, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेलद्वारेही पाठवावा.

२०.निवडनस्ती,पापु-१६.

**प्रपत्र अ**

**अर्जाचा नमुना**

क्रमांक ---------------
गावाचे नांव/ ग्रामपंचायत -
पंचायत समिती ----,
जिल्हा परिषद ---------
दिनांक --------------

प्रति,
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती-----------

**विषय :-** घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत निधी मंजूर करण्याबाबत.

-------------- या गावासाठी, घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पासाठी,स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण)टप्पा-२ अंतर्गत प्रकल्पास मान्यता व निधी उपलब्धतेसाठी अर्ज करण्यात येत आहे.

२. प्रकल्पास मान्यता व निधी उपलब्धतेसाठी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्रमांक:- स्वभामि-२०२०/प्र.क्र. /पापु-१६, दिनांक __ __ २०२० सोबतच्या परिशिष्ट “ब” मध्ये निर्देशित केल्यानुसार, खालील बाबी प्रमाणित करण्यात येत आहेत:-

i)केंद्र शासनाच्या जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचनांनुसार सदर ग्रामपंचायत हागणदारीमुक्त म्हणून घोषित झालेली आहे व सदर प्रकल्प राबविण्यासाठी या--- गावाचा वार्षिक अंमलबजावणी आराखड्यामध्ये (AIP) समावेश करण्यात आला आहे.

ii)हे - - - - - - गाव नदी वा जलाशयाच्या काठावरील आहे/नाही.

iii)प्रकल्प राबविण्यासाठी आराखड्यामध्ये नमूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीकडे स्वत:च्या मालकीची वा शासकीय जागा उपलब्ध आहे.

iv) केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, प्रकल्पाची दैनंदिन देखभाल व दुरूस्ती शाश्वतपणे करण्यात येईल व योजनेच्या देखभाल व दुरूस्तीसह अनुषंगिक खर्च, संबधित ग्रामपंचायतीने स्वनिधीमधून करण्यात येईल, याबाबतच्या ठरावासह हमीपत्र सोबत जोडले आहे.

v) - - - - - ग्रामपंचायतीने शाश्वत स्वच्छता आराखडा तयार करून, गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना सादर केला आहे व आराखड्यामधील (Sustainable Sanitation Plan) बाबींची पूर्तता होईल, याबाबतचे हमीपत्र सोबत जोडले आहे.

vi) या- - - - - - गावामध्ये, मागील ५ वर्षामध्ये, निर्मल भारत अभियान वा स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) या योजनांमधून, स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण ) टप्पा-२ अंतंर्गत अनुज्ञेय अनुदानाच्या मर्यादेपर्यंत प्रकल्प राबविण्यात आलेला नाही.

* कृतिसंगमाचा निधी उपलब्ध होईल याची खतरजमा सरपंच ग्रामसेवक व गटविकास अधिकारी यांनी करावी.

**स्वाक्षरी सरपंच ग्राम पंचायत** | **स्वाक्षरी ग्रामसेवक**

उपरोक्त बाबींची ग्रामपंचायत अभिलेखानुसार तपासणी केली आहे.

**विस्तार अधिकारी**
**पंचायत समिती ,-----**

**गट विकास अधिकारी**
**पंचायत समिती,-------**

## प्रपत्र -ब

## घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन

ग्रामस्तरीय बाबींसाठी स्वभामी (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत अनुज्ञेय अनुदानाचे वित्तीय सहाय्य परिगणना तक्ता कोष्टक

| अ.क्रं. | तपशिल | लोकसंख्या मर्यादेनुसार निश्चीत केलेले अनुदान दर | केन्द्र शासन मार्गदर्शक सूचना नूसार अनुज्ञेयता (जणगणना २०२१ लोकसंख्या x दर ÷१०००००) लक्ष * | कामाचा मंजूरी पोटी हिस्सा (मनरेगा वा इतर कृतीसंगमातून) रु. लक्ष | उर्वरित अनुज्ञेयता स्वभामि ७०% व १५ वे वित्त आयोग ३०% (स्तंभ क्र. ४ - स्तंभ क्र.५) रु. लक्ष | स्वभामि केन्द्र हिस्सा ६०% (स्तंभ क्र. ६ x ०.७० x ०.६०) रु. लक्ष | स्वभामि राज्य हिस्सा ४०% (स्तंभ क्र. ६ x ०.७०x ०.४०) रु. लक्ष | १५ वे वित्त आयोग हिस्सा ३०% (स्तंभ क्र.६ x०.३०) रु. लक्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | घनकचरा व्यवस्थापन | गावाची लोकसंख्या ५००० पर्यंत रु. ६०.०० प्रति व्यक्ती | | | | | | |
| | घनकचरा व्यवस्थापन | गावाची लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त रु. ४५.०० प्रति व्यक्ती | | | | | | |
| २ | ग्रे वॅाटर मॅनेजमेन्ट | गावाची लोकसंख्या ५००० पर्यंत रु. २८०.०० प्रति व्यक्ती | | | | | | |
| | ग्रे वॅाटर मॅनेजमेन्ट | गावाची लोकसंख्या ५००० पेक्षा जास्त रु. ६६०.०० प्रति व्यक्ती | | | | | | |

टिपः- वरील अ.क्र. १ व २ करिता स्वच्छ भारत अभियान (ग्रा)-टप्पा-२ अंतर्गत अनुज्ञेय अनुदानातुन कामासाठी लागणाऱ्या मंजुरीची रक्कम ( मंजुरी भाग मनरेगा वा इतर स्रोतातून) वजा केल्यानंतर, १५ व्या वित्त आयोगातून ३०% तरतुद भागवावयाची आहे. उर्वरित ७०% रक्कम केन्द्र व राज्य हिस्स्यात ६०:४० प्रमाणात लागू राहील.२०२१ च्या लोकसंख्या आधारे जर एखादया गावासाठी, अ.क्रं. १ व २ मिळून अनूदान अनुज्ञेयता रु. १.०० लक्षापेक्षा कमी असल्यास, त्या गावासाठी अ.क्रं.१ व २ मिळुन किमान अनुज्ञेयता रु. १.०० लक्ष एवढी राहील. केन्द्र शासनाचे पत्र क्रं S-११०१५/१/२०२०-SBM-DDWS, दिनांक २८ मे, २०२० अन्वये दिलेल्या निर्देशानुसार, गावासाठी परिगणना केलेली प्रकल्पीत लोकसंख्या गृहित धरावी.

*किमान अनुज्ञेयता घनकचरा व्यवस्थापन रूपये ०.५० लक्ष, सांडपाणी व्यवस्थापन ( ग्रे वॅाटर मॅनेजमेन्ट ) रूपये०.५० लक्ष, दोन्ही मिळून एकूण रु. १.०० लक्ष

**प्रपत्र क**

**घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन**

**जिल्हास्तरिय बाबींसाठी स्वभामि (ग्रामीण) टप्पा-IIअंतर्गत वित्तीय सहाय्य अनुज्ञेयता परिगणना तक्ता कोष्टक**

| अ. **क्र .** | वित्तीय सहाय्य अनुज्ञेयता | केन्द्र शासन मार्गदर्शक सूचना नूसार अनुज्ञेयता रु. लक्ष | स्वभामि केन्द्र हिस्सा ६०% (स्तंभ क्रं ४ x ०.६०) रु. लक्ष | स्वभामि राज्य हिस्सा ४०% (स्तंभ क्रं ४ x ०.४०) रु. लक्ष |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | प्लास्टीक कचरा व्यवस्थापन रु. १६.०० लक्ष प्रति तालूका (तालूकास्तरिय) | तालूका संख्या x १६,००,००० ÷ १,००,००० | | |
| २ | मल व्यवस्थापन रु. २३०.०० प्रति व्यक्ती सिंगल पिट शौचखड्डा (ट्विन पिट मध्ये) रेट्रोफिटींग शक्य नसलेल्या लोकसंख्येसाठी. (**जिल्हा स्तरिय**) | जिल्हास्तरीय सिंगल पिट शौचखड्डा (ट्विन पिट मध्ये)रेट्रोफिटींग शक्य नसलेल्यांची लोकसंख्या x २३० ÷१,००,००० | | |
| ३ | गोबरधन प्रकल्प रु. ५०.०० लक्ष प्रति जिल्हा. (**जिल्हा स्तरिय**) | जिल्हा संख्या १ x ५०,००,००० ÷ १,००,००० | | |

**विवरणपत्र ड**

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-II व इतर कृती संगमामधून (Convergence) हाती घ्यावयाच्या उपांगांचा तपशिल

| उपांग | | वित्त स्त्रोत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वभामि निधी (केन्द्र+राज्य) | १५वे वित्त आयोग | मनरेगा | बिझनेस मॉडेल | बेनिफिसीयरी कॉंट्रीब्युशन | ग्राम पंचायत वा इतर निधी |
| घनकचरा व्यवस्थापन | कुटुंबस्तरीय कचरा कुंडया | -- | √ | -- | -- | -- | -- |
| | सार्वजनिकस्तरीय(Public) कचरा कुंडया | -- | √ | -- | -- | -- | -- |
| | कुटुंबस्तरीय कंपोस्ट पिट | -- | √ | -- | -- | -- | √ |
| | सार्वजनिक कंपोस्ट पिट | √ | √ | √ | -- | -- | -- |
| | ट्रायसायकल/ बॅटरी आपरेटेड ट्रायसायकल | √ | √ | √ | -- | -- | -- |
| | प्लास्टीक कचरा ग्रामस्तरीय साठवण युनिट | √ | √ | √ | -- | -- | -- |
| | कचरा वर्गीकरण, साठवण व कंपोस्ट प्रकल्प परिसर | -- | -- | √ | -- | -- | -- |
| | कचरा गोळा करणे / वर्गीकरण करणे मानधन/वेतन | -- | √ | -- | -- | -- | -- |
| | कचरा वर्गीकरणासाठी आवश्यक अवजारे व परिसराच्या स्वच्छतेसाठी आवश्यक अवजारे | -- | √ | -- | -- | -- | -- |
| | घनकचरा व्यवस्थापन दैनेदिन देखभाल व दुरुस्ती | -- | -- | -- | √ | -- | -- |
| | मासिकपाळी व्यवस्थापन (तालुकास्तरीय) | - | √ | -- | -- | -- | -- |

| उपांग | | वित्त स्त्रोत | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वभामि निधी (केन्द्र+राज्य) | १५वे वित्त आयोग | मनरेगा | बिझनेस मॉडेल | बेनिफिसीयरी कॉंट्रीब्युशन | ग्राम पंचायत वा इतर निधी |
| ग्रे वाटर व्यवस्थापन | कुटुंबस्तरीय शोषखड्डा/ मॅजीक पिट/ पाझर खड्डा | -- | -- | -- | -- | -- | √ |
| | सार्वजनिक शोषखड्डा/ मॅजीक पिट/ पाझर खड्डा | √ | √ | √ | -- | -- | -- |
| | ५००० लोकसंख्येकरिताच्या गावांसाठी स्थिरीकरण तळे, डिवॅटस, नाल्या गटारे | -- | √ | -- | -- | -- | √ |
| | ५००० पेक्षा जास्त लोकसंख्येकरीताच्या गावांसाठी क्लोज्ड ड्रेन, स्मॅाल बोअर, सार्वजनिक शोषखड्डे, स्थिरिकरण तळे, कन्स्ट्रक्टेड वेटलँड्स, डिवॅटस, फायटोराईड | √ | √ | √ | -- | -- | -- |
| | एअरेशन ऑफ बीग पॉंड, | -- | -- | -- | √ | -- | -- |
| | नाल्या / गटारे | -- | √ | √ | -- | -- | -- |
| | ग्रे वॅाटर व्यवस्थापन दैनेदिन देखभाल व दुरुस्ती | -- | -- | -- | √ | -- | -- |
| प्लास्टीक कचरा व्यवस्थापन | प्लास्टीक कचरा मटेरियल रिकव्हरी फॅसिलीटी/ प्लास्टीक कचरा व्यवस्थापन (तालुकास्तरीय) | √ | -- | -- | -- | -- | -- |
| | प्लास्टीक कचरा श्रेडींग Shredding मशिन (तालुकास्तरीय) | √ | -- | -- | -- | -- | -- |
| | प्लास्टीक कचरा बेलिंग मशिन ( तालुकास्तरीय) | √ | -- | -- | -- | -- | -- |
| | डस्ट रिमुव्हर मशिन ( तालुकास्तरीय) | √ | -- | -- | -- | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | ग्रामस्तरिय साठवन शेड पासुन तालुका/जिल्हास्तरिय प्लास्टीक कचरा व्यवस्थापन युनिट पर्यंतचे वहन (Transportation) | -- | -- | -- | √ | -- | -- |
| | प्लास्टीक कचरा व्यवस्थापन दैनेदिन देखभाल व दुरुस्ती | -- | -- | -- | √ | -- | -- |
| मल व्यवस्थापन Faecal Sludge Management | ट्विन पिट रिट्रोफिटींग शक्य नसलेल्या लोकसंख्येसाठी (जिल्हास्तरीय)<br>१.डिप रो एनट्रेंचमेन्ट<br>२.अनप्लांटेड ड्रॉईंग बेड<br>३.प्लांटेड ड्रॉईंग बेड<br>४.फिकल स्लज मॅनेजमेंट प्लांट | √ | -- | -- | -- | -- | -- |
| | को ट्रिटमेन्ट नजीकच्या अस्तित्वातील प्रक्रीया प्लांटद्वारा कृतीसंगमातून (Convergence ) | -- | -- | -- | -- | -- | √ |
| | मल व्यवस्थापन दैनंदिन देखभाल व दुरुस्ती | -- | -- | -- | -- | -- | -- |
| गोबरधन | गोबरधन प्रकल्प(जिल्हास्तरीय) | √ | -- | -- | -- | -- | -- |
| | स्केलिंग अप गोबरधन प्रकल्प किमान १० प्रकल्प प्रति तालुका | -- | √ | -- | -- | √ | -- |
| | गोबरधन प्रकल्प दैनंदिन देखभाल व दुरुस्ती | -- | -- | -- | -- | -- | -- |

**स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२**
सार्वजनिक/सामुदायिक शौचालय (CSC)
बांधकामाबाबत मार्गदर्शक सूचना.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः स्वभामि २०२०/प्र.क्र.१९०/पापु १६**
**मंत्रालय, ७ वा मजला, जी.टी. रूग्णालय संकुल,**
**लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई- ४०० ००१.**
**दिनांक: ०२ नोव्हेंबर,२०२०.**

वाचा-

1. **स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२, अनुषंगाने केंद्र शासनाच्या माहे जुलै, २०२० च्या मार्गदर्शक सूचना व त्यासोबतच्या परिशिष्ठ १ चा भाग-२.**
2. **शासन निर्णय क्रमांकः स्वभामि २०१८/प्र.क्र.७०१/पापु १६, दिनांक १२ फेब्रुवारी, २०१९.**

## शासन परिपत्रक

उपरोक्त वाचा क्रमांक २ अन्वये स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) अंतर्गत सार्वजनिक/ सामुदायिक शौचालय (CSC) बांधकामाबाबत सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. राज्याच्या ग्रामीण भागामध्ये शाश्वत स्वच्छता राखण्यासाठी संदर्भाधीन क्रमांक १ अन्वये स्वच्छ भारत अभियान(ग्रामीण) टप्पा-२ ची अंमलबजावणी करण्याच्या सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनांनुसार स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागामध्ये, सार्वजनिक/सामुदायिक शौचालय (CSC) बांधकामाबाबत नवीन निकष व नविन मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक आहे

स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ बाबत केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनेतील क्रमांक ५.३ नुसार १०० पेक्षा जास्त कुटुंबसंख्या असलेल्या **हागणदारीमुक्त अधिक (ODF Plus )** गावामध्ये स्वच्छतेचे उद्दीष्ट पूर्णपणे साध्य होण्यासाठी गावामध्ये विविध कारणांमुळे बाहेरुन ये-जा करणाऱ्या/स्थलांतरीत लोकांसाठी किमान एक सार्वजनिक/सामुदायिक शौचालय असणे आवश्यक आहे. राज्याच्या ग्रामीण भागातील सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामाबाबत पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत. यामध्ये नमूद केलेल्या विविध घटक व उपांगाचा अर्थ, केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील निर्गमित केलेल्या सूचनांप्रमाणे घेण्यात यावा.

**अ) <u>गावाची निवड प्रक्रिया</u> -:**

१) १०० पेक्षा जास्त कुटुंबसंख्या असलेल्या आणि अद्याप सार्वजनिक शौचालय नसलेल्या गावांना प्राधान्य देण्यात यावे.

२) गावामध्ये धार्मिक/नैमित्तिक कामासाठी येणाऱ्या बाहेरगावच्या माणसांचे प्रमाण, स्थलांतराच्या माध्यमातून आलेल्यांचे प्रमाण लक्षात घेवून गावांचा प्राधान्यक्रम ठरवावा.

३) वीज, पाण्याची उपलब्धता, देखभाल व दुरुस्ती हमी इ. यापुढे नमूद केलेल्या सर्व अटींची पूर्तता होणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने ग्रामपंचायतीने ठराव घेणे.

**ब) <u>शौचालय बांधकाम जागा निवडः-</u>**

१) सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामासाठी निवडलेली जागा तांत्रिक दृष्ट्या योग्य असावी. शौचालय बांधकाम दीर्घकाळ वापरण्यास योग्य राहील अशी जागा निवडावी, मैला गाळ व्यवस्थापनाच्या दृष्टीने खड्डयासाठीची जमीन निचरा होण्यासाठी अनुकूल असावी आणि निवडलेली जागा खोलगट भागात नसावी, या तांत्रिक बाबी लक्षात घ्याव्यात.

२) सामुदायिक शौचालयाची जागा, वापर करणाऱ्या समूहासाठी सोयीची आणि सुरक्षित असल्याची खात्री करून घ्यावी.

३) जागा निवडताना बांधावयाच्या प्रस्तावित शौचालयास पाणी, वीज अशा अनुषंगिक सुविधा उपलब्ध करण्यासाठी अडचण येणार नाही याचीही काळजी घ्यावी.

४) जागा निवड करताना प्रामुख्याने अनुसुचित जाती/ अनुसुचित जमाती लोकसंख्या असलेल्या, आर्थिकदृष्टया दुर्बल लोक असणाऱ्या तसेच स्थलांतरीत मजूर लोकसंख्या असणा-या वसाहतीजवळ व उपयोगाची ठरेल अशा जागांची सामुदायिक शौचालयांच्या बांधकामासाठी निवड करावी.

५) उपरोक्त बाबी लक्षात घेवून ग्रामसभेच्या परवानगीने जागा निश्चित करण्यात यावी.

**क) <u>प्रस्तावाचे सादरीकरण आणि मान्यता प्रक्रियाः-</u>** संबंधित ग्रामपंचायतीने गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे, गावासाठी सामुदायिक शौचालयाची मागणी करणारा आणि निधीसह इतर सर्व तरतुदी/अटी मान्य असल्याचा ग्रामपंचायतीचा ठराव, यापूर्वी संबंधित गावात सार्वजनिक शौचालय बांधले नसल्याचे प्रमाणपत्र, गावातील वैयक्तिक शौचालय नसणाऱ्या कुटुंबांचा, वृध्द, महिला आणि लहान मुलांसह तपशील आणि आठवडी बाजार, धार्मिक उपक्रम ई. नैमित्तिक कामासाठी येणाऱ्या, स्थलांतरित होवून आलेल्या बाहेरगावच्या माणसांचे प्रमाण, यासह विहित नमुन्यात प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. तसेच विवरणपत्र १ व २ नुसार माहिती प्रस्तावासोबत सादर करण्यात यावी.

सदर प्रस्तावाच्या आधारे उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उप विभाग, जिल्हा परिषद यांनी संकुलाच्या बांधकामात केंद्र शासनाचे पत्र दिनांक १ जून, २०२० व दिनांक १५ जून, २०२० मधील सूचनांचा आधार घेऊन संकुल बांधकामासाठी सविस्तर अंदाजपत्रक तयार करावे. (विवरणपत्र-४) संकुलाच्या जागेच्या भुस्तराचा व गावाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करून, जिल्ह्याच्या दरसूचीच्या आधारे सोबतच्या विवरणपत्र १ व २ नुसार माहितीसह सदर संकुलाचे अंदाजपत्रक तयार करुन त्यास तांत्रिक मान्यता प्रदान करावी. केंद्र शासनाच्या संदर्भाधीन क्रमांक १ येथील मार्गदर्शक सूचनामध्ये नमूद केल्यानुसार संकुलासाठी अनुज्ञेय केलेल्या आर्थिक तरतुदीपेक्षा जास्त रक्कमेची आवश्यकता असल्यास फरकाची रक्कम ग्रामपंचायतीने कृती संगमातून नियोजित करावी.

तांत्रिक मान्यता प्राप्त प्रस्तावास गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान करावी. प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावासाठी जिल्ह्याच्या एकत्रित निधि मागणीचा प्रस्ताव, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूरकडे सादर करावा.

उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा, उपविभाग, जिल्हा परिषद यांनी प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्तावांची निविदा प्रपत्र तयार करून जिल्हा परिषद लेखा संहितेनुसार निविदा प्रक्रिया राबवून संकुल बांधकामासाठी यंत्रणा निश्चित करून कामाची अंमलबजावणी करावी.

**ड) <u>सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम पद्धती:-</u>** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकामास रितसर परवानगी मिळाल्यावर ग्रामपंचायत तालुकास्तरीय तांत्रिक यंत्रणेच्या मदतीने सार्वजनिक/ सामुदायिक शौचालय संकुलाचे बांधकाम करू शकते. तथापि, शाश्वततेच्या पार्श्वभूमीवर तयार होणारे संकुल तांत्रिक दृष्ट्या सुयोग्य असावे, बांधकाम आकर्षक व्हावे आणि जिल्ह्यातील सर्व संकुल एकाच पद्धतीची असावीत यासाठी जिल्हा पाणी व स्वच्छता कक्ष नाविन्यपूर्ण पद्धतींचा अवलंब करू शकेल. जिल्हास्तरावर याकामासाठी इच्छुक संस्था, बांधकाम व्यावसायिक यांना निमंत्रित करून,उपलब्ध पर्यायानुसार अपेक्षित बांधकामाचे दरपत्रक ठरवून, त्यांचे विहित शासकीय कार्यपद्धती पाळून पॅनल तयार करता येईल. पॅनलची यादी सर्व संबंधित ग्रामपंचायतींना पाठवून बांधकामासाठी हा पर्याय उपलब्ध करून देता येईल. या पद्धतीत बांधकाम दर्जा संबंधी सनियंत्रण करणे सुलभ होवू शकेल.

**इ) <u>सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम तांत्रिक पर्याय:-</u>** राज्यातील सार्वजनिक शौचालय बांधकामासाठी ट्वीन लीच पिट (दोन शोषखड्डयाचे शौचालय) हा तांत्रिक पर्याय उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. हा पर्याय कमी खर्चाचा, वापरण्यास सोपा, कमी पाण्याची

गरज असणारा, पर्यावरण अनुकुल आणि मैला गाळ व्यवस्थापनाच्या दृष्टीने अत्यंत सोयीचा आहे. या तांत्रिक पर्यायासंबंधी drawing/टाईप डिझाईन सोबत जोडले आहे. (विवरणपत्र ३) **तसेच संदर्भाधीन क्रमांक १ येथील केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांमधील परिशिष्ट १ भाग-२ मध्ये (मार्गदर्शक सूचनांमधील पृ ७४) नमूद केलेले तांत्रिक पर्यायासंबंधी drawing/टाईप डिझाईन ही विचारात घेण्यात यावे.** त्यानुसार जिल्हा दर सूची प्रमाणे दर व बाबींचे वर्णन आवश्यकतेनुरूप बदलवून, जागेच्या उपलब्धतेनुसार, भौगोलिक स्थितीनुसार व संकुल बांधकामाच्या जागेच्या भूस्तरानुसार तांत्रिकदृष्टया सुरक्षित व योग्य पर्याय निवडून त्यानुसार संकुल बांधकामाचे अंदाजपत्रक तयार करावे.

ज्या ठिकाणी वरील प्रमाणे संकुल बांधकाम करणे भौगोलिक स्थितीमुळे शक्य नसेल अशा ठिकाणी अन्य प्रकारचे तांत्रिक दृष्ट्या योग्य आणि मैला व्यवस्थापन योग्यरीत्या होईल, याचा विचार करुन अशा पद्धतीच्या संकुलाचे बांधकाम मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या मान्यतेने प्रस्तावित करावे.

**ई) सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम निधी तरतूद:-** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय बांधकाम करण्यासाठी एकूण रूपये ३,००,०००/- (रूपये तीन लक्ष ) इतकी निधी मर्यादा देण्यात आली आहे. या निधीपैकी ३०% म्हणजेच रु. ९०,०००/- ( रुपये नव्वद हजार) पंधराव्या वित्त आयोगाच्या माध्यमातून ग्रामपंचायतीला मिळणाऱ्या निधीतून ग्रामपंचायतीने उपलब्ध करून द्यायचे आहेत. उर्वरित रुपये २,१०,०००/- ( रूपये दोन लक्ष दहा हजार) (७०%) स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ च्या माध्यमातून उपलब्ध करून दिले जातील. सार्वजनिक/सामुदायिक शौचालयाची मागणी करण्यापूर्वी संबंधित ग्रामपंचायतीला पंधराव्या वित्त आयोगाच्या मिळणाऱ्या निधीतून स्वत:चा हिस्सा, अर्थात रुपये. ९०,०००/- ( रुपये नव्वद हजार) ची तरतूद करून घ्यावी लागेल. विहित मर्यादेपेक्षा जास्त अंदाजपत्रक असल्यास तसेच स्थानिक ठिकाणी गरजेनुसार सार्वजनिक/सामुदायिक शौचालय परिसरात सुविधा वाढविणे, सुशोभीकरण ई. कामे करायची असल्यास त्यासाठीचा सर्व खर्च ग्रामपंचायतीला स्वत:कडील निधी/ लोकसहभाग/स्थानिक स्त्रोतांमधून करावा लागेल. निधी उपलब्धतेबाबत सविस्तर तपशिल प्रस्तावात नमूद करणे आवश्यक आहे.

**उ) देखभाल व दुरुस्ती धोरण:-** स्वच्छतागृहे पाणी व वीजेसहीत स्वच्छ व वापरण्यायोग्य ठेवण्याच्या दृष्टीने त्यांची देखभाल उत्तमरित्या होणे अपेक्षित आहे. त्याकरिता ग्रामपंचायतींनी गावातील महिला बचत गट अथवा **स्वंयसहाय्यता गटांचे (Community based Orgniasation or SHGS)** सहाय्य घ्यावे. सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाच्या प्रस्तावात संबंधित ग्रामपंचायतीला प्रस्तावित सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाच्या दोन वर्षापर्यंतच्या

देखभाल दुरुस्तीसाठी आवश्यक ती आर्थिक तरतूद उपलब्ध असल्याची हमी द्यावी लागेल. निधी उपलब्धतेसाठी आवश्यकतेनुसार “पे ॲण्ड युज (वापरशुल्क देऊन वापरा) सारख्या पद्धत अनुसरता येईल.

**ऊ) <u>अनुषंगिक सुविधांची उपलब्धता:-</u>** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाच्या परिसरात वापरकर्त्यांची सोय आणि सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचा शाश्वत वापर होण्यासाठी अनुषंगिक व्यवस्था उपलब्ध असणे अत्यंत महत्वाचे आहे. या अनुषंगिक व्यवस्थांचा आराखड्यात समावेश असल्याची खात्री संबंधित ग्रामपंचायतीने करून घ्यायची आहे. अनिवार्य व ऐच्छिक सुविधा खालीलप्रमाणे आहेत. त्या व्यतिरिक्त काही सुविधा आवश्यक वाटल्यास, ग्रामपंचायतीने स्वत:कडील निधीसह इतर संसाधनांचा अंदाज घेवून, या सुविधा उपलब्ध करून घेण्यासंबंधी निर्णय घेण्यात यावा.

<u>अनिवार्य सुविधा</u> :-

- स्वच्छतेसाठी नियमित पाणी पुरवठा आणि पाणी साठवण व्यवस्था.
- कपडे धुण्यासाठी जागा.
- हात धुण्याची सुविधा (वॉश बेसिन).
- दिव्यांग व्यक्तींना/लहान मुलांना/वृध्द व्यक्तींना यांच्याकरीता आवश्यक सुविधा.
- महिलांसाठी सोयीची स्वतंत्र सुविधा.
- वीज जोडणी.
- मैलागाळ व्यवस्थापनसंबधी सुविधा.(भरलेला शौचालय खड्डा रिकामा करण्याची सुविधा )
- शौचालय आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी नियमित व्यवस्था.
- संकुलातील घनकचरा आणि सांडपाणी व्यवस्थापनाची सुविधा.
- संकुल बांधकाम तपशील आणि संकुलातील सुविधांची माहिती देणारा सविस्तर फलक.
- आयईसी पोस्टर्स. (हात धुण्याची पद्धत, शौचालय वापरण्याची पद्धत, स्वच्छतेसाठी लागणारे सामान, त्याच्या वापराची पद्धती इत्यादी.)

<u>ऐच्छिक सुविधा</u> :-

- स्नानघर.
- शौचालय आणि परिसर स्वच्छ ठेवण्यासाठी लागणारे साहित्य आणि उपकरणे.
- पायवाट, सौंदर्यीकरण.

**ए)<u>सुशोभीकरण आणि सुरक्षा:-</u>** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचा शाश्वत वापर होण्यासाठी शौचालय परिसर सुशोभित असणे आणि वापरकर्त्यांच्या दृष्टीने सुरक्षित असणे गरजेचे

आहे. शौचालय परिसरात शोभेची झाडे, सावली देणारी झाडे लावून, भिंतींवर स्वच्छतेसंबंधी चित्र आणि संदेश रेखाटून परिसर सुशोभित करता येईल. वृक्षारोपणाचा खर्च स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ मधून अनुज्ञेय नसून, मनरेगामधून करण्यात यावा.

**ऐ) <u>दस्ताऐवजीकरण:-</u>** सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलासंदर्भात ग्रामपंचायत आणि प्रत्यक्ष संकुलाच्या ठिकाणी पुढीलप्रमाणे दस्ताऐवजीकरण करणे गरजेचे आहे:-

| दस्ताऐवजीकरण स्तर | दस्ताऐवजीकरण तपशील |
|---|---|
| ग्रामपंचायत स्तर | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल प्रस्ताव, मंजुरी पत्र, आराखडा, वापरकर्त्या समूहाचा तपशील, संचालन आणि देखभाल दुरुस्ती संबंधी वार्षिक करार, देखभाल दुरुस्ती आणि उपकरणासंबंधी केलेला खर्च आणि लोकसहभाग संबंधीची माहिती इत्यादी संबंधी तपशील गरजेनुसार संचिका किंवा नोंदवहीत अद्ययावत ठेवणे. |
| संकुल स्तर | शौचालय सुविधेच्या केलेल्या वापराचा व शुल्क आकारले जात असल्यास त्यासंबंधी दैनंदिन नोंदी अभिप्राय पुस्तिका इत्यादी. |

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२०११०२१४३९३३२३२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Chandrakant Krishna More

Digitally signed by Chandrakant Krishna More
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=11ac200219edb36f7777ee1101657bea4271090267228122b638d6f2cdedad62, serialNumber=2314cf333e070f9936792bc95890fa89b2f617a931b2b577b703fa858f3df433, cn=Chandrakant Krishna More
Date: 2020.11.02 17:23:33 +05'30'

**(चं.कृ. मोरे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.

४. विधानसभा व विधानपरिषद सदस्य.

५. मुख्य सचिव,मंत्रालय, मुंबई.

६. अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व,मंत्रालय, मुंबई.

७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.

८. जिल्हा परिषद अध्यक्षा/अध्यक्ष ,सर्व.

९. सर्व विभागीय आयुक्त व जिल्हाधिकारी

१०.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.

११.सहसचिव,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

१२.संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर, नवी मुंबई.

१३.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.

१४.उपायुक्त (विकास), सर्व.

१५. संचालक,मीत्रा नाशिक/ संचालक, नीरी नागपूर/ संचालक, उन्नत महाराष्ट्र अभियान, सर्व शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय.

१६.उप मुख्य कार्यकारी अधिकारी ( पाणी व स्वच्छता/पंचायत), जिल्हा परिषद सर्व, यांनी ह्या शासन निर्णयाच्या छायाप्रती प्रत्येक पंचायत समिती सभापती /उपसभापती व गट विकास अधिकारी यांना द्याव्यात व गट विकास अधिकारी यांनी प्रत्येक पंचायत समिती सदस्य, सरपंच व ग्राम विकास अधिकारी यांना द्याव्यात.

१७.उप अभियंता, ग्रामिण पाणीपुरवठा उप विभाग सर्व.

१८. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व कार्यासने.

१९.संगणक समन्वयक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, यांनी सदरचे शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर व राज्य शासनाच्या संकेतस्थळावर अपलोड करावा तसेच वरील सर्वांना ई-मेल द्वारेही पाठवावा.

२०.निवडनस्ती,पापु-१६.

## विवरणपत्र १

## सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलासाठी ग्रामपंचायत स्तर सांख्यिकीय माहिती

| क्र. | माहितीचा तपशील | संख्या |
|---|---|---|
| ०१ | ग्रामपंचायत क्षेत्रातील एकूण गावे | |
| ०२ | एकूण कुटुंब संख्या | |
| ०३ | वैयक्तिक शौचालय असलेले कुटुंब | |
| ०४ | वैयक्तिक शौचालय नसलेले कुटुंब | |
| ०५ | इतर ठिकाणाहून दररोज नियमितपणे येणाऱ्या व्यक्तींची अंदाजे संख्या | |
| ०६ | बाहेर गावाहून येणाऱ्या लोकांसाठी भेट देण्याची ठिकाणे संख्या ( मंदिर, बाजार, कार्यालये इत्यादी.) | |
| ०७ | धार्मिक/सामाजिक कारणांसाठी बाहेरुन गावात येणाऱ्या लोकांची वार्षिक अंदाजे संख्या | |


## विवरणपत्र २

## सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलासाठी पडताळणी सूची


| क्र. | पडताळा घटक | पर्याय | सध्यस्थिती | शेरा |
|---|---|---|---|---|
| ०१ | हागणदारीमुक्त दर्जा . | आहे/नाही | | |
| ०२ | वैयक्तिक शौचालय नसलेले कुटुंब. | संख्या | | |
| ०३ | यापूर्वी बांधलेले सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल. | संख्या | | |
| ०४ | यापूर्वी बांधलेले सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाचा वापर. | आहे/नाही | | |
| ०५ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी ग्रामसभेचा ठराव | आहे/नाही | | |
| ०६ | १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून ग्रामपंचायत हिस्सा देण्याचा ठराव. | आहे/नाही | | |
| ०७ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल देखभाल दुरस्ती ग्रामपंचायत स्वनिधीतून करेल, याबाबतचा ठराव. | आहे/नाही | | |
| ०८ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी पुरेसे पाणी उपलब्धतेचा ठराव. | हो/नाही | | |
| ०९ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी ग्रामपंचायत कडून वीज जोडणी देणेबाबतचा ठराव. | हो/नाही | | |
| १० | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल शाश्वत स्वरुपात उपलब्ध राहील ग्रामपंचायत हमीपत्र. | आहे/नाही | | |
| ११ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुल चालवायला घेणाऱ्या गटाचे/संस्थेचे पत्र. | आहे/नाही | | |
| १२ | सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलांसाठी ग्रामपंचायतीकडे स्वत:ची जागा. | आहे/नाही | | |
| १३ | संकुलांसाठी ग्रामपंचायतीकडे स्वत:ची जागा नसल्यास पर्याय. | आहे/नाही | | |
| १४ | पर्यायी जागेचे दानपत्र/ बक्षिसपत्र. | आहे/नाही | | |
| १५ | उपलब्ध आणि निर्धारित जागा रिकामी असल्याचे छायाचित्र. | आहे/नाही | | |
| १६ | शौचालय संकुलाची मागणी करणाऱ्या कुटुंबांचे नियमित वापरासंबंधी हमीपत्र. | आहे/नाही | | |
| १७ | सार्वजनिक/सामुदायिक संकुल धार्मिक/सामाजिक संस्था परिसरात प्रस्तावित असल्यास संकुलाचे शाश्वत संचालन व त्याचे दायित्व याबाबत संबंधीत संस्थेचे हमीपत्र. | आहे/नाही | | |

**सार्वजनिक/सामुदायिक शौचालय संकुलाची मागणी करताना संबंधित ग्रामपंचायतीने विहित नमुन्यातील प्रस्ताव आणि पडताळणी सूचित दर्शविल्याप्रमाणे सर्व ग्रामपंचायत ठराव, पत्र, छायाचित्रे सोबत जोडावीत.**


## विवरणपत्र –३





**ELEVATION**




**SECTION AB**




**PLAN**



**SOAK PIT SECTION**

**JOINERY DETAILS:**

| SR NO. | DESCRIPTION | SIZE IN M |
|---|---|---|
| 1. | D | 0.9 X 2.0 |
| 2. | D1 | 0.75 X 1.8 |
| 3. | W | 0.65 X 0.65 |

**NOTES:**

1. ALL DIMENSIONS ARE IN METER.
2. OUTER WALL THICKNESS = 0.23 M.
3. INNER WALL THICKNESS = 0.115 M.
4. ASSUME THE DIMENSIONS WHEREVER REQUIRED.

**FILE NAME:**

COMMUNITY SANITARY COMPLEXES

**PREPARED BY :**

AMOL DHANAWADE Engineering Specialist ZP Thane

## विवरणपत्र ४

स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागामध्ये, सार्वजनिक/ सामुदायिक शौचालय(CSC) बांधकामाच्या अनुषंगाने पत्र दिनांक ०१/०६/२०२० व दिनांक १५/०६/२०२० अन्वये दिलेल्या सूचना.

No.S-18011/7/2018-SBM
Government of India
Ministry of Jal Shakti
Department of Drinking Water and Sanitation
Swachh Bharat Mission (Grameen)

4th Floor, Pt. Deendayal Antyodaya Bhawan
CGO Complex, Lodhi Road
New Delhi – 110003
Dated the 1st June, 2020

To

The Chief Secretaries
All States/UTs

**Subject: Provision of Community Sanitary Complexes (CSC) under SBM(G) – reg.**

Madam/Sir,

Having all the villages self-declared as Open Defecation Free (ODF) as on 2nd October, 2019, this Department has been advising the States/UTs to ensure sustaining the ODF status and that No One is Left Behind under SBM(G). Construction of CSC in villages is an important provision in this direction particularly for the households that do not have enough space for Individual Household Latrine, and for migrant/floating population as well. The location of such CSCs should be selected in such a manner that these toilets are easily accessible to all the households those need to use them and O&M can be ensured.

2. As per the handbook for construction of CSC issued by this Department, the number of seats in a toilet complex is determined by the approximate number of users per day; 40 users per seat is the optimum. Modalities for construction of CSC differ from State to State. However, there may be instances where a large number of households are linked to one CSC,which may lead to a situation that many households would not be able to use such CSCs because of overcrowding and distance from the households.Though the States have flexibility to have appropriate number of toilet seats in a CSC, this Department has suggested for construction of 2x2 toilet seats in a CSC for men and women respectively.

3. Further, during a Video Conferencing with the States to review the programme implementation, some States have requested that appropriate provision may be made in IMIS for entering the details of CSCs constructed and every CSC should be mapped to households being covered by the CSC.

4. In view of the foregoing, it is reiterated that a CSC should ideally consist of 4 toilet seats viz. 2 for men and 2 for women and it should not be linked to more than 35 households. Further, a provision has also been made for mapping of the households to CSCs in IMIS.

5. This may be brought to the notice of all the districts for necessary action and further circulating it to the below level implementing agencies and all the Gram Panchayats.

Yours faithfully,

(Arun Baroka)
Additional Secretary to the Govt. of India
Tele 2436 2192
Email: arun.baroka@nic.in

**Copy to:**
1. Addl. Chief Secretary/Pr. Secretary/Secretary in charge of rural sanitation, All States/UTs
2. Mission Directors/State Coordinators, SBM (G), All States/UTs

Government of India
Ministry of Jal Shakti
Department of Drinking Water and Sanitation
Swachh Bharat Mission (Grameen)

4th Floor, Pt. Deendayal Antyodaya Bhawan
CGO Complex, Lodhi Road
New Delhi – 110003
Dated 15th June, 2020

To

The Chief Secretaries
All States/UTs

**Subject: Operation and Maintenance (O&M) of Community Sanitary Complexes (CSC) under SBM(G) – reg.**

Madam/Sir,

As you are aware, under Swachh Bharat Mission (Grameen) Phase II, this Department has advised States/Union Territories (UTs) to ensure the sustainability of the Open Defecation Free (ODF) status of villages. A key component of SBM(G) Phase II is the construction of Community Sanitary Complexes (CSCs) in villages to cater to the sanitation needs of floating population. Priority is to be given to locations with predominant SC / ST habitations, the poorest of the poor in the village, and the areas/bazaars visited by migrant workers and other sections of the population.

2. You will agree that Operation and Maintenance (O&M) of a CSC is the most important factor towards ensuring its continued usage. As per the recently issued SBM (G) Phase II guidelines, the Operation & Maintenance (O&M) of the CSCs constructed under the programme is to be ensured by the respective GPs. It is recommended that the O&M should include the following provisions (indicative list) to ensure continued usage of the CSC:

- Electricity,running water in toilets/ bathrooms (where applicable) and for hand washing
- Cleaning material viz. brush, toilet cleaning powder/solution, disinfectant, soap, waste bins, etc. for regular cleaning of the CSC
- Engagementof person(s)/ SHG/ agency for day to day maintenance
- Safety of the CSCs: locks, latches, lighting etc.
- Maintenance of structure (minor and major repairs, including the replacement of parts, if needed.
- Regular desludging of drains and tanks connected to the CSC
- CSCs should preferably have twin pit technology. In case septic tank is used for a CSC, adequate arrangements for septage management, should be ensured.

3. Though States/ Districts have the flexibility to decide on the O&M model, one or a suitable mix of the following options may be explored:

a) Contracting: The Gram Panchayat may contract out the entire O&M or specific O&M activities to an SHG/ agency, except forthe electricity & water charges, provision of cleaning material and one-time maintenance/ repair works, which GP may continue to provide.

b) Leasing: The entire facility may be rented out to a private entity(individual/ SHG/ agency) by the Gram Panchayat (owner). The private entity may take care of all aspects of O&M and charge user fees to cover its operational costs. However, the

user fee should be reasonably low to cover the sanitation needs of the rural community and should be fixed in consultation with community members.

c) Community Management: Day to day maintenance by user households on a rotation basis with the support of GP for electricity & water charges, provision of cleaning material and one-time maintenance/ repair works. Either each household can take the responsibility for O&M in turn on a monthly/weekly basis or the O&M cost may be divided among the community members using the facility.

d) Public Private Partnership (PPP): A CLF (Community level federation)/ local industry/ commercial entity/ external agency may be roped in for regular O&M. Such partnerships may also be formalized at Block/ District level to ensure revenue generation and economies of scale.

4. GPs may also consider revenue generation for O&M of CSCs through the following:

- A small shop (or similar commercial use) selling daily household items can be attached to the CSC, if suitable in local context. The shopkeeper may be made responsible for maintenance of the complex and monthly rentals be paid to the GP.
- The outer walls of the sanitary toilet complex can be used for advertisement/ wall writing etc. The income generated can prove to be a good resource for the GPs.

5. It is also recommended that while constructing the CSC, appropriate modification in its design may be made to ensure that there is adequate sunlight and ventilation provision in the complex.

6. This may be brought to the notice of all the districts for necessary action and further circulating it the implementing agencies and all the Gram Panchayats.

Yours faithfully,

(Arun Baroka)
Additional Secretary to the Govt. of India
Tele No. 2436 2192
Email: arun.baroka@nic.in

**Copy to:**

1. Addl. Chief Secretary/Pr. Secretary/Secretary in charge of rural sanitation, All States/UTs
2. Mission Directors/State Coordinators, SBM(G), All States/UTs

**केंद्र शासनाने बंधित केलेल्या पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगाच्या निधीमधुन पाणी पुरवठा व स्वच्छताविषयक योजना राबविण्याविषयी तांत्रिक मार्गदर्शक सूचना**

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः जजीमि/०६२०/प्र.क्र.२०/भाग॥/ पापु-०७**
सातवा मजला, नवीन मंत्रालय, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल,
क्रॅाफर्ड मार्केट जवळ, लोकमान्य टिळक मार्ग, मुंबई
तारीख: १९ नोव्हेंबर,२०२०

वाचा-

१) केंद्र शासनाचे पत्र क्र.११०११/१/२०२०-एसबीएम-डीडीडब्ल्युयुएस दि.१७.०३.२०२०
२) ग्राम विकास विभागाचे पत्र क्र.जीपीडीपी-२०२०/ प्र.क्र.३१/पंरा-६, दि.१९.०५.२०२०
३) केंद्र शासनाचे पत्र क्र .F१५ (४) XV/FCV/२०२०-२५ Dt.१५.०७.२०२०.
४) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र.पंविआ-२०२०/ प्र.क्र.५९/ वित्त-४, दि.२६.०७.२०२०
५) ग्रामविकास विभाग शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/ प्र.क्र.६२/ वित्त-४, दि.२७.०७.२०२०
६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.जजीमि-०६२०/ प्र.क्र.२०/ पापु ०७, दि.३०.०६.२०२०
७) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.जजीमि-०६२०/ प्र.क्र.२०(II)/ पापु ०७, दि. ०३.०८.२०२०
८) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन निर्णय क्र.जजीमि -२०१९/ प्र.क्र.१३८/ पापु १० (०७), दि.०४.०९.२०२०
९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्र.स्वभामि २०२०/ प्र.क्र.११६/ पापु १६, दि.२८.१०.२०२०
१०) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, शासन परिपत्रक क्र.स्वभामि २०२०/प्र.क्र.१९०/पापु १६, दि.०२.११.२०२०
११) मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांचे पत्र क्र. SWSM/WS01/Cr 01/2020, दि.१९.११.२०२०

प्रस्तावना-

केंद्र शासनाने पंधराव्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना देण्यात येणारा निधी ५०% बंधीत स्वरुपात ठेवला असून त्याचा वापर स्वच्छतेच्या व पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी करण्यात

यावा अशा सूचना दिलेल्या आहेत. तसेच केंद्र शासनाच्या दि. १७.०३.२०२० (संदर्भ क्र. १) अन्वये याबाबतच्या मार्गदर्शक सुचना व दि. १५.०७.२०२० (संदर्भ क्र. ३) अन्वये सन २०२०-२१ साठीचा निधी वितरित करण्यात आला आहे.

राज्यात १५ व्या वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतींना वितरीत होणारा निधी हा ग्रामविकास विभागामार्फत वितरीत करण्यात येतो. ग्रामविकास विभागाने दि.१९.०५.२०२० च्या पत्रान्वये ( संदर्भ क्र. २) १५ व्या वित्त आयोगाच्या अनुषंगाने ग्रामविकास आराखडा सुधारीत करण्याबाबत सुचना दिल्या आहेत. यामध्ये बंधीत निधी स्वच्छतेच्या व पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी तसेच जलजीवन मिशनसाठी सुधारित करण्याबाबत सुचना निर्गमित केल्या आहेत. ग्रामविकास विभागाने अनुदान वितरणाबाबत निकष व मार्गदर्शक सुचना विभागाच्या दिनांक २६.०६ २०२० ( संदर्भ क्र. ४) रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे निर्गमित करण्यात आल्या आहेत. तसेच निधी वितरीत करण्याबाबतचा शासन निर्णय दिनांक २७ .०७, २०२० ( संदर्भ क्र. ५) रोजी निर्गमित केला आहे.

तसेच केंद्र शासनाचे फ्लॅगशिप कार्यक्रम (स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) व जल जीवन मिशन ) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडुन मिशन मोडवर राबविण्यात येत आहेत. राज्यात ग्रामीण भागात पेयजल व स्वच्छता विषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत करण्यात येते. या कार्यक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी, १५ व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त निधीच्या वापराबाबत, पुढीलप्रमाणे तांत्रिक मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

**<u>शासन निर्णय-</u>**

**१. पाणी पुरवठा योजना**

१.१. सन २०२०-२१ मध्ये जलजीवन मिशन अंतर्गत सुधारणात्मक नळ जोडणीची कामे प्राधान्याने घ्यावयाची आहेत. १५ व्या वित्त आयोगांतर्गत बंधित निधी हा जल जीवन मिशन अंतर्गत Retrofitting (सुधारणात्मक नळ जोडणी) करीता वापर करता येईल. यासाठी जल जीवन मिशन अंतर्गत, दिनांक ३ .०८.२०२० रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये( संदर्भ क्र. ७) परिच्छेद क्र. अ व ब नमुद सुधारणात्मक पुनर्जोडणीसाठी व कार्यात्मक घरगुती नळ जोडणीच्या (FHTC) कामांसाठी निधी वापरणे अनुज्ञेय असेल.

१.२. सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे जलजीवन मिशन योजनेचा भाग असल्यामुळे आणि योजनेनुसार १०० टक्के घरांना नळ जोडणी द्यावयाची असल्यामुळे ही कामे सार्वजनिक (सामुहीक स्वरूपाची) कामे म्हणुन करण्यात यावी.

१.३. अशा सर्व प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता या ग्राम विकास विभागाने दिलेल्या १५ व्या वित्त आयोगासंदर्भातील नियमाप्रमाणे असतील. तर तांत्रिक मान्यता या दिनांक ३.०८.२०२० रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे असतील. तसेच या योजनांची कामे (निविदा प्रक्रीया ई.) ही ग्राम विकास विभागाने घालुन दिलेल्या प्रक्रीयेनुसार करण्यात यावी. वरील कामे करतांना, ग्रामसभेच्या ठरावानुसार, वित्त आयोगाच्या निधी कमी पडल्यास त्या प्रमाणात जल जीवन मिशनचा निधी जिल्हा स्तरावरून ग्रामपंचायतींना तात्काळ उपलब्ध करण्यात येईल.

१.४. ग्रामपंचायतीस्तरावर ग्रामविकास विभागाने वित्त आयोगाच्या निधीसाठी घालून दिलेल्या सर्व प्रक्रियांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

१.५. या योजनेत १५ व्या वित्त आयोगातून घेण्यात येणाऱ्या कामांसाठी प्रशासकीय मान्यतेचे अधिकार ग्राम विकास विभागाच्या प्रचलित मर्यादेप्रमाणे राहतील. मात्र जल जीवन मिशनच्या निधीमधून कामे घ्यावयाची असतील तर प्रशासकीय मान्यतेचे अधिकार शासन परिपत्रक दि. ०३.०८.२०२० मध्ये नमूद केल्याप्रमाणे रु. १५ लक्ष च्या मर्यादेत राहतील. सदर दोन्ही कामे सध्याच्या ग्रामविकास विभागाच्या प्रचलित कार्यपद्धतीप्रमाणे करण्यात यावीत. मात्र जल जीवन मिशन अंतर्गत कामांच्या अंमलबजावणी संदर्भात सद्यस्थितीत शासन निर्णय दि. क्र. ग्रापाधो-२०१८/ प्र.क्र.१७१/पापु ०७ दि.११.०२.२०१९ प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

१.६. तांत्रिक मान्यता देणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याने प्रत्येक अंदाजपत्रकांना मान्यता देतांना, दिनांक ०३.०८.२०२० रोजीच्या शासन परिपत्रकामध्ये नमुद केल्याप्रमाणे प्रमाणपत्र देणे अनिवार्य राहील.

१.७. वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत मंजूर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकातील समाविष्ट कामांचा, जल जीवन मिशन अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकात समावेश करण्यात येऊ नये.

१.८. उपरोक्त सुधारणात्मक पुनर्जोडणी प्रमाणेच, १५ व्या वित्त आयोगाच्या निधीअंतर्गत पाणी पुरवठयाची कामे परिशिष्ट क्र.१ मधील कामे देखील अनुज्ञेय आहेत. यापैकी शाळा व अंगणवाड्यांची कामे निधी उपलब्धते प्रमाणे घेण्यात येतील. स्त्रोत बळकटीकरणाची कामे ( परिशिष्ट क्र.१ मधील अ.क्र ४ मधील कामे ) ही देखील महत्वाची कामे आहेत. ती भुजल

सर्वेक्षण संचालनालयाच्या सल्ल्याने करण्यात यावी. ग्रे वॉटर व्यवस्थापनाबाबतची कामे स्वच्छ भारत अभियानाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार घेण्यात यावीत.

**२. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२**

२.१. स्वच्छ भारत अभियान (ग्रामीण) टप्पा-२ अंतर्गत १५ व्या वित्त आयोगाच्या निधीमधून अनुज्ञेय कामांची यादी परिशिष्ट क्र.२ मध्ये देण्यात आली आहेत.

२.२. घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनाबाबत घ्यावयाच्या कामांबाबतची प्रक्रीया (संदर्भ क्र. ९) शासन परिपत्रक २८.१०.२०२० अन्वये नमूद केल्यानुसार असेल. तसेच सार्वजनिक शौचालयाबाबत घ्यावयाच्या कामांबाबतची प्रक्रीया शासन परिपत्रक दि. ०२.११.२०२० (संदर्भ क्र. १०) चे शासन परिपत्रकामध्ये नमूद केल्यानुसार असेल.

२.३. जिल्हा स्वच्छता आराखडा तयार करताना उपरोक्तनुसार कामांचा ग्रामपंचायतीच्या कृती आराखडयात समावेश असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी खातरजमा करावी.

३. जिल्हा परिषद व पंचायत समिती स्तरावरील निधीही पाणी पुरवठा व स्वच्छता विषयक कामांसाठी (तीनही स्तरांवर) परिशिष्ट क्र. १ व २ मध्ये नमुद कामांसाठी वापरण्यात यावा .

४. पाणीपुरवठा व स्वच्छतेबाबत नव्याने कामे घ्यावयाची असल्यास व वार्षिक आराखड्यात (GPDP) ही बाब समाविष्ट करावयाची असल्यास ग्रामविकास विभागाने घालुन दिलेल्या प्रक्रियेनुसार ग्राम विकास आराखड्यामध्ये योग्य ते बदल करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

५. वित्त आयोगांतर्गत करण्यात येणाऱ्या कामांसाठी जिल्हा परिषद तांत्रिक मंजूरीसाठी कोणतीही प्रशासकीय फी आकारणार नाही. जल जीवन मिशन अंतर्गत तयार करण्यात येणाऱ्या अंदाजपत्रकाबाबत प्रचलित पध्दतीनुसार कार्यवाही करावी.

६. वित्त आयोगांतर्गत ग्रामपंचायतीने उपरोक्त नमूद केलेल्या कामाचा अहवाल जिल्हा परिषदेस देणे अनिवार्य राहील.

७. यावर्षी एकूण प्राप्त होणारा बंधित निधी खर्च होईल याप्रमाणे नियोजन करण्यात यावे.

८. अर्थात पंधराव्या वित्त आयोगाची पूर्ण प्रक्रिया ही ग्रामविकास विभागाच्या क्र.पंविआ-२०२०/प्र.क्र.५९/वित्त-४,दि. २६ जून,२०२० रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे असतील हे पुन:उदधृत करण्यात येत आहे.

९. सदर शासन निर्णय हा ग्रामविकास विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्र.२७८/वित्त ४ /दि. १२.११.२०२० अन्वये प्राप्त झालेल्या सहमतीस अनुलक्षुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक क्र.२०२०१११९१३३१०४८१२८ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay Chahande

Digitally signed by Sanjay Chahande
DN: c=IN, o=Government of maharashtra, ou=Water Supply & Sanitation dept, postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=1bed10a58141847cce2660609247682836584568e524ed107d81092655e08eee, serialNumber=17df548835856979dd20b49bd19b3f922c11a9955546b7989a245e6b2a9175e1, cn=Sanjay Chahande
Date: 2020.11.20 18:22:54 +05'30'

**(डॉ.संजय चहांदे)**

अपर मुख्य सचिव,महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. मंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. राज्यमंत्री (सर्व), यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
७. मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद, विधानभवन, मुंबई
८. सर्व सन्माननीय विधीमंडळ सदस्य
९. .मुंबई ,मंत्रालय ,चिवस
१०. मा ,पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव ,राज्यमंत्री .मंत्रालय.मुंबई ,
११. मा ,(सर्व) मंत्री .यांचे खाजगी सचिव.मुंबई ,मंत्रालय ,
१२. मा ,(सर्व) राज्यमंत्री .यांचे खाजगी सचिव.मुंबई ,मंत्रालय ,
१३. मा.मुंबई ,मंत्रालय ,विधिमंडळ महाराष्ट्र ,विधानसभा ,विरोधी पक्षनेता .
१४. मामं ,महाराष्ट्र विधिमंडळ ,विधान परिषद ,विरोधी पक्षनेता .त्रालय.मुंबई ,
१५. सर्व सन्माननीय विधिमंडळ सदस्य.मुंबई ,विधानभवन ,
१६. मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
१७. मा.अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

१८. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) मुंबई-१
२०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परिक्षा) नागपूर-२
२१. मिशन संचालक, राज्य पाणी व स्वच्छता मिशन (जल जीवन मिशन), बेलापूर, नवी मुंबई
२२. संचालक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे
२३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
२४. सह सचिव/ उप सचिव/ विशेष कार्य अधिकारी (सर्व), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२५. मुख्य अभियंता (सर्व)/ अधिक्षक अभियंता (सर्व), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण
२६. अवर सचिव/ कक्ष अधिकारी (सर्व योजना कार्यासने), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
२७. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी व स्वच्छता), जिल्हा परिषद (सर्व)
२८. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२९. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
३०. निवडनस्ती (कार्यासन पापु ०७/ कार्यासन पापु १६)

## परिशिष्ट – I
### पेयजल संबंधित उपक्रम

पाणी पुरवठा यंत्रणेमधून दिर्घ कालावधीसाठी ५५ लि/माणसी/दिन याप्रमाणे किमान सेवा स्तराने नियमितपणे शाश्वत पिण्याचे पाणी उपलब्ध करणे. उदाहरणार्थ उपक्रम खालीलप्रमाणे आहेत (मात्र हे सविस्तर नाहीत)

१. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांचे उद्भवात वाढ/ वृध्दी करणे म्हणजे विंधण विहीर पुनर्भरण, पाऊस पाणी संकलन (उदा. चेक डॅम्स, जलस्त्रोतांचे पुनर्जीवन, पाणलोट क्षेत्र व झ-याचे क्षेत्र व्यवस्थापन इत्यादी.)
२. शाळा, अंगणवाडया, सार्वजनिक आरोग्य केंद्र इत्यादी सारख्या संस्थांमध्ये पाणी पुरवठा उपलब्ध करणे
३. अस्तित्वातील पाणी पुरवठा योजनांमधून संपुर्ण संकल्पन कालावधीसाठी सेवा सुधारण्याकरीता सुधारणात्मक पुनर्जोडणीची कामे करणे (यामध्ये घरगुती नळ जोडणीचा समावेश)
४. छोटी घरे असलेल्या लोकांना धुण्यासाठी/ स्नानगृहांसाठी, जनावरांकरीता तयार केलेल्या कुंडांसाठी इ. ठिकाणी नजिकच्या भूपृष्ठ स्त्रोत, विंधन विहिरी, गावांतर्गत वितरण व्यवस्था, उंच टाक्या (ESR), जमीनीवरील बैठ्या टाक्या इ. ठिकाणांहून (GSR) पाणी आणणे.
५. सांडपाणी प्रक्रिया आणि त्याचा पुनर्वापर उदा.स्टॅबीलायझेशन पॉड आणि संबंधित पायाभूत सुविधा
६. पाणी पुरवठा योजनेचा देखभाल व दुरूस्ती आणि सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणा.

## परिशिष्ट-२
## स्वच्छता संबंधित उपक्रम

१. स्वच्छता आणि घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापना करिता निर्माण केलेल्या सार्वजनिक मालमत्ता उदा. सामुदायिक/सार्वजनिक शौचालय (CSC), घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणा, गोबरधन प्रकल्प, मैला (Faecal Sludge) व्यवस्थापन प्रकल्प, शोष खड्डे, कंपोस्ट खड्डे इत्यादींची देखभाल व दुरूस्ती करणे.

२. घरांमधून कचरा गोळा करून त्याची वाहतूक गावस्तरावरील कचरा प्रक्रिया जागेकडे करणे. कंपोस्ट केंद्राची व्यवस्थापन करणे.

३. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ च्या मार्गदर्शक सुचानांनुसार सामुदायिक/सार्वजनिक शौचालय (CSC) बांधकाम करणे.

४. स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ च्या मार्गदर्शक सुचानांनुसार सार्वजनिक कंपोस्ट खड्डे, सार्वजनिक शोष खड्डे/ सांडपाणी व्यवस्थापन यंत्रणांचे बांधकाम करणे.

५. प्लॅस्टीक कचरा-याचे गावस्तरावरील साठवण केंद्रातून पंचायत समिती स्तरावरील प्लॅस्टीक कचरा व्यवस्थापन केंद्राकडे वाहतूक करणे. (संदर्भ- स्वच्छ भारत मिशन (ग्रा) टप्पा-२ च्या मार्गदर्शक सुचाना)

६. सामूहीक शौचालयांची सुधारणात्मक पुनर्बांधणी (Retrofitting) करणे.

७. सांडपाणी नाल्यांचे बांधकाम करणे.

८. कचरा व्यवस्थापन संकुलाची स्वच्छता करण्यासाठी उपकरणे आणि स्वच्छता कर्मचा-यांठी सुरक्षा साधने उदा. मुखपट्टी, हातमोजे इत्यादीं .

९. सार्वजनिक ठिकाणी ओला व सुका कचरा पेट्यांची व्यवस्था करणे.

१०. मासिक पाळी कच-याचे व्यवस्थापन योग्य ठिकाणी करणे, जमल्यास कचरा एकत्रिकरण केंद्रात ज्याठिकाणी CPCB/ SPCB मान्यता प्राप्त इनसिनेरॅटोर (Incinerator) यंत्र आहे अशा केंद्रात करणे.

११. नवीनतम आणि पुननिर्माण उर्जा मंत्रालयाच्या New National Biogas and Organic Manure Programme (NNBOPMP) च्या निकषानुसार गोबरधन प्रकल्पांची क्षमता वाढविणे. (प्रति पंचायत समिती कमीत कमी १० प्रकल्प)

१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या मूलभूत अनुदान (बेसिक ग्रांट) वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियत्रण याबाबतच्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचना.

## महाराष्ट्र शासन
### ग्राम विकास विभाग
### शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: ४ डिसेंबर, २०२०.

**संदर्भ :**

1) **केंद्र शासनाचे क्र.G-३९०११/२/२०१७-FD Dated ५.८.२०२०**
2) **केंद्र शासनाचे क्र. १५(२) FC-XV/SVD/२०२०-२५ Dated १.६.२०२०**
3) **शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४, दि.२६.६.२०२०**

**प्रस्तावना :**

१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना देण्याच्या अनुषंगाने दि.२६.६.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या क्र.जी-३९०११/२/२०१७-एफडी, दि.५.८.२०२० च्या पत्रान्वये अतिरिक्त निकष व संनियंत्रण संबंधित मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्या अतिरिक्त सूचना पंचायतराज संस्थांच्या तिन्ही स्तरावर कळविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :**

१. १५ व्या वित्त आयोगांतर्गत बेसिक (अबंधित अनुदान) ग्रॅटच्या वापरासह ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत घेण्यात येणा-या विविध कामे / उपक्रमांच्या स्पष्टीकरणाबाबत राज्यास केंद्र शासनाकडून निर्देश प्राप्त झाले आहेत. यापुर्वी दि.१ जून,२०२० च्या पत्र क्र.१५(२) FC-XV/SVD/२०२०-२५ व्दारे १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या बेसिक ( अबंधित) आणि टाईड (बंधित) ग्रॅटच्या निधी

वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियंत्रण संबंधित मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाव्दारे जारी करण्यात आल्या आहेत.

२. केंद्र शासनाच्या दि.१ जून, २०२० च्या पत्राच्या अनुषंगाने राज्याव्दारे दि. २६.६.२०२० रोजी १५ व्या वित्त आयोगांतर्गत अनुदान वितरण , सनियंत्रण बाबत मार्गदर्शक सूचना देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार मुलभूत / बेसिक अनुदान हे अबंधित स्वरूपाचे आहे. सदर अनुदानाचा वापर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजांनुसार ( Location Specific Felt Needs ) आवश्यक बाबींसाठी करावयाचा आहे.

३. १५ व्या वित्त आयोगांतर्गत बेसिक / मूलभूत अनुदानाचा गैरवापर अनिष्ट व बाहय बाबींवर होऊ नये तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या कामाची प्राथमिकता ठरवण्यात यावी यासाठी मूलभूत अनुदानांतर्गत घेण्यात येणा-या उपक्रमांबाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या अनुदानापैकी ५०% निधी बेसिक / मूलभूत अनुदानाच्या स्वरूपात देण्याची शिफारस १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाने केलेली आहे.

४. मूलभूत / बेसिक अनुदानातून घेतल्या जाणा-या कामे / उपक्रमांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

I. वादळ पाण्याचा निचरा आणि पाण्याचा साठा व्यवस्थापन, मुलांचे लसीकरण ( रोग,संसर्ग इ. पासून सुरक्षितता ) मुलांचे कुपोषण रोखणे, ग्रामपंचायतींदरम्यानचे जोडरस्ते आणि ग्रामपंचायतींच्या अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल आणि स्मशानभूमीचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल, स्मशानभूमीसाठी जमीन अधिग्रहण आणि मृत शरीर दफनभूमीची देखभाल, एलईडी पथदिवे व सौर पथदिव्यांचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल (सौर पथदिवे "वैयक्तिक खांब आधारीत प्रणाली" किंवा "केंद्रिकृत सौर पॅनेल प्रणाली" असू शकते) ग्रामपंचायतीमध्ये पुरेशी व उच्च बँडविडथसह वाय-फाय डिजीटल नेटवर्क सेवा उपलब्ध करणे, सार्वजनिक वाचनालय, मुलांसाठी उद्याने तसेच इतर मनोरंजन सुविधा, खेळाचे मैदान, क्रिडा व शारीरिक फिटनेस उपकरणे, ग्रामीण बाजारहाट इ. राज्य कायदयानुसार राज्य शासनाने केलेल्या इतर मूलभूत सुधारित / वर्धित सेवा, तसेच वीज, पाणी, कच-याचे संकलन व विल्हेवाट, सुका व ओला कचरा व्यवस्थापन उपकरणे, कंत्राटी तत्वावर (आऊटसोर्सिंग) मनुष्यबळ यांसाठी होणरा आवर्ती खर्च आणि इतर आवश्यक प्रशासकीय खर्च, नैसर्गिक आपत्ती, साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावावेळी त्वरीत मदतकार्य, पंचायतींना देण्यात आलेल्या इतर जबाबदा-यांची अंमलबजावणी जसे की, जैवविविधता अधिनियम २००२ अंतर्गत लोकांची जैवविविधता नोंदवही ( PBR - Peoples Biodiversity Register ) तयार करणे व अद्ययावत करणे.

II. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाने स्थानविशिष्ट गरजांतर्गत कामांची अंमलबजावणी आणि देखभाल व व्यवस्थापन खर्च (O & M) आणि भांडवली खर्चामध्ये फरक केलेला नाही. ग्रामीण नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी ग्रामपंचायती वार्षिक देखभाल / सेवा करार करू शकतात. तथापि, नकारात्मक यादीतील बाबींवर खर्च म्हणजेच इतर योजनांमधून पूर्वीच वित्त पुरवठा होत असलेल्या

बाबींवर खर्च, सत्कार / सांकृतिक कार्ये / सजावट / उदघाटन, निवडून आलेल्या प्रतिनिधींचे मानधन, टीए / डीए आणि विद्यमान कर्मचा-यांचे पगार / मानधन /शिधा (doles)/ विविध पुरस्कार, करमणूक, वाहन खरेदी करणे आणि वातानुकुलित उपकरणे ( A.C - Air Conditioner ) इत्यादी बाबींना परवानगी नाही.

५. उपरोक्त खर्चाच्या बाबी सुचक स्वरूपाच्या आहेत. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत मूलभूत उपरोक्त /बेसिक (अबंधित) अनुदान स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वेतन व इतर आस्थापना विषयक खर्चाव्यतिरिक्त स्थान विशिष्ट गरजांसाठी वापरता येईल. वरील बाबीं सह ग्रामपंचायत विकास आराखड्यानुसार १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर करण्यात यावा. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधीचा विनियोग करताना दि.२६.६.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांसहित उपरोक्त अतिरिक्त सूचनांचे अनुपालन करण्यात यावे. तसेच, १५ व्या वित्त आयोगाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्राप्त निधीसाठी प्रशासकीय विभाग ग्रामविकास विभाग असल्याने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोजना संबंधित इतर विभागांनी या विभागाच्या सहमती शिवाय निर्गमित केलेल्या आदेशांचे पालन करण्यापूर्वी ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०२०१२०४१५४११०५८२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.12.04 18:16:18 +05'30'

**( प्रविण जैन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत.

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
मा.अति.मुख्य सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक

महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उपसचिव, ग्राम विकासविभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय / वित्त आयोग कक्ष.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग ( सर्व कार्यासने )
निवड नस्ती का.क्र.वित्त-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२

१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या मूलभूत अनुदान (बेसिक ग्रांट) वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियत्रण याबाबतच्या अतिरिक्त मार्गदर्शक सूचना.

# महाराष्ट्र शासन
## ग्राम विकास विभाग
## शासन निर्णय क्रमांकः पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४

बांधकाम भवन, मर्झबान पथ, फोर्ट,
मंत्रालय, मुंबई- ४०० ००१
तारीख: ४ डिसेंबर, २०२०.

संदर्भ :

1) **केंद्र शासनाचे क्र.G-३९०११/२/२०१७-FD Dated ५.८.२०२०**
2) **केंद्र शासनाचे क्र. १५(२) FC-XV/SVD/२०२०-२५ Dated १.६.२०२०**
3) **शासन निर्णय क्र. पंविआ-२०२०/प्रक्र-५९ /वित्त-४, दि.२६.६.२०२०**

प्रस्तावना :

१५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या अनुदान वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियत्रण याबाबत मार्गदर्शक सूचना देण्याच्या अनुषंगाने दि.२६.६.२०२० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. केंद्र शासनाच्या क्र.जी-३९०११/२/२०१७-एफडी, दि.५.८.२०२० च्या पत्रान्वये अतिरिक्त निकष व संनियंत्रण संबंधित मार्गदर्शक सूचना जारी करण्यात आल्या आहेत. त्या अतिरिक्त सूचना पंचायतराज संस्थांच्या तिन्ही स्तरावर कळविण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता त्यानुसार खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आला आहे.

**शासन निर्णय :**

१. १५ व्या वित्त आयोगांतर्गत बेसिक (अबंधित अनुदान) ग्रॅटच्या वापरासह ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमार्फत घेण्यात येणा-या विविध कामे / उपक्रमांच्या स्पष्टीकरणाबाबत राज्यास केंद्र शासनाकडून निर्देश प्राप्त झाले आहेत. यापुर्वी दि.१ जून,२०२० च्या पत्र क्र.१५(२) FC-XV/SVD/२०२०-२५ व्दारे १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या बेसिक ( अबंधित) आणि टाईड (बंधित) ग्रॅटच्या निधी

वितरणाबाबतचे सन २०२०-२१ साठीचे निकष व संनियंत्रण संबंधित मार्गदर्शक सूचना केंद्र शासनाव्दारे जारी करण्यात आल्या आहेत.

२. केंद्र शासनाच्या दि.१ जून, २०२० च्या पत्राच्या अनुषंगाने राज्याव्दारे दि. २६.६.२०२० रोजी १५ व्या वित्त आयोगांतर्गत अनुदान वितरण , सनियंत्रण बाबत मार्गदर्शक सूचना देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. सदर शासन निर्णयानुसार मुलभूत / बेसिक अनुदान हे अबंधित स्वरूपाचे आहे. सदर अनुदानाचा वापर ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांनी कर्मचारी पगार तथा आस्थापना विषयक बाबी वगळून इतर स्थानिक गरजांनुसार ( Location Specific Felt Needs ) आवश्यक बाबींसाठी करावयाचा आहे.

३. १५ व्या वित्त आयोगांतर्गत बेसिक / मूलभूत अनुदानाचा गैरवापर अनिष्ट व बाहय बाबींवर होऊ नये तसेच ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांना त्यांच्या कामाची प्राथमिकता ठरवण्यात यावी यासाठी मूलभूत अनुदानांतर्गत घेण्यात येणा-या उपक्रमांबाबत खालील प्रमाणे स्पष्टीकरण देण्यात येत आहे. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांना देण्यात येणा-या अनुदानापैकी ५०% निधी बेसिक / मूलभूत अनुदानाच्या स्वरूपात देण्याची शिफारस १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाने केलेली आहे.

४. मूलभूत / बेसिक अनुदानातून घेतल्या जाणा-या कामे / उपक्रमांमध्ये खालील बाबींचा समावेश होतो.

I. वादळ पाण्याचा निचरा आणि पाण्याचा साठा व्यवस्थापन, मुलांचे लसीकरण ( रोग,संसर्ग इ. पासून सुरक्षितता ) मुलांचे कुपोषण रोखणे, ग्रामपंचायतींदरम्यानचे जोडरस्ते आणि ग्रामपंचायतींच्या अंतर्गत रस्त्यांचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल आणि स्मशानभूमीचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल, स्मशानभूमीसाठी जमीन अधिग्रहण आणि मृत शरीर दफनभूमीची देखभाल, एलईडी पथदिवे व सौर पथदिव्यांचे बांधकाम, दुरूस्ती व देखभाल (सौर पथदिवे "वैयक्तिक खांब आधारीत प्रणाली" किंवा "केंद्रिकृत सौर पॅनेल प्रणाली" असू शकते) ग्रामपंचायतीमध्ये पुरेशी व उच्च बँडविडथसह वाय-फाय डिजीटल नेटवर्क सेवा उपलब्ध करणे, सार्वजनिक वाचनालय, मुलांसाठी उद्याने तसेच इतर मनोरंजन सुविधा, खेळाचे मैदान, क्रिडा व शारीरिक फिटनेस उपकरणे, ग्रामीण बाजारहाट इ. राज्य कायदयानुसार राज्य शासनाने केलेल्या इतर मूलभूत सुधारित / वर्धित सेवा, तसेच वीज, पाणी, कच-याचे संकलन व विल्हेवाट, सुका व ओला कचरा व्यवस्थापन उपकरणे, कंत्राटी तत्वावर (आऊटसोर्सिंग) मनुष्यबळ यांसाठी होणरा आवर्ती खर्च आणि इतर आवश्यक प्रशासकीय खर्च, नैसर्गिक आपत्ती, साथीच्या रोगाच्या प्रादुर्भावावेळी त्वरीत मदतकार्य, पंचायतींना देण्यात आलेल्या इतर जबाबदा-यांची अंमलबजावणी जसे की, जैवविविधता अधिनियम २००२ अंतर्गत लोकांची जैवविविधता नोंदवही ( PBR - Peoples Biodiversity Register ) तयार करणे व अद्ययावत करणे.

II. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाने स्थानविशिष्ट गरजांतर्गत कामांची अंमलबजावणी आणि देखभाल व व्यवस्थापन खर्च (O & M) आणि भांडवली खर्चामध्ये फरक केलेला नाही. ग्रामीण नागरिकांना सेवा पुरविण्यासाठी ग्रामपंचायती वार्षिक देखभाल / सेवा करार करू शकतात. तथापि, नकारात्मक यादीतील बाबींवर खर्च म्हणजेच इतर योजनांमधून पूर्वीच वित्त पुरवठा होत असलेल्या

बाबींवर खर्च, सत्कार / सांकृतिक कार्ये / सजावट / उदघाटन, निवडून आलेल्या प्रतिनिधींचे मानधन, टीए / डीए आणि विद्यमान कर्मचा-यांचे पगार / मानधन /शिधा (doles)/ विविध पुरस्कार, करमणूक, वाहन खरेदी करणे आणि वातानुकुलित उपकरणे ( A.C - Air Conditioner ) इत्यादी बाबींना परवानगी नाही.

५. उपरोक्त खर्चाच्या बाबी सुचक स्वरूपाच्या आहेत. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगांतर्गत मूलभूत उपरोक्त /बेसिक (अबंधित) अनुदान स्थानिक स्वराज्य संस्थांकडून वेतन व इतर आस्थापना विषयक खर्चाव्यतिरिक्त स्थान विशिष्ट गरजांसाठी वापरता येईल. वरील बाबीं सह ग्रामपंचायत विकास आराखड्यानुसार १५ व्या वित्त आयोगाच्या निधीचा वापर करण्यात यावा. १५ व्या केंद्रिय वित्त आयोगाच्या निधीचा विनियोग करताना दि.२६.६.२०२० रोजीच्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांसहित उपरोक्त अतिरिक्त सूचनांचे अनुपालन करण्यात यावे. तसेच, १५ व्या वित्त आयोगाच्या स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी प्राप्त निधीसाठी प्रशासकीय विभाग ग्रामविकास विभाग असल्याने १५ व्या वित्त आयोगाच्या निधीच्या विनियोजना संबंधित इतर विभागांनी या विभागाच्या सहमती शिवाय निर्गमित केलेल्या आदेशांचे पालन करण्यापूर्वी ग्रामविकास विभागाचे मार्गदर्शन घेणे आवश्यक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक **२०२०१२०४१५४११०५८२०** असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

PRAVIN DEVICHAND JAIN

Digitally signed by PRAVIN DEVICHAND JAIN
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=c7f82404d3bf725fa292c76bb1649f4e73505a8c846f3f83bdee9968a87f1d6c, postalCode=400001, street=MANTRALAYA,MUMBAI, ou=NA, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=PRAVIN DEVICHAND JAIN
Date: 2020.12.04 18:16:18 +05'30'

**( प्रविण जैन )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रत.

मा.राज्यपाल यांचे सचिव
मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव
मा.विधानसभा व विधान परिषद सदस्य.
मा. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
मा.अति.मुख्य सचिव (ग्रा.वि. व पं.रा.) यांचे स्वीय सहाय्यक

महालेखापाल, महाराष्ट्र - १ (लेखापरीक्षा), मुंबई (पाच जादा प्रतीसह)
महालेखापाल, महाराष्ट्र - २ (लेखापरीक्षा), नागपूर (पाच जादा प्रतीसह)
सर्व विभागीय आयुक्त. (महसूल)
सर्व जिल्हा परिषदांचे अध्यक्ष.
मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन, नवी मुंबई.
सर्व उपसचिव, ग्राम विकासविभाग, मंत्रालय, मुंबई - ३२
सर्व सहमुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व विभाग)
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत)
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१५/अर्थोपाय / वित्त आयोग कक्ष.)
ग्राम विकास व जलसंधारण विभाग ( सर्व कार्यासने )
निवड नस्ती का.क्र.वित्त-४, ग्राम विकास विभाग, मंत्रालय, मुंबई - ३२